सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | रविवार, ०८ सप्टेंबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक १६७ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


गणपती बाप्पांच्या आगमनाने असंमत दुमदुमला विघ्नहर्त्याचे जल्लोषात केले स्वागत

वक्रतुंड महाकाय सूर्यकोटी समप्रभ:
निर्विघ्नं कुरुमे देवो सर्वकार्येषु सर्वदा


मुंबई येथील निवासस्थानी आज दरवर्षीच्या परंपरेप्रमाणे श्री गणरायाच्या मूर्तीची राज्याचे उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सहकुटुंब प्राणप्रतिष्ठा केली.

# अनेक सिंगापूर भारतात निर्माण करण्याची इच्छा
## पंतप्रधान नरेंद्र मोदींकडून सिंगापूरच्या विकासाची प्रशंसा



**सिंगापूर । वृत्तसंस्था**
सिंगापूर हे विकसनशील देशाचे आदर्श उदाहरण आहे. असे अनेक 'सिंगापूर' भारतातच तयार करण्याची आमची इच्छा आहे, असे म्हणत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी सिंगापूरमधील विकासाचे कौतुक केले. सिंगापूर हा देश केवळ आमचा भागीदार देश नसून प्रत्येक विकसनशील देशासाठी प्रेरणास्रोत आहे, असेही मोदी म्हणाले.
सिंगापूर दौऱ्यावर असलेल्या मोदींनी शुक्रवारी या देशाचे पंतप्रधान लॉरेन्स वोंग यांची भेट घेत विविध मुद्द्यांवर चर्चा केली. वोंग यांच्याकडे या वर्षी मे महिन्यात सिंगा-पूरचे नेतृत्व आल्यापासूनची त्यांच्यातील ही पहिलीच भेट होती.
वोंग हे पीपल्स क्शन पार्टीचे नेते असून सिंगापूरचे नेतृत्व करणारी पक्षनेते म्हणून त्यांची चौथी पिढी आहे. त्यांच्याबरोबरील भेटीनंतर मोदी म्हणाले,''सिंगापूरने करून दाखविलेला विकास सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. हा देश भारताच्या क्ट ईस्ट धोरणाचाही महत्त्वाचा भाग आहे.
भारत आणि सिंगापूर हे महत्त्वाचे भागीदार देश असून दोन्ही देशांमधील व्यापार मागील दहा वर्षांत दुपटीने वाढला आहे. दोन्ही देशांमधील व्यापार १५० अब्ज डॉलरवर पोहोचला असून भारताने सिंगापूरमध्येच सर्वप्रथम यूपीआय पेमेंट सुविधा सुरू केली होती. कौशल्य विकास ते संरक्षण क्षेत्र अशी विविध क्षेत्रांत आमची भागीदारी वाढली आहे.
दोन्ही देशांमधील संबंध सर्वसमावेश धोरणात्मक भागीदारी पातळीवर नेत असल्याचेही मोदींनी जाहीर केले. सिंगापूरच्या विकासाचे कौतुक करताना, भारतातही असे अनेक 'सिंगापूर' तयार करण्याची आमची इच्छा असून या उद्दिष्टाकडे आमची वाटचालही सुरू आहे, असेही मोदींनी सांगितले.


महत्त्वाचे

## पूजा खेडकर आयएएस सेवेतून बडतर्फ



**तभा वृत्तसेवा**
नवी दिल्ली : बोगस प्रमाणपत्र जमा करून आयएएस झालेल्या पूजा खेडकरवर आता यूप-ीएससीने मोठी कारवाई केली आहे. पूजा खेडकरला आयएएस सेवेतून बडतर्फ करण्यात आलं आहे. पूजा खेडकरने आयएएस पदासाठी जमा केलेली कागदपत्रं खोटी असल्याचं समोर आलं. या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयात खटलाही सुरू आहे. आता तिला सेवेतून बडतर्फ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.
गेल्या आठवड्यात यूपीएससीने पूजा खेडकरची निवड रद्द करण्याचा निर्णय घेतला होता. मात्र त्यावेळी काही तांत्रिक अडचण आली होती. आता मात्र तिला पदमुक्त करण्याचा निर्णय घेण्यात आला.
पूजा खेडकरला २६ सप्टेंबरपर्यंत अटकपूर्व जामीन मंजूर करण्यात आला आहे. मात्र केंद्र सरकारच्या बडतर्फीच्या निर्णयामुळे आता पूजा खेडकरच्या अडचणींमध्ये वाढ होण्याची शक्यता आहे.
या प्रकरणी माहिती अधिकारी विजय कुंभार यांनी एबीपी माझाला प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले की, एकदा आयएएस झालं की देशाचे पंतप्रधानदेखील आपल्याला सेवेतून काढू शकत नाहीत या अविर्भावात वागणाऱ्या अधिकाऱ्यांसाठी ही चपराक असेल. पूजा खेडकरप्रमाणेच अनेकांनी खोटी कागदपत्रं सादर करून पदं घेतली आहेत. त्यांच्यावरही कारवाई केली पाहिजे. पूजा दिलीप खेडकर २०२३ च्या बॅचच्या आयएएस अधिकारी होती. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत तिने ८४१ वा क्रमांक पटकावला होता. काही महिन्यापूर्वी सहायक जिल्हाधिकारी अधिकारी म्हणजेच प्रोबेशनरी ऑफिसर म्हणून पुणे जिल्ह्यात तिची नियुक्ती करण्यात आली होती. पण प्रशिक्षणाच्या काळातच पुण्याच्या जिल्हाधिकारी कार्यालयाकडं अवास्तव मागण्या केल्यामुळं आणि अरेरावी वर्तनामुळं तिच्याबाबत प्रचंड चर्चा झाली. त्यानंतर तिथून वाशिम इथं बदली करण्यात आली होती. पूजा खेडकरने दृष्टिदोष प्रवर्गातून णझडउ परीक्षा उत्तीर्ण केली आणि मानसिक आजाराचे प्रमाणपत्र सादर केले. याच आधारावर तिला विशेष सवलत मिळाली आणि ती आयएएस झाली. त्यानंतर तिला सहावेळा वैद्यकीय तप-ासणीसाठी बोलवण्यात आलं. पण प्रत्येक वेळी त्या अनुपस्थित राहिली. तसेच पूजा खेडकरनी स्वतःच्या नावात, तिच्या वडिलांच्या नावात तसेच आईच्या नावात बदल करून केंद्रीय लोकसेवा आयोगाची फसवणूक केल्याचं या चौकशीत समोर आलं आहे. पूजा खेडकरनी परीक्षेचा फॉर्म भरत असताना फोटो, सही, ईमेल आयडी, मोबाईल नंबर आणि पत्ता बदलून परीक्षा देण्याची कमाल मर्यादा ओलांडली असल्याचं यूपीएससीने सांगितलं. त्यानंतर तिच्यावर कारवाई करण्यात आली आहे.

## मी शिवसेनेत प्रवेश करण्याचा निर्णय घेतलाय?– जितेंद्र आव्हाड



**तभा वृत्तसेवा**
मुंबईः राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे नेते आणि आमदर जितेंद्र आव्हाड यांनी मुख्यमंत्र्यांच्या ठाण्यातील निवास्थानी मुख्यमंत्र्यांची भेट घेतली. आव्हाड यांनी एकनाथ शिंदे यांच्या घरातील गणरायाचे दर्शन यावेळी घेतले आहे. दरम्यान, मुख्यमंत्र्यांची भेट घेतल्यानंतर पत्रकारांनी या भेटीबद्दल प्रश्न विचारला असता, जितेंद्र आव्हाड यांनी मिश्किल उत्तर दिले आहे. मी शिवसेनेत प्रवेश करण्याचा निर्णय घेतला असल्याचे सांगत त्यांनी याविषयी अधिक बोलणे टाळले आहे. मी मुख्यमंत्र्यांच्या घरी येऊन गणपतीच दर्शन घेतलं, नंतर यायला मला मिळत नाही आणि नंतर ते ही भेटत नाहीत, म्हणून आत्ता मी आल्याचेही जितेंद्र आव्हाड म्हणाले.

## विधानसभा निवडणुकीसाठी भाजपाने कसली कंबर

### स्टार प्रचारकांमध्ये राजकीय रथी–महारथींचा समावेश

“ भाजपाने विधानसभा निवडणुकीसाठी स्टार प्रचारकांची यादी तयार केली आहे. त्यात १७ जणांचा समावेश आहे. यातील काही जण काँग्रेसमधून भाजपामध्ये आलेले आहेत. स्टार प्रचारकांच्या यादीत खासदार अशोक चव्हाण, खासदार नारायण राणे, मंत्री सुधीर मुनगंटीवार, चंद्रकांत पाटील, गिरीश महाजन महाजन, रविंद्र चव्हाण, राधाकृष्ण विखे–पाटील, आमदार पंकजा मुंडे, विजया रहाटकर, प्रविण दरेकर, भाई गिरकर, अशोक नेते, अतुल सावे, संजय कुटे, जयकुमार रावल, रक्षा खडसे, मुरलीधर मोहोळ यांचा समावेश आहे.

**तभा वृत्तसेवा**
मुंबई : लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात दारुण पराभव पत्करावा लागल्यानंतर भारतीय जनता पक्षाने आता विधानसभेसाठी कंबर कसली आहे. त्यासाठी भाजपाने रणनीती आखण्यासाठी सुरुवात केली आहे. विधानसभा निवडणुकीसाठी भाजपाने जम्बो टीम तयार केली आहे. त्यात केंद्रीय मंत्री नितीन गडकरींना विशेष स्थान देण्यात आले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या मंत्रिमंडळात असलेल्या गडकरींकडे विधानसभेच्या दृष्टीने महत्त्वाची जबाबदारी दिली आहे.

# अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करा –मनोज पवार

### नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन प्रत्यक्ष केली पाहणी

**तभा वृत्तसेवा**
**कन्नड/प्रतिनिधी**
तालुक्यातील अनेक भागात मागील आठवड्यापासून ढगफुटीसह सतत पाऊस झाल्याने शेतकऱ्यांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले आहेत. या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना लवकरात लवकर आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी तहसीलदार यांना निवेदन देऊन उद्योजक तथा समाजसेवक मनोज पवार यांनी केली आहे.
तालुक्यात सप्टेंबर महिन्याच्या सुरुवातीस काही भागात ढगफुटी सारखा पाऊस झाल्याने



शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. तालुक्यातील वाडी चिमणापुर परीसरात उद्योजक मनोज पवार यांनी प्रकाश सोनवणे यांच्यासह इतर शेतकऱ्यांच्या शेती बांधावर जाऊन प्रत्यक्ष नुकसानीची पाहणी केली. या पावसाने शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेला आहे. सुलतानी संकटांना तोंड देता देता मेटाकुटीला आलेला शेतकरी या आसमानी संकटामुळे पुरता कोलमडून गेला आहे. अशा वेळी शासनाने खंबीरपणे शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहण्याची गरज आहे. शेतकऱ्यांच्या नुकसानीचे पंचनामे करून शेतकऱ्यांना लवकरात लवकर आर्थिक मदत मिळवुन देण्यासाठी मी संबंधित अधिकारी यांच्याशी सातत्याने संपर्कात राहून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे तात्काळ पंचनामे करून घेण्यासाठी आग्रही राहणार आहे. या संदर्भात शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष करून चालढकलपणा केल्यास तालुक्यात मोठे आंदोलन उभारले जाईल, असाही इशारा उद्योजक तथा समाजसेवक मनोज पवार त्यांनी दिला आहे. यावेळी शेतकरी, ग्रामस्थ व उद्योजक मनोज भाऊ पवार मित्र मंडळातील सदस्यांची मोठ्या संख्येने उप-स्थिती होती.

## रस्त्यामुळे दुखापत व जीवित हानी झाल्यास प्रशासन जबाबदार :शेतकऱ्यांचा इशारा

### वेळोवेळी निवेदने देऊनही शेत रस्त्याकडे तहसीलदार यांचे अक्षरशः दुर्लक्ष

**तभा वृत्तसेवा**
**सिल्लोड/प्रतिनिधी**
पाल येथील महाराणा प्रताप नगर ते जाधव-वाडी वस्तीकडे मुख्य रस्त्यालगत जिल्हा परिषद बांधकाम उप विभागाने रस्त्याचे काम करताना रस्त्याच्या बाजूने चारीचे खोदकाम केलेले आहे परंतु या रस्त्यालगत असलेल्या शेतकऱ्यांना शेतात जाते – येते वेळीस मोठी कसरत करावी लागत असून कहिक वेळा बैलगाडी व ट्रॅक्टर उलटून येथील शेतकरी जखमी झालेले हा त्रास कमी व्हावा व बैलगाडी व ट्रॅक्टर उलटून भविष्यात जिवित हानी होण्याची भीतीने येथील शेतकऱ्यांनी तहसीलदार,तलाठी,व ग्रामसेवक यांच्याकडे वेळोवेळी तक्रार निवेदन दाखल करूनही येथील शेतकऱ्यांना प्रशासनाकडून न्याय मिळत नसल्याचा गंभीर प्रकार समोर आलेला आहे.
सदर शेत रस्त्याचा प्रश्न सोडवण्यासाठी तहसील कार्यालयाकडे दिनांक २८/१२/२०२०,दिनांक २५/०५/२०२३, दिनांक ३१/०५/२०२३,व तसेच तहसीलदार,तलाठी,व ग्रामसेवक यांच्याकडे दिनांक २६/०२/२०२४,रोजी तक्रार निवेदन दाखल करण्यात आलेले आहे व तसेच रुपये ४५०० व रुपये २२५० चा भरणा करून दिनांक १०/०६/२०२४ रोजी स्वखर्चाने रीतसर मोजणी करून तहसीलदार, जि.प.उपाभियंता,तलाठी,व ग्रामसेवक यांच्याकडे नुकतेच पुनश्च तक्रार निवेदन दाखल करत रस्त्यालगत चारीत सिमेंट नाली टाकून देण्याची कार्यवाही १० दिवसात करण्याचे किंवा शेतात जाण्यासाठी रस्त्यालगत चारीत सिमेंट नाली टाकण्यासाठी लेखि परवानगी देण्याची किफायत तक्रार निवेदनात केलेली असून सदर रस्त्याचा प्रश्न प्रलंबित राहूल्यास यापुढे बैलगाडी व ट्रॅक्टर उलटून आंम्हा शेतकऱ्यांना शारीरिक दुखापत अथवा जीवित हानी झाल्यास त्यास तहसी-लदार फुलंब्री, जि.प. बांधकाम उपाभियंता,तलाठी पाल ,व ग्रामसेवक पाल हे वैयक्तिक जबाबदार राहतील,असा इशारा व्यथित झालेल्या शेतकऱ्यांनी दिला आहे. सदर तक्रार निवेदनावर बाळू तुकाराम काळे,विजय काळे,निवृत्ती काळे,रमेश तुकाराम काळे,ज्ञानेश्वर काळे यांनी स्वाक्षरी केलेली आहे

## कौन बनेगा करोडपती १६ 'केबीसी ज्युनियर्ससाठी नोंदणी सुरू

**तभा वृत्तसेवा**
**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी**
सोनी एंटरटेनमेंट टेलिव्हिजनचा अतिशय लोकप्रिय असलेला गेम शो, 'कौन बनेगा करोडपती १६,'ने त्याची बहुचर्चित विशेष थीम केबीसी ज्युनियर्स' पुन्हा सुरू करत आहे. ८ ते १५ वयोगटातील मुलांना भारतातील सर्वात प्रतिष्ठित असललेल्या क्विझमध्ये सहभागी होण्याची संधी मिळेल. केबीसीच्या या सत्राचे सूत्रसंचालन महानायक अमिताभ बच्चन करणार आहेत. अमिताभ या सर्व बालगोळांचा उत्साह वाढून त्यांना शोध्मये सहभागी होण्यासाठी आमंत्रित करत आहेत. आपल्या पाल्यांना केबीसीमध्ये सहभागी करण्यासाठी पालक सोनी एलआयव्ही (SonyLIV) ॲप डाउनलोड करून नोंदणी करू शकतात. तसेच मुलासाठी प्रोफाइल तयार करू शकतात. नंतर दररोज विचारण्यात आलेल्या प्रश्नांची उत्तरे देऊन पुढील प्रक्रिया पूर्ण करू शकतात. ९ सप्टेंबर रोजी याची नोंदणी बंद होईल. तर केबीसी ज्युनियर्स' खेळण्यासाठी तयार राहा आणि आपले नशीब अजमावून पहा.

## आयशरच्या धडकेत सतरा वर्षीय युवक जागीच ठार!

**तभा वृत्तसेवा**
**कन्नड/प्रतिनिधी**



शहरा लगत असलेल्या जुन्या मधुर डेअरी लगत असलेल्या गतिरोधका पुढे आयशर दुचाकीच्या अपघातात सतरा वर्षीय युवक जागीच ठार झाल्याची घटना दि.०७ शनिवार रोजी घडली आहे
सकाळी आठ वाजेच्या सुमारास सतरा वर्षीय युवक जयदीप अनिल राठोड वय १७ वर्षे व महेंद्र नामदेव चव्हाण १८ वर्ष दोघे राहणार सातकुंड तांडा हे युवक आपल्या दुचाकी क्र एम.एच.२० जी.वी.९५७३ ने कन्नडच्या दिशेने येत होते तर आयशर क्र.एम.एच.१२ एफ.डी.६७१६ चाळीसगांवच्या दिशेने जात होता,सोलापूर धुळे महामार्गा लगत असलेल्या गतिरोधकाच्या पुढे दोन्ही वाहनांचा अपघात झाला. या अपघातात जयदीपच्या डोक्याला गंभीर मार लागल्याने तो जागीच गतप्राण झाला तर महेंद्र जखमी झाला,जयदीप आणि महेंद्र हे दोन्ही युवक खाजगी शिकवणीसाठी शहरात येत होते पण काळाने जयदीपवर घाला घातला ,तीन वर्षापूर्वी जयदीपच्या वडिलांचे निधन झाले होते घरातील मोठा मुलगा असल्याने त्याच्यावर घरची जबाबदारी होती,अपघात घडल्यावर नागरिकांनी जयदीप यास खाजगी वाहनाने कन्नड ग्रामीण रुग्णालयात दाखल केले असता वैद्यकीय अधिकारी डॉ.भूषण डहाके यांनी तपासून मृत घोषित केले. दुपारी डॉ.भूषण डहाके,कर्मचारी विजय चव्हाण, आरिफ शेख यांनी शवविच्छेदन करून मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात दिला, अपघाताची माहिती तालुक्यात वाऱ्यासारखी पसरली होती कन्नड ग्रामीण रुग्णालयात नातेवाईकांसह,राजकिय नेते,मित्र मंडळीची मोठी गर्दी झाली होती जयदीपच्या पश्चात आई, लहान भाऊ,असा परिवार आहे अधिक तपास पोलिस निरीक्षक बाळासाहेब भापकर यांच्या मार्गदर्शनाखाली बिट जमादार जयंत सोनवणे, अंमलदार दिनेश खेडकर करत आहे

**सदर अपघाताची माहिती मिळताच जयदीपच्या आईने हंबरडा फोडला,यावेळी उपस्थितांचे डोळे पाणावले होते सायंकाळी शोकाकुल वातावरणात सातकुंड तांडा येथे अंत्यसंस्कार करण्यात आले, जयदीपच्या अपघाताने तालुक्यात हळहळ व्यक्त होत आहे.**

## गंगापूरला दिवाणी वरिष्ठ स्तर व जिल्हा सत्र न्यायालयास मंत्रिमंडळात मंजूरी

### गंगापुरच्या वकील संघांने केले निर्णयाचे जल्लोषात स्वागत



“ अनेक वर्षापासून गंगापूर येथे दिवाणी वरिष्ठ स्तर व जिल्हा सत्र न्यायालय स्थापन करण्यात यावे या मागणीसाठी पाठपुरावा व प्रयत्न करण्यात येत होते. या मागणीला यश मिळाल्याने व आमदार प्रशांत बंब यांच्या प्रयत्नाने मंत्रिमंडळात मंजुरी मिळाल्याने आचारसंहिते पूर्वी वरिष्ठ दिवाणी स्तर व जिल्हा सत्र न्यायालय सुरू करण्यात यावे अशी अपेक्षा आमदार प्रशांत बंब यांच्याकडून करण्यात येत आहे. **–गंगापूर वकील संघ अध्यक्ष ॲड.किशोर कऱ्हाळे**

**तभा वृत्तसेवा**
**गंगापूर/प्रतिनिधी**
गंगापूर येथे दिवाणी वरिष्ठ स्तर व जिल्हा सत्र न्यायालय स्थापण्यासाठी मंत्रिमंडळाकडून मंजुरी मिळाल्याने वकील संघ गंगापूर च्या वतीने निर्णयाचे जल्लोषात स्वागत करून आनंदोत्सव साजरा करण्यात आला.
अनेक वर्षांपासून दिवाणी वरिष्ठ स्तर व जिल्हा सत्र न्यायालयास गंगापूर येथे स्थापना व्हावी म्हणून वकील संघाच्या प्रयत्न सुरू होते या प्रयत्नास यश आले असून मंत्रिमंडळाच्या कॅबिनेट बैठकीत दिवाणी वरिष्ठ स्तर व जिल्हा सत्र न्यायालयास स्थापने बाबत मंजुरी मिळाल्याने आज गंगापूर येथील न्यायालयाच्या आवारात वकील संघाच्या वतीने जल्लोष साजरा करण्यात आला.
वकील संघाचे अध्यक्ष ड किशोर क–हाळे,उपाध्यक्ष ड.अमोल ठाकुर, सचिव ड.विठ्ठल काळे,आदीसह सर्व वकील संघांच्या मदतीने तसेच आमदार प्रशांत बंब यांच्या विशेष सहकार्याने आज वकील संघाच्या मागणीला यश आले असून लवकरच गंगापूर येथे दिवाणी वरिष्ठ स्तर व जिल्हा सत्र न्यायालयाची स्थापना करण्यासाठी आमदार प्रशांत बंब हे आचारसंहिता पुर्वी प्रयत्न करुन सुरू करतील अशी अपेक्षा गंगापूर वकील संघाचे अध्यक्ष ड किशोर क–हाळे,उपाध्यक्ष अमोल ठाकुर, सचिव विठ्ठल काळे यांनी व्यक्त केली. यावेळी वकील संघाचे वकील संघाचे अध्यक्ष के. आर. क–हाळे, उपाध्यक्ष ए.पी.ठाकूर वकील संघाचे पदाधिकारी एडवोकेट बी.आर.राजपूत. पि.बी.जोशी, व्ही. एस. मनोरकर एस. के. नरोडे ए.बी. कुलकर्णी डि.व्ही.साबणे,जी.बी. चव्हाण, एस.एन.साबणे,अमोल रासकर,बी. एस. शिंदे ,एस. एस करडे ,पी.डी. देशपांडे ए.एस. इंगळे डि. ई. पानकडे डि.के. तारू वाय. एन.जाधव आर. जी. बोठे एस.बी. शेख महेश गुडदे एम. पी. दारुंटे पि.आर. बरडे ए. आर.बरडे अविनाश चव्हाण, महेंद्र राऊत आकाश सिरसाठ ,रोहण भालेराव, व्ही. जी. खाजेकर यांच्यासह आदी उपस्थित होते.

## ख़ास गणेश उत्सव निमित्त भक्ता साठी नम्रता स्वीट तर्फे विविध प्रकारचे मोदक उपलब्ध

**तभा वृत्तसेवा**
**औरंगाबाद/प्रतिनिधी**



गणेश उत्सव निमित्त नम्रता स्वीट ने तयार केलेल्या १५ प्रकारच्या मोदकाना उत्तम प्रतिसाद मिळत असल्याची माहिती नम्रता स्वीट तर्फे विपुल मुगदिया यांनी दिली. गणेश भक्तांची चव ओळखुंन हे मोदक तयार करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. त्यातल्या त्यात चॉकलेट, फ्रूट, काजू, मावा, खोबरा, पारंपारिक मोदकाना अधिक मागणी आहे. औरंगाबाद मधे देशभरातील विविध मिठाई मिलन्याचे एकमेव ठिकान म्हणजे नम्रता स्वीट. येथे तब्बल ५०० हुन अधिक मिठाई व् नमकीन चे पदार्थ उपलब्ध आहे.
ख़ास गणेश उत्सव निमित्त मलाई मोदक, केशर मोदक, मथुरा मोदक, खोबरा मोदक, मावा ऑरेंज मोदक, मावा ब्लैक करंट मोदक, मावा गुलकंद मोदक, मावा ओरियो मोदक, पारंपारिक मोदक, काजू मोदक, पिस्ता मोदक, बादाम मोदक, काजू स्ट्रॉबेरी मोदक, काजू पायनाएप्पल मोदक या प्रकारचे मोदक उपलब्ध असून, त्या साठी विशेष अशी ११ नग, २१ नग,५१नग,१०८ नग पॅकिंग या प्रकारची बॉक्स व्यवस्था करण्यात आली आहे . शहरातील मानाच्या गणपतीस अर्पण करण्या साठी मोठया साईज चे मोदक उपलब्ध. तसेच शहरातील विविध गणेश मंडाळा व इंडस्ट्रीज तर्फे प्रसाद दररोज वेगवेगळया प्रकार च्या मोदक ची आर्डर नोंदविली जात आहे. तसेच एकाच वेळी खुप मोठी मागणी येत असल्याने, गर्दी आणि ग्राहकांची गैरसोय टाळन्याच्या उद्देशाने नम्रता ने जालना रोड वरील दुकानात बुकिंग विशेष व्यवस्था केलि आहे.

# जिल्हावासियांनी केले बाप्पांचे उत्साहात स्वागत

## पाच वर्षीय कु.अन्वी पांचाळ ने बनविला इकोफ्रेंडली बाप्पा



**तभा वृत्तसेवा**
**जालना/सुरेश कवडे पाटील**

जालन्याचे जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांची कन्या कु.अन्वी हीने आपल्या घरीच इकोफ्रेंडली बाप्पाची मुर्ती बनवुन त्याच मुर्तीची स्थापना केली आहे.

जालन्याचे कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांची ५ वर्षाची कन्या अन्वी हीने पर्यावरण पुरक असलेल्या सर्वांचा आवडता गणपती बाप्पाची मुर्ती इकोफ्रेंडली आपल्या घरीच आपल्या आईच्या मदतीने बनवून एक वेगळाच संदेश दिला आहे. अवघ्या पाच वर्षीय अन्वीने बनविलेल्या या सुंदर बाप्पाच्या मुर्तीचे सर्वांनी कौतुक केले.

## पुन्हा एकदा मुख्यमंत्री एकनाथ शिंदेच व्हावेत -अर्जुनराव खोतकर



जालना : शिवसेना नेते माजी मंत्री अर्जुन खोतकर यांच्या जालना येथील निवस्थानी लाडक्या बाप्पाचे आगमन झालंय. खोतकर कुटुंबीयांनी वाजत गाजत, फुलांची उधळण करत केले गणरायाचे जोरदार स्वागत केलंय. अर्जुन खोतकर यांनी सपत्नीक मनोभावे पूजा करून गणरायाची प्रतिष्ठापना केलीय. यावेळी गणेश आगमनाचे सर्वांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. आगामी निवडणुकीत पुन्हा एकदा मुख्यमंत्री एकनाथ शिंदेच व्हावे असं साकडं अर्जुन खोतकर यांनी लाडक्या बाप्पाला घातलाय.

## हे गणराया बळीराजाला सुखी समाधानी समृद्ध होऊ दे -आ.बबनराव लोणीकर

**तभा वृत्तसेवा**
**जालना / प्रतिनिधी**

गेल्या वर्षी ऐन पावसाळ्यात जालना जिल्ह्यासह मराठवाड्यात भाग बदलत अनेक महसूल मंडळात पावसाचा वीस ते तीस दिवस खंड पडल्याने आणि गेल्या वर्षी अत्यंत कमी प्रमाणात पाऊस झाल्याने शेती पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. याही वर्षी अतिवृष्टीने शेती पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. शेतकरी बळीराजाच्या पाठीशी राज्य सरकार व केंद्र सरकार खंबीरपणे नक्कीच आहे. पण हे गणराया बळीराजावर आलेले ही संकट टळू दे. बळीराजाला सुखी समाधानी समृद्ध होऊ दे धन धान्य पिकू दे. गणपती बाप्पा नवसाला पावणारा देव आहे. गणपती बाप्पा च्या कृपेनें नक्कीच महाराष्ट्र राज्य भरात सुख शांती आणी समृद्धी नांदेल असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याची माजी मंत्री तथा परतुर विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार बबनराव लोणीकर यांनी केले आहे. ते श्री भक्ती निवास यशवंत नगर जालना येथील निवासस्थानी आज गणरायाचे आगमन झाले याप्रसंगी मनोगत व्यक्त करताना



बोलत होते. पुढे बोलताना आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की स्वातंत्र्यलढ्याच्या काळात भारतीयांना एकत्र करून स्वातंत्र्याची रणनीती बनवण्यासाठी बाळ गंगाधर टिळकांनी गणेशोत्सव सुरू केला होता. आज संपूर्ण भारतात हा सण अगदी थाटामाटात साजरा केला जातो. आज आमच्या निवास स्थानी श्री गणरायाचे आगमन झाले असेल आम्ही गणरायाची सहकुटुंब भक्ती भावे पूजा प्रार्थना केली असून देशभरातील तमाम गणेश भक्तांना गणेश उत्सवाच्या माझ्याकडून हार्दिक शुभेच्छा आहेत.

## संक्षिप्त

### अंबड येथे पर्युषण पर्वाला प्रारंभ ; प.पु.श्रमणमुनि विशेष सागरजी

**तभा वृत्तसेवा**
**अंबड प्रतिनिधी**



दि.८ रविवार रोजी पासून श्री १००८ महावीर भगवान दिगंबर जैन मंदिर तसेच श्री १००८ शांतिनाथ भगवान दिगंबर जैन मंदिर व १००८ चंद्रप्रभू भगवान दिगंबर जैन मंदिर या तीनही मंदिरात पर्युषण पर्वाला प्रारंभ होत असून ते दि.१७ पर्यंत म्हणजे दहा दिवस चालणार आहे.जे आत्म्याला पावण करते,जे पडलेल्यांना उचलते.जो बिघडले त्यांना सुधारण्याचे काम करते जीवनाची दिनचर्या बदलते.अंधाराकडून प्रकाशाकडे वाटचाल करतात त्यालाच पर्व असे म्हणतात पर्वाचे दोन प्रकार आहे.१.शाश्वत,२.अशाश्वत जो पर्व भुतकाळ,भविष्यकाळ आणि वर्तमान काळात अहोरात्र वाटचाल करतात त्याला शाश्वत पर्व असे म्हणतात जे पर्व व्यक्ती विशेष किंवा घटना विशेषशी संबंधित आहे.ते अशाश्वत पर्व आहे.हे उक्त उदगार प.पु.श्रमणमुनि विशेष सागर महाराज ह्यांनी धर्मसभेला संबोधित करताना सांगितले.पुज्य मुनिश्रीनी पुढे असे म्हटले आहे की पर्वाधिराज पर्युषण पर्व वर्षातुन तीनदा येतात भाद्रपद,माघ शुद्ध आणि चैत्र शुध्दी भाद्रपदचे विशेष महत्त्व मानल्या गेलेले आहे.पर्युषण पर्व जैनाचे सर्वात मोठे पर्व मानल्या गेलेले आहे.त्यामुळे ह्याला पर्वाचा राजा किंवा महापर्व असे म्हटल्या जाते पर्युषण पर्वाला दश लक्षण पर्व असे ही म्हटल्या जाते हे पर्व दहा दिवस चालते ह्या दहा दिवसात श्रावक जन विशेष पूजा अर्चना करतात यथाशक्ती व्रत उपवास देखील करतात असे ऐकले व म्हटले जाते की जो मानुस ३६५ दिवस मंदिराला येत नाही तो देखील दहा दिवस मंदीरात जाऊन पूजा अर्चना करतात.पुज्य मुनिश्रीनी पुढे असे म्हटले आहे की तसे तर आपण जितक्या वर्षाचे झाले असेल तेवढ्या पर्युषण पर्व साजरे केले असाल परंतु ह्या वर्षी काही तरी विशेष झाले पाहिजे ह्या वर्षी आपण मंदीरात येऊन कैचीचे नव्हे तर सुईचे काम करायचे आहे.दुसऱ्यांची निंदा नालस्ती करण्यापेक्षा स्वतः ची आल-ोचना करा भेटा आणि भेटू ला जोडा व दुसऱ्याला स्वतः शी जोडा जैन तीन प्रकारचे असतात १.सदैय्या, २.भदैय्या, ३.लदैय्या जो दररोज मंदिरात येतो तो सदैय्या जो फक्त भाद्रपदाच्या दहा दिवस येतात तो भदैय्या परंतु जो फक्त अनंत चतुर्दशीच्या दिवशी येतात त्यांना लदैय्या जैन असतात आपण स्वतः विचार करा आपण कोणते जैन आहेत कोणत्या प्रकारात मोडतात



**तभा वृत्तसेवा**

जालना : बुध्दीची देवता, धार्मिक विधीमध्ये अग्रपूजेचा मान असलेल्या लाडक्या श्री गणरायाचे आ.राजेश टोपे यांच्या घरी आगमन झाले. मंत्रोच्चारात मनोभावे पूजा, आरती केली. आमच्या शेतकरी बांधवांचे अस्मानी संकट दूर होऊ दे, सर्वांना निरामय जीवन लाभू दे असे साकडे आ.राजेश टोपे यांनी घातले.

## आज विद्या भोरजारे यांचे प्रवचन

**प्रतिनिधी दि ६ तभा वृत्तसेवा**
**मुंबई/प्रतिनिधी**



बौद्धजन पंचायत समिती शाखा क्रमांक ७०४ डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती आम्रपाली महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने २८ जुलै २०२४ आषाढ पौर्णिमा ते ६ ऑक्टो. २०२४ अश्विन पौर्णिमा पर्यंत वर्षावास निमित्ताने न्यू.ओसायानिक को .ऑप.हाऊ. सोसायटीच्या टेरेस सम्राट अशोकनगर समेळपाडा नालासोपारा येथे प्रवचन मालिका आयोजित करण्यात आली आहे. दिनांक ८ सप्टेंबर २०२४ रविवार रोजी सायंकाळी ५ ते ७ यादरम्यान आयु. विद्या भोरजारे यांचे धम्म चळवळीमध्ये स्त्रियांचे योगदान या विषयावर धम्म प्रवचन होणार आहे. या प्रवर्तनाचा जास्तीत जास्त बंधू-भगिनींनी लाभ घ्यावा असे आवाहन आयोजकातर्फे करण्यात आले आहे.

## ही तर शिंदे सेनेची सामाजिक दिवाळखोरी

### डॉ.संजय लाखे पाटील यांचा हल्लाबोल : आदित्य ठाकरेंच्या पाहणी दौऱ्याला संबोधले होते स्टंट

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

अतिवृष्टीने नुकसान झालेल्या बदनापूर आणि मंठा तालुक्यातील नुकसानग्रस्त भागाची शिवसेना नेते आदित्य ठाकरे यांनी दोन दिवसांपूर्वी पाहणी केली होती. या पाहणी दौऱ्याला शिंदे सेनेच्या प्रवक्त्याने स्टंट म्हणून संबोधले होते. यावर उध्दव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे सचिव डॉ. संजय लाखे पाटील यांनी समाचार घेत शिंदे सेनेची ही सामाजिक दिवाळखोरी असल्याचा हल्लाबोल केला आहे.

शिवसेना नेते आदित्य ठाकरे यांचा मराठवाड्यातील अतिवृष्टीग्रस्त व आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतशिवार बांधावर पिके, फळबागा यांची प्रचंड हानी, दगावलेली जनावरे, पडलेली घरे, वाहून गेलेले पूल, रस्ते यांच्या नुकसानीची पाहणी करत शेतकऱ्यांच्या दुःखात सहभागी होऊन नाठाळ प्रशासनाला



कामाला लावण्यासाठी तातडीने केलेल्या दौऱ्याला निव्वळ 'स्टंट' आहे, असे म्हणणे हा शिंदे'सेनेचे आमदार आणि प्रवक्ते यांचे 'हाता बाहेर' गेलेली 'मनोरूग्णा'वस्था असून, त्यातूनच ऊपजलेली 'गुंतागुंती'ची शुध्द सामाजिक दिवाळखोरी आहे व हे भारतीय संस्कृतीचा गंधच नसल्याचे ठळक लक्षण असल्याची टीका डॉ. लाखे पाटील यांनी केली आहे.

डॉ. संजय लाखेपाटील म्हणाले की, दुःखी, पिडीत अडचणीत सापडलेले, नैसर्गिक,अस्मानी, सुलतानी संकटग्रस्त ,आपत्तीग्रस्त अशा मानवांना मदत करणे, सहभागी होणे, दुःखात सहवेदना प्रगट करणे हीच तर आपली शेकडो/हजारो वर्षांची महान संस्कृती व संत परंपरा आहे आणि तिचेच पालन सातत्याने ठाकरे परिवार करत आलेला असून, तीच परंपरा आदित्य ठाकरे अतिशय सक्षमतेने आणि सश्रद्धेने पुढे चालवत आहेत आणि याच परंपरेतील त्यांचा हा छत्रपती संभाजी नगर विभागातील पाचोड, जालना, मंठा, परभणी, हिंगोली, नांदेड या आपत्तीग्रस्त भागाचा शेकडो किलोमीटर दौरा होता आणि यात त्यांनी हजारो पिडीत शेतकरी बांधवांच्यावरील संकट समजून घेतले, त्यांना धिर देऊन आधार दिला. प्रशासकीय यंत्रणेला कामाला लावले आणि त्यामुळेच कदाचित त्यातील हिस्सा आ.संजय सिरसाठ किवा मंत्रालयात न पोहोचल्यामुळेच गेंड्याच्या कातडीच्या आ. संजय सिरसाठ यांचा तिळपापड झाला असून, त्यातूनच ते आपत्तीत सहभागी होऊन सहवेदना व्यक्त करण्याला स्टंटबाजी म्हणून आपल्या 'खोके' संस्कृतीचे बिभत्स प्रदर्शन करत आहेत असाही घणाघात डॉ. लाखेपाटील यांनी केला आहे.

### किती मंत्री, आमदार शेत बांधांवर गेले?

आ. सिरसाठ यांनी आपल्या घराचे 'वासे' मोजणीचा धंदा न करता शिंदे फडणवीस यांनी राष्ट्रपतींच्या दौऱ्यात उदगीरमध्ये रोड साइडला दोघांनीच एकत्र केलेले फोटोसेशन वगळता आपल्या सरकारचे किती मंत्री/पालकमंत्री/आमदार हे शेतकऱ्यांच्या बांधावर गेले, शेतशिवारांची पहाणी करून शेतकऱ्यांना धिर दिला, तातडीने शासकीय मदत दिली याचीही माहिती पुराव्यासह जाहीर करावी, असे आवाहन डॉ. लाखेपाटील यांनी केले आहे.

## जि.प.प्रशाला माहोरा येथे शिक्षक दिन उत्साहात संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**माहोरा/प्रतिनिधी**

५ सप्टेंबर २०२४ वार गुरुवार रोजी जि .प . प्रशाला माहोरा येथे डॉक्टर सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शिक्षक दिन व चक्रधर स्वामी जयंती उत्साहात संपन्न झाली . शिक्षक दिनाचे औचित्य साधून जिल्हा परिषद प्रशाला माहोरा येथे स्वयंशासन उपक्रमाचे आयोजन करण्यात आले . इ . १० वी च्या विद्यार्थ्यांनी संपूर्ण शालेय व्यवस्थापना ये कामकाज यशस्वी रित्या पार पाडले . छात्राध्यापक विद्यार्थ्यांनी सकाळी परिपाठापासून सर्व सुत्रे आपल्या हाती घेतली सहभागी सकाळच्या सत्रात छात्राध्यापकांनी ६ तासिके च्या वेळापत्रकानुसार इ . ५ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांना अध्यापन पूर्व तयारी करून अध्यापन केले . परिक्षक शिक्षकांनी छात्राध्यापकांच्या तासिकेचे पाठ निरिक्षण केले . दुपारच्या सत्रात डॉ . सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती साजरी करण्यात आली . या मध्ये विद्यार्थ्यांची मुलाखत घेऊन निवडण्यात आलेले प्राचार्य प्रज्वल बोर्डे याने प्रास्ताविक केले , उपप्राचार्य शिवानी जाधव पर्यवेक्षक राणी कासोद , आकाश जाधव तथा छात्र शिक्षक प्रतिक्षा शेजोळ , साक्षी सास्ते , अदिती तोंडे , प्रतिक्षा पवार , रेणुका बदर , अंजली अवकाळे इत्यादींनी त्यांचे अनुभव मनोगतातून व्यक्त



केले . याप्रसंगी शाळेचे जेष्ठ शिक्षक सुधीर लकडे , मु अ श्रीकृष्ण चेके यांनी मार्गदर्शन केले .छात्राध्यापकांचे कौतुक करून अभिनंदन केले . कार्यक्रमाचे अध्यक्ष आनंद पवार यांनी काव्यातून मार्गदर्शन करून कार्यक्रमाचा सामारोप केला . या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन छात्राध्यापिका राणी कासोद , रुतुजा पवार यांनी केले तर मान्यवरांचे व उपस्थितांचे आभार जान्हवी गावंडे हीने केले या विद्यार्थ्यांना सांस्कृतिक विभाग प्रमुख दिलीप सपकाळ व सुधीर लकडे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेचे शिक्षक गणेश पवार, स्मिता महाळणकर , पंडीत फुसे, मुकुंद लहाने, रामेश्वर खलसे , आरती शर्मा , राजेंद्र जाधव, जयकुमार सोनवणे , मुन्ना बिसेन, किशोर मळेकर, गजानन शेवाळे, सुनिता बडगुजर , संदीप पाटील, मंगेश जाधव , इम्रान सय्यद , भालेकर , किशोर दांडगे इत्यादींनी विशेष परिश्रम घेतले .

## अवैध दारू विक्री करणाऱ्यावर पोलीसांची कारवाई; ४९ हजारांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**

येथील अन्वा ते वाकडी रोडवरील मनापुर फाट्यावर दि ०६ शुक्रवार रोजी रात्री पावणे बाराच्या सुमारास अवैध दारुची विक्री करण्यासाठी वाहतूक करणाऱ्या एकावर भोकरदन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यावेळी पोलिसांनी त्यांच्याजवळून ४९०००/रू किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

याबाबत भोकरदन पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मनापुर येथील गाव हद्दीत अनवा ते वाकडी रस्त्यावर अवैध दारू वाहतूक होत असल्याची खबर्यामार्फत माहिती भोकरदन पोलिसांना



मिळाली असता भोकरदन पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक किरण बिडवे यांनी याबाबत कारवाई करण्याच्या सूचना पोलीस पथकास दिल्या होत्या. पोलीसांनी घटनास्थळी जात कारवाई केली असता त्या ठिकाणी आरोपी राहुल प्रल्हाद गायकवाड रा मनापुर ता. भोकरदन त्यांच्या जवळील मोटर सायकल वर बेकायदा बिगरपरवाना २४०००/- रुपयांचे देशी दारुचे ५ बॉक्स मिळाले. तसेच दारु व मोसा मिळुन ४९ हजार रूपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. भोकरदन पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक किरण बिडवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सागर शिंदे, सफो राऊत व होम/२८४ साजिद यांनी केली आहे सदर गुन्ह्याचा पुढील तपास स.फो.राऊत करत आहेत.

**कार्यालय नगरपरिषद हिंगोली जि.हिंगोली**

फोन नं.(०२४५६)२२१७२७ E-mail:- mchhingoli@gmail.com

विभाग - स्वच्छता/पापु विभाग जा.क्रं.न.नपहि/२६४०/२०२४-२५ दिनांक ०५/०९/२०२४

**ई-निविदा कार्यप्रणाली अंतर्गत निविदा सन-२०२४-२५**

मुख्याधिकारी नगर हिंगोली (दुरध्वनी क्रमांक २४५६-२२७१७) ईमेल coud.hingoli@maharashatra.gov.in या संकेतस्थळावर मागासक्षेत्रा व्यतिरिक्त नागरी क्षेत्रातील सुधारणा (दलितेत्तर) योजना अंतर्गत Repairs work of Raw Water Rising Main at Shiddhanath River.Aundha Dist. Hingoli काम करण्यासाठी ई-निविदा प्रणालीद्वारे सदरील कामासंबंधीत ईपीएफ पंजीकृत अनुभवी गुत्तेदार यांच्याकडून ई-निविदा दिनांक ०६/०९/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजलेपासुन ते दिनांक १२/०९/२०२४ रोजी ५.०० वाजेपर्यंत उपलब्ध आहेत. प्राप्त ई-निविदा दिनांक १३/०९/२०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजता उघडण्यात येतील.

सदरील ई-निविदा विषयी तपशिल महाराष्ट्र शासनाच्या E-Tendering पोर्टलवर व हिंगोली नगरपरिषदेच्या पाणी पुरवठा/स्वच्छता विभागामध्ये कार्यालयीन वेळेमध्ये पाहण्यासाठी उपलब्ध आहे.

स्वाक्षरीत
**मुख्याधिकारी**
नगरपरिषद, हिंगोली

## महामहिम राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू जी यांनी डॉ.भताने' छाया फाउंडेशन च्या कामाचे केले कौतुक

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

डॉ.गोविंद भताने आणि ॲड.महेश भताने यांनी आपल्या आईच्या नावाने डॉ भताने'ज छाया फाउंडेशन या सामाजिक संस्थेची स्थापणा केली आहे. आज या संस्थेच्या कामचा शुभारंभ महामहिम राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू यांच्या शुभेच्छासह करण्यात आला. महामहिम राष्ट्रपती यांनी आपल्या महाराष्ट्र दौर्यादरम्यान राजभवन, मुंबई येथे



छाया फाउंडेशन साठी आपला बहुमुल्य वेळ दिला, तसेच फाउंडेशनच्या भविष्यातील उत्तुंग कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी त्यानी फाउंडेशनच्या पदाधिकार्यांशी तब्बल अर्धा तास संवाद साधला तसेच फाउंडेशनच्या वतीने महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या श्री विठ्ठल रुक्मिणी मूर्ति भेट देऊन महाराष्ट्रात राष्ट्रपती महोदयांचे स्वागत केले. या भेटीदरम्यान अनेक महत्वपूर्ण विषयांवर चर्चा झाली. भारतातील डेंटल डॉक्टरांच्या अडचणी व मागण्या, डेंटिस्ट्री संदर्भातील जीरश्र हू-सळशपश ाळींळेप, सिकल सेल रुग्णाची उपचार पद्धती, तसेच डॉक्टरांवर होणारे भ्याड हल्ले, अशा विविध विषयांवर सविस्तर चर्चा झाली. तसेच कलकत्ता येथील रेसिडेंट डॉक्टर वरील अत्याचार प्रकरणा संदर्भात निवेदन देण्यात आले. हे प्रकरण अतिशय घृणास्पद असुन त्यावर करवाईचे निर्देश दिले असल्याचे महामहिम राष्ट्रपती यांनी सांगितले. तसेच डॉक्टराना सुरक्षित वातावरणात काम करता यावे, यासाठी शक्य ते आपण लवकरात लवकर करू, असे आश्वासन त्यांनी याप्रसंगी दिले. छाया फाउंडेशन च्या माध्यमातून भविष्यात करण्यात येणाऱ्या कामाबद्दल महामहिम राष्ट्रपती यांनी औस्तुक्याने जाणून घेतले, तसेच डॉ गोविंद भताने यांचे मन:पूर्वक कौतुक केले.

या शिष्टमंडळात संस्थेचे संचालक डॉ. गोविंद भताने (दंतशल्य चिकित्सक), ॲड. महेश भताने ( विधीज्ञ ) आणि डॉ. विन्कि रूघवानी (प्रशासक, मेडिकल कौंसिल, महाराष्ट्र) , सहभागी होते.

सोलापूर
तरुण भारत



# आरोग्यम् धनसंपदा



**वय वाढणे, काही विशिष्ट प्रकारची औषधे, जीवाणूंचा संसर्ग, मधुमेह आणि हार्मोन्सचे असंतुलन यासारखे आजार तसेच मेनिन्जायटिस, गोवर, गलगंड इत्यादी आजारांचा परिणाम ऐकण्याच्या क्षमतेवर होऊ शकतो. तसेच मोठ्या किंवा तीव्र आवाजाच्या संपर्कात सतत राहणे हे देखील एक कारण आहे.**

## समस्या बहिरेपणाची

**का**नाचे तीन भाग असतात. बाह्य कान, मध्य कान आणि अंतर्गत कान. बाह्य कान वातावरणातून ध्वनितरंगांच्या रूपाने आवाज ग्रहण करतो. हे तरंग कॅनलमधून जाऊन इअर ड्रमपर्यंत पोहोचतात. त्यामुळे इअर ड्रम कंप पावू लागतो. या कंपनांमुळे मध्य कानात असणार्या तीन अतिशय छोट्या हाडांमध्ये गती निर्माण होते आणि या गतीमुळे कानातील अंतर्गत भागात असणारे द्रव हलणे सुरू होते. आतील कानात हिअर सेल्स अर्थात ऐकण्याची क्षमता असणार्या पेशी असतात. त्या या द्रवाच्या गतीमुळे थोड्या वळ-तात आणि इलेक्ट्रिक पल्सच्या रूपात मेंदूकडे संदेश पोहोचवतात. हा संदेश आपल्याला शब्द आणि ध्वनीच्या रूपात ऐकू येतो.

**नुकसान होण्याचे प्रकार :** हिअरींग लॉस म्हणजे ऐकू येण्यातील दोष होय. ते दोन प्रकारचे असू शकते.

**१) कंडक्टीव्ह हिअरींग लॉस :** कानाच्या बाहेरील आणि मधल्या भागातून आलेल्या एखाद्या समस्येमुळे ही प्रक्रिया घडते. याला आजारपणामुळे होणारे बहिरेपण देखील म्हणतात. याची कारणे म्हणजे कानातून पू वाहणे किंवा संसर्ग होणे, कानांच्या हाडात काही गडबड होणे, कानाच्या पडद्याचे नुकसान होणे म्हणजे त्याला छिद्र पडणे किंवा गाठ होणे.

**२) सेन्सरी न्युरल हिअरींग लॉस :** आतील भागात निर्माण झालेल्या बिघाडामुळे ही समस्या उद्भवते. हिअर सेल्स नष्ट होऊ लागतात किंवा योग्य प्रकारे काम करू शकत नाही, तेव्हा असे होते. कानात जवळपास १५ हजार विशिष्ट हिअरींग सेल्स असतात. त्यानंतर मज्जातंतू असतात. त्यांच्यामुळेच आपण ऐकू शकतो. वय वाढते तसे या पेशी क्षीण आणि नष्ट होऊ लागतात. त्यामुळे मज्जातंतूही कमकुवत बनून ऐकण्याची शक्ती कमी होते.

वय वाढणे, काही विशिष्ट प्रकारची औषधे, जीवाणूंचा संसर्ग, मधुमेह आणि हार्मोन्सचे असंतुलन यासारखे आजार तसेच मेनिन्जायटिस, गोवर, गलगंड इत्यादी आजारांचा परिणाम ऐकण्याच्या क्षमतेवर होऊ शकतो. तसेच मोठ्या किंवा तीव्र आवाजाच्या संपर्कात सतत राहणे हे देखील एक कारण आहे. सामान्यतः, ऐकण्यासाठी आपल्याला काही अडचण येत आहे हे समजते तोपर्यंत आपल्या ३० टक्के पेशी नष्ट झालेल्या असतात.

**लक्षणे :** ऐकण्याची क्षमता कमी होण्याची सुरुवातीची लक्षणे फारशी सुस्पष्ट नसतात. मात्र, ऐकण्याच्या क्षमतेत आलेली कमतरता काळानुसार आणखी कमी होत जाते याकडे लक्ष द्यावे. अशा वेळी शक्य तितक्या लवकर इलाज केला पाहिजे. सामान्य बोलणे ऐकण्यात अडचण होत असेल तर डॉक्टरांना भेटणे इष्ट ठरते. संसर्गामुळे ऐकण्याची क्षमता कमी झाली असेल तर औषधाने ती बरी करता येते. पडदा डॅमेज झाला असेल तर शस्त्रक्रिया करावी लागते. बरेचदा यावर औषधांनीही उपचार होऊ शकतो. मज्जातंतूंचे नुकसान झाले असेल तर ते बरे करता येत नाही. अशा वेळी हिअरींग एडचा वापर करता येऊ शकतो. यामुळे त्वरित उपचार होतो आणि समस्येत वाढ होणे रोखता येऊ शकते. हिअरींग एडचा वापर केला नाही तर मज्जातंतूंवरील ताण वाढतो आणि समस्या वाढत जाते. ऐकण्याची क्षमता जन्मतःच कमी असण्याची शक्यता असते म्हणून प्रत्येक मुलाच्या ऐकण्याच्या क्षमतेची तपासणी केली पाहिजे.

यासाठी नाक, कान, घसा तज्ज्ञांकडून तपासणी करून घेणे आवश्यक आहे. ६ महिन्यांपर्यंत मूल आवाजाकडे लक्ष देत नसेल किंवा दोन वर्षे वयापर्यंत एकही शब्द बोलू शकत नसेल तर त्वरित तपासणी करावी. पाच वर्षांपर्यंत मुलांच्या ऐकण्याच्या, समजण्याच्या आणि बोलण्याच्या क्षमतेचा पूर्ण विकास होतो. त्यासाठी याच वयापर्यंत त्याच्या ऐकण्याच्या क्षमतेत सुधारणा झाली तर चांगले असते.

**ऐकण्याची क्षमता कशी चांगली राखाल?**

जन्मतःच मुलांच्या कानांची तपासणी करावी. ४५ वर्षांनंतर कानांची नियमित तपासणी करावी. अधिक आवाजाच्या ठिकाणी काम करत असल्यास कानांना संरक्षण कवच वापरावे. त्यासाठी इअर प्लगचा वापर करावा. ९० डेसिबलपेक्षा कमी आवाज कानांसाठी ठीक असतो; मात्र यापेक्षा जास्त आवाज नुकसानदायक असतो त्यापासून दूर रहावे. हेडफोनद्वारे किंवा इअर बडच्या मदतीने जास्त काळ ऐकू नये. यामुळे ऐकण्याच्या क्षमतेवर परिणाम होतो. संगीत ऐकताना आवाज नेहमी मध्यम किंवा कमी ठेवावा. ऐकण्याची क्षमता चांगली राहाण्यासाठी अनुलोम, विलोम, कपालभाती, भस्त्रिका आणि भ्रामरी प्राणायाम अतिशय लाभकारी आहे. यामध्ये भ्रामरी विशेष लाभदायक ठरते.

चेहर्‍यावर सूज येणं, लघवी कमी होणं, लघवीला पुन्हा पुन्हा जावं लागणं, स्त्रियांना विटाळ कमी जाणं, अंगाला खाज सुटणं, त्वचा फाजील स्निग्ध दिसणं, कार्यशक्ती कमी होणं, विश्रांती घ्यावीशी वाटणं, जास्त झोप येणं, अंगाला घाण वास मारणं अशी लठ्ठपणा येण्याची लक्षणं असू शकतात. लठ्ठपणावर उपाय करायला सुरुवात करण्यापूर्वी प्रथम वजन पाहणं आवश्यक आहेच, पण त्याचबरोबर कोणते स्नायू शिथिल आहेत, कुठे चरबी वाढली आहे हेही पाहायला हवं, त्यामुळे नेमका व्यायाम सुचवणं सोपं जातं.

## योगाद्वारे घ्या हृदयाची काळजी

**त**शा **स**रळ योगाद्वारे आपण हृदयाची काळजी कशी घेऊ शकतो. हे जाणून घेऊया...

**हृदयाच्या गतीवर परिणाम :-**
अनेक कारणांमुळे हृदयाची धडधड वेगवान किंवा मंद होते, ज्यामुळे हृदयात विकार निर्माण होतात. भीती, उत्तेजना, ताप, लैंगिक इच्छा किंवा कृती, खाणे, अतिव्यायाम अशा अनेक आजारांमध्ये हृदयाची गती वाढते. त्रास, अशक्तपणा आणि उपवासामुळे हृदय गती कमी होते. अनेक औषधांच्या सेवनामुळे हृदय गती वाढते आणि कमी होते. एखादे भयंकर दृश्य पाहिल्याने किंवा काही दुःखद बातमी ऐकून अचानक हृदयाची धडधड पूर्णपणे थांबते.

**हृदयविकाराचा झटका का येतो :-**
वेगवेगळ्या कारणांमुळे आणि लक्षणांमुळे हृदयाच्या धमन्यांमध्ये अडथळा निर्माण होण्यास 'हृदयविकाराचा झटका' म्हणतात. खाण्यापिण्याच्या चुकीच्या सवयी, कोलेस्ट्रॉल वाढणे, जास्त ताण, स्नायूंचा ताण इत्यादी अनेक कारणांमुळे हृदयविकाराचा झटका येतो.

**हृदयरोगावर उपचार :**
तुम्हाला हृदयविकार असल्यास काळजी घ्या. अल्कोहोल, मांस इत्यादी आणि मसालेदार आणि तिखट पदार्थांचे सेवन करू नका. मिठाई खाऊ नका. मीठ आणि स्निग्ध पदार्थ टाळा. फक्त फळे आणि भाज्यांच्या रसांवर काही दिवस जगा. शक्य असल्यास, फक्त फळे, भाकरी आणि दुधी भोपळ्याची भाजी खा. सकाळ- संध्याकाळ लिंबू पाणी, लिंबू-गरम पाणी-मध, कोणत्याही फळाचा किंवा भाजीचा रस प्या.

**१. खबरदारी :** सर्दी टाळा. कफ होऊ देऊ नका. पोट स्वच्छ ठेवा. कमी बोला. आवाज, धूळ, धूर आणि तीव्र सूर्यप्रकाश टाळा.

**२. योगासन :** शरीराचे अवयव हलवा. शवासन आणि पर्वतासन करा. जेव्हा तुम्ही निरोगी असाल तेव्हा सामान्य आसने करा ज्यात वज्रासन, उस्त्रासन, शलभासन, मकरासन, पवनमुक्तासन, मत्स्यासन, सिंहासन इ. सोयीनुसार सराव वाढवा. शेवटी ५ ते १० मिनिटे शवासन करा.


**३. प्राणायाम :** नाडी-शोधन, कपालभाती आणि भ्रामरी हळूहळू नियमित करा.

**४. योग निद्रा :** शवासनामध्ये २०-४० मिनिटे योग निद्रा करा. त्यानंतर अर्धा तास मनोरंजक शांत संगीत ऐका.

तुम्हाला हृदयविकार नसल्यास : नेहमी निरोगी आणि मजबूत राहण्यासाठी प्राणायाम, आसने, आहार संयम, योग निद्रा आणि ध्यान यांना तुमच्या जीवनाचा एक भाग बनवा. तणावमुक्त जीवन जगा. तणावमुक्त राहण्यासाठी नाडीशोधन प्राणायाम करा आणि शरीर मजबूत ठेवण्यासाठी सूर्यासन किंवा सूर्यनमस्कार करा.

**आहार संयम :** शक्य तितक्या कमी अन्न खा. तुमचे वजन जास्त असेल तर ते कमी करा. या आजारात उपवास टाळा, म्हणून फक्त फळे आणि भाज्यांचे रस, मध, मनुका, अंजीर, गाईचे ताजे दूध इ. दररोज आपल्या आहारात भरपूर सॅलड वापरा. सॅलड आंबट नसावे.

तुम्ही जे काही खाता ते कमी प्रमाणात खा, चघळत आणि हळूहळू. जेवताना पाणी कमी प्या. जेवल्यानंतर अर्धा ते एक तास पाणी प्या. रात्रीचे जेवण झोपण्याच्या अडीच तास आधी घ्या. आनंदी मूडमध्ये अन्न खा. बोलू नका. राग करणे आणि मोठ्याने बोलणे थांबवा.



## 'गुळ' आणि त्याचे औषधी उपयोग

**महाराष्ट्रात उसाचे जास्त उत्पादन घेतले जाते. बहुधा हवामान आणि माती त्याला पूरक आहेत म्हणून. हिरवेगार उसाचे मळे आणि त्यात लांब रसरसीत ऊस बघायला आणि खायला गोड लागतात. या उसाचे फायदेसुद्धा अनेक आहेत. उसाचा थंडगार रस, गोड रसरसीत काकवी आणि कडक गुळ या सर्वांचा आस्वाद घ्यायला मजा येते. पण सर्वात लांब पट्टा गाठला गूळ या पदार्थाने. गूळ हा सर्व स्वयंपाकघरात अवश्य आढळतो. एवढेच नाही तर देवाच्या मंदिरातसुद्धा गूळ खोबर्‍याचा मोठा मान आहे. गूळ जेवणात आणि एक न्याहरीचा प्रकार म्हणून खाल्ला जातो. भारतीय जेवणात गुळाचा वापर प्रकर्षाने केला जातो. भारताच्या निर्यात यादीत पहिला मान पटकवणारा पदार्थ गूळ आहे. चला बघूया या बहुगुणी गुळाचे फायदे.**



**रक्ताची शुद्धी -** नियमित आणि योग्य प्रमाणात गुळाच्या सेवनाने आपले रक्त शुद्ध होण्यास मदत होते. रक्तामधील हिमोग्लोबिन वाढते. रक्तदाब आणि शरीरातील विषाणू यावर नियंत्रण ठेवण्यास मदत मिळते.

**उत्तम पचन क्रिया -** गूळ आपल्या पचन शक्तीची ऊर्जा वाढवते आणि त्यामुळे पचन व्यवस्थित होते. हिवाळ्यात गूळ जरूर खावा. कारण त्यावेळी शरीराची पचनक्रिया मंदावते आणि गुळामुळे ती पूर्ववत होण्यास मदत होते. बद्धकोष्ठता आणि अपचन यावर गूळ तर रामबाण उपाय आहे.

**ऊर्जा स्त्रोत -** साखर ही फक्त गोडवा देते आणि एक आधुनिक प्रकार आहे. मात्र, गुळात नैसर्गिकता जास्त असल्यामुळे तो शरीराला हळूहळू आणि दीर्घ काळापर्यंत ऊर्जा देतो. गुळाने थकवा जाणवत नाही व स्नायू बळकट बनतात.

**हाडांचा मित्र -** गूळ जर आल्याबरोबर खाल्ला तर सर्व प्रकारच्या सांधेदुखीपासून आराम मिळू शकतो. दूध आणि गूळ हे एकत्रित हाडांसाठी एक मजबूत उपाय आहे.

**अर्धशिशी थांबते -** ज्या लोकांना अर्धशिशीचा त्रास आहे, त्यांनी गूळ आणि शुद्ध तूप एकत्रित रिकाम्या पोटी खाल्ल्याने आराम मिळतो. गूळ हा अशावेळी लाभदायक ठरतो.

**वजन कमी करण्यासाठी -** गुळात भरपूर प्रमाणात खनिज आहे. त्यात आढळलेल्या पोटॅशियम या घटकामुळे शरीरातील चयापचय वाढते आणि वजन कमी होण्यास मदत होते. शरीराची पाणी जतन करून ठेवण्याची सवयसुद्धा गुळाने मोडण्यास मदत करते व आपले वजन कमी होते.

**सर्दी-खोकल्यावर गुणकारी -** साधारण सर्दी-खोकला झाला असल्यास गुळाच्या चहाने किंवा गूळ मिश्रित गरम पाणी पिल्याने आराम पडतो. रात्री झोपण्याआधी गुळ चोखून खाल्ल्याने खोकल्यापासून आराम मिळेल.

**रक्तक्षय टाळतो -** गुळात प्रचंड प्रमाणात लोह आहे. तो खाल्ल्याने शरीरातील लोह कमतरता भरून येते. त्याच्या सेवनाने लाल रक्तपेशी वाढण्यास मदत होते व अशक्तपणा जाणवत नाही. थकवा आणि ऊर्जेची कमी असे विकार गूळ खाल्ल्याने होत नाहीत.

**स्त्रियांसाठी उपयुक्त -** मासिक पाळीच्यावेळी होणार्या वेदना आणि पोटदुखीवर गूळ खूप गुणकारी आहे. त्याचे सेवन हे सर्व दुखणे कमी करण्यास मदत करतात. ओटीपोटातील दुखणे, स्नायू दुखणे, अस्वस्थ वाटणे अशा प्रकारच्या सर्व गोष्टींवर गूळ हा सोपा आणि स्वस्थ उपाय आहे.

**त्वचा आणि केसांचे आरोग्य -** सुंदर, लांब सडक आणि चमकदार केसासाठी गुळाचे सेवन आवश्य करा. जीवनसत्त्वे आणि खनिजे यांनी भरलेला गूळ त्वचेवर एक छान चमक आणतो आणि सर्व मुरुम, पुरळ आणि डाग नाहीसे करण्यास मदत करतो. रसायनमुक्त आणि पोषक गूळ आरोग्यदायी आहे. पण आपल्याला मधुमेह किंवा अन्य काहीही आजार असेल तर डॉक्टरांचा सल्ला घेऊनच पुढचे पाऊल टाकणे फायद्याचे ठरेल.

## व्हर्टिगो अ‍ॅटॅक म्हणजे काय?



**व्ह**र्टिगो ही सवसामान्य समस्या आहे. यात चक्कर येणे आणि रक्तदाब कमी होणे यासारख्या अडचणी येतात. व्हर्टिगो कोणालाही होऊ शकतो. व्हर्टिगो ही एक मेडिकल कंडिशन असून त्यात रक्तदाब कमी होण्यामुळे अशक्तपणा येऊ शकतो. व्हर्टिगोचा अर्थ चक्कर येणे, फिरणे. या स्थितीत रुग्णाला चक्कर येते. डोकेदुखीबरोबरच चक्कर येते आणि तोल जातो. व्हर्टिगोचे लक्षणे पाहिल्यास अस्थिर किंवा असंतुलित जाणवणे, उंचीची भीती वाटणे, कमी ऐकू येणे, पडण्याची भीती वाटणे, अधिक आवाजाने डोकेदुखी, चक्कर येणे अशी काही दिसून येतात.

**बीपीपीव्ही :** बिनाईन पॅराऑक्सिमल पोझिनशनल व्हर्टिगो म्हणजेच बीपीपीव्ही. यात कानाातील शिरात कॅल्शियम कॉर्बोनेटचा कचरा जमा होतो. वयस्क रुग्णांत बीपीपीव्हीचे कारण अधिक असते.

**मेनियार्स :** मोनियार्स व्हर्टिगो हा कानाच्या आतील भाग आहे. तो ऐकण्याच्या शक्तीवर परिणाम करतो आणि कानात आवाज येत राहतो. त्यामुळे काही तासांत चक्कर येण्याची शक्यता रा-हते. कानात साचलेल्या पाण्यामुळे हा त्रास होतो.

**वेस्टीब्यूलर मायग्रेन :** वेस्टीब्यूलर व्हर्टिगोचे कारण सामान्य आहे. चक्कर येणे, डोकेदुखी होणे हे सामान्य लक्षणे आहेत. ते सर्वांत दिसतात. यात रुग्ण हा अतिप्रकाश आणि आवाज सहन करू शकत नाही.

**लेब्रिथिनायटिस :** ही एक कानातील समस्या असून ती सर्वसाधारपणे संसर्गाशी निगडीत आहे. हा संसर्ग शिरेजवळ कानात सूज येण्यास कारणीभूत ठरू शकते

## गरोदरपणातील पाठदुखी

**ग**रोदरपणात अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. त्यामध्ये पाठदुखी ही काही जणींना मोठ्या प्रमाणात होत असते. गरोदरपणात पाठदुखीचे प्रमाण अगदी ९० ते ९५ टक्क्यांपर्यंत आहे. त्यापैकी ५० टक्के महिलांना पाठीच्या खालच्या भागाचे दुखणे सहन करावे लागते. डॉक्टरांच्या मते महिला आपल्या पहिल्या प्रसूतीच्या वेळी पाठीच्या खालच्या भागातील दुखण्याला सामोर्‍या जातात. साधारणपणे गरोदरपणाच्या पाचव्या ते सातव्या महिन्यादरम्यान ही पाठदुखी दिसून येते. गरोदरपणात ज्या स्त्रियांना शारीरिक कष्टाचे काम करावे लागत असेल, त्यांना या अवस्थेत पाठदुखी होण्याचा संभव असतो. म्हणजेच कोणत्याही प्रकारची अतिरेकी हालचाल होता कामा नये.

या पाठदुखीमध्ये तरुण वय आणि आधी झालेल्या अनेक प्रसूती हे कारण आहे. या दुखण्याकडे दुर्लक्ष केल्यास मातेच्या आरोग्यावर परिणाम होऊ शकतो.

गरोदरपणात पाठदुखी नियंत्रणात ठेवण्यासाठी बसताना किंवा उभे राहताना, चालताना अथवा झोपताना शरीराला सुयोग्य स्थितीत ठेवावे. पाठीच्या खालच्या भागातील दुखणे उद्भवू नये यासाठी प्रयत्न करावा. गरोदरपणात खूप काळ बसलेल्या स्थितीत राहाणे म्हणजे पाठदुखीला निमंत्रण. त्यामुळे इकडे तिकडे फिरणे योग्य ठरते.

तुमच्या पाठीच्या कण्यावर अतिरिक्त भार येतो आणि पाठदुखी वाढते. केव्हाही बसताना पाठीच्या मागे उशी ठेवा. जेणेकरून तुमच्या पाठीला आधार मिळू शकेल. गरोदरपणात पाठदुखी असल्यास सुरुवातीपासूनच डॉक्टरांच्या निरीक्षणाखाली आणि सल्ल्यानुसार पाठीचे आणि ओटीपोटीचे व्यायाम करावेत. डॉक्टरांनी दिलेल्या वेळेनुसारच हे व्यायाम करावे. यामुळे तुमच्या शरीराचा बांधा सुयोग्य राखतील आणि तुमची दैनंदिन कामे करणे तुम्हाला सोपे जाईल.



# युक्रेन भेटीचा संदेश काय?

**विश्वसंचार**

प्रा. डॉ. विजयकुमार पोटे

**युद्ध हा कोणत्याही समस्येवरचा मार्ग नाही; संवादाचे दरवाजे खुले ठेवणे तसेच वाटाघाटी आणि शांततेच्या मार्गानेच युद्धातून मार्ग काढणे महत्त्वाचे आहे, हे नरेंद्र मोदी यांनी ताज्या युक्रेन दौऱ्यात पुन्हा बजावून सांगितले. त्याचा काही परिणाम होतो का, हे आता पाहायचे. दरम्यान, व्यापारीदृष्ट्या महत्त्वाच्या युक्रेनबरोबर झालेल्या ताज्या करारांमुळे कृषी, अन्न उद्योग, औषध, संस्कृती आदी क्षेत्रांमध्ये सहकार्य सुनिश्चित होईल.**



गेल्या अडीच वर्षांपासून रशिया आणि युक्रेनमध्ये युद्ध सुरू असून युद्धाच्या झळा या दोन देशांपुरत्याच मर्यादित राहिलेल्या नाहीत; अवघे जग त्यात होरपळत आहे. भारताने या युद्धाबद्दल थेट रशियाचा निषेध केला नसला, तरी युद्ध हा कोणत्याही समस्येवरचा मार्ग नाही. संवादाचे दरवाजे खुले ठेवणे हाच मार्ग असल्याचे वारंवार स्पष्ट केले आहे. रशिया हा भारताचा जसा मित्र आहे, तसाच युक्रेनही व्यापारीदृष्ट्या भारतासाठी महत्त्वाचा देश आहे. त्यामुळे दोन्ही देशांशी भारताला चांगले संबंध ठेवायचे आहेत. त्यामुळे तर तिसऱ्यांदा सत्तेत आल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रशियाचा दौरा केला आणि त्यानंतर आता युक्रेनला भेट दिली. सोव्हिएत महासंघातून १९९२ मध्ये बाहेर पडल्यानंतर युक्रेन हा देश स्वतंत्र झाला. स्वतंत्र राष्ट्र झाल्यानंतर युक्रेनला भेट देणारे मोदी हे पहिलेच भारतीय पंतप्रधान आहेत. साहजिकच पंतप्रधानांच्या युक्रेन दौऱ्याकडून सर्वांना मोठ्या अपेक्षा होत्या. तेथे रवाना होण्यापूर्वी खुद्द मोदी खूप उत्साहात होते. युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोडिमिर झेलेन्स्की यांना भेटण्यास उत्सुक असल्याचे त्यांनी सांगितले होते. झेलेन्स्की यांनी त्यांचे अतिशय प्रेमाने स्वागत केले आणि तेथील युद्ध परिस्थितीची माहिती दिली. दोन्ही नेत्यांमधील चर्चेत युद्ध थांबविण्याचे मार्ग शोधण्यावर भर होता. वाटाघाटी आणि शांततेच्या मार्गानेच युद्धातून मार्ग निघू शकतो, असा कानमंत्र पुन्हा मोदी यांनी झेलेन्स्की यांना दिला आहे. दोन्ही देशांनी चार करारांवर स्वाक्षऱ्याही केल्या. या करारांमुळे कृषी, अन्न उद्योग, औषध, संस्कृती आणि मानवतावादी सहाय्य या क्षेत्रात सहकार्य सुनिश्चित होईल.

पंतप्रधानांच्या युक्रेन दौऱ्यावर जगाचे लक्ष होते. कारण रशिया आणि युक्रेनमध्ये सुरू असलेले युद्ध केवळ भारतच थांबवू शकतो, हे सुरुवातीपासूनच अधोरेखित केले जात होते; मात्र भारत सुरुवातीपासूनच दोन्ही देशांच्या राष्ट्रप्रमुखांना युद्धाचा मार्ग सोडण्याचे आवाहन करत आहे. युक्रेनला रवाना होण्यापूर्वीच पंतप्रधान म्हणाले होते की, ही युद्धाची वेळ नाही. युद्ध कोणतीही समस्या सोडवू शकत नाही. युक्रेनपूर्वी पंतप्रधान रशियालाही गेले होते. तेव्हा झेलेन्स्की यांनी नाराजी व्यक्त केली होती. रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतिन हे जगातील सर्वात मोठे गुन्हेगार असल्याचे सांगून मोदी यांनी त्यांना मिठी मारल्याबद्दल त्यांनी टीका केली होती; पण आता ते भारतासोबतचे संबंध अधिक दृढ करण्यासाठी उत्सुक दिसत होते. पंतप्रधानांचा युक्रेन दौरा अशा वेळी झाला, जेव्हा युक्रेनने रशियन प्रदेशांवर हल्ले तीव्र केले आहेत. हे पाहता पंतप्रधानांच्या आवाहनाचा युक्रेन किंवा रशियावर कितपत परिणाम होईल, हे सांगणे कठीण आहे. यापूर्वी अनेक प्रसंगी मोदी यांनी पुतिन यांना फोनवर किंवा समोरासमोर बोलून युक्रेनवरील हल्ले थांबविण्याचे आवाहन केले आहे. नुकत्याच झालेल्या रशियाच्या दौऱ्यातही मोदी यांनी पुतिन यांना असेच आवाहन केले होते; पण आजपर्यंत असा एकही प्रसंग दिसला नाही, जेव्हा रशियाने भारताच्या आवाहनाबाबत गांभीर्य दाखवले असेल. शांघाय शिखर परिषदेदरम्यान समोरासमोर चर्चेनंतर पुतिन यांनी भारतीय पंतप्रधानांचे आवाहन गांभीर्याने घेतल्याचे दिसत होते; मात्र तेथून परतताच त्यांनी युक्रेनवरील हल्ले अधिक तीव्र केले.

रशिया आणि युक्रेनमध्ये सुरू असलेल्या संघर्षाचा परिणाम संपूर्ण जगावर झाला आहे. युक्रेनमध्ये मोठ्या प्रमाणात नागरिक मारले गेले आहेत, त्यांच्या मालमत्तेचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. युक्रेनचा व्यापार विस्कळीत झाला आहे. त्याला युद्धबंदीचा करार हवा आहे, पण तो रशियाच्या अटी मान्य करायला तयार नाही. युक्रेनने 'नाटो'चे सदस्यत्व सोडावे, अशी रशियाची अट आहे. दोघांपैकी कोणीही कोणत्याही प्रकारे झुकायला तयार दिसत नाही. अशा स्थितीत आपण वाटाघाटीसाठी कसे बसू शकतो, हा सर्वात कठीण प्रश्न आहे. भारतालाही त्यांच्यासाठी संवादाचा मार्ग शोधणे सोपे नाही; पण पंतप्रधानांनी दोन्ही देशांचे एक एक करून केलेले दौरे आणि युद्धाचा मार्ग सोडण्याचे केलेले आवाहन यामुळे जागतिक बंधुतेचा मार्ग मोकळा झाला आहे. रशिया आणि युक्रेन काहीसा लवचीक दृष्टिकोन स्वीकारतील आणि करारासाठी मध्यम मार्ग अवलंबण्यास सहमत होतील, अशी अपेक्षा आहे. युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष झेलेन्स्की यांच्या खांद्यावर हात ठेवून पंतप्रधान मोदींनी एक-दोन नव्हे तर तीन महत्त्वाची पावले उचलली आहेत. मोदी यांनी झेलेन्स्की यांच्याशी अर्थपूर्ण चर्चा केली आणि रशियासोबत सुरू असलेले युद्ध संपविण्यासाठी वैयक्तिकरीत्या योगदान देण्याचे आश्वासन दिले. मोदी यांनी 'एक्स'वर लिहिले की, युक्रेन भेट ऐतिहासिक होती. भारत-युक्रेन मैत्री आणखी घट्ट करण्याच्या उद्देशाने मी या महान देशात आलो आहे. माझे झेलेन्स्की यांच्याशी फलदायी संभाषण झाले. शांतता कायम राहिली पाहिजे, यावर भारताचा ठाम विश्वास आहे.

मोदी यांनी झेलेन्स्की यांच्याशी व्यापक चर्चा केली. २४ फेब्रुवारी २०२२ रोजी रशियाने युक्रेनवर हल्ला केला. तेव्हापासून आजतागायत दोन्ही देशांमध्ये युद्ध सुरूच आहे. मोदी आणि झेलेन्स्की यांनी युक्रेनमधील शांतता आणि सुरक्षेबाबतही चर्चा केली. रशिया-युक्रेन युद्धादरम्यान भारत तटस्थ किंवा उदासीन प्रेक्षक नव्हता आणि नेहमीच शांततेच्या बाजूने होता, असे मोदी म्हणाले. दोन्ही देशांच्या प्रमुख नेत्यांची भेट जगासाठी मोठा संदेश आहे. त्यांच्यातील द्विपक्षीय बैठकीमुळे दोन्ही देशांमधील संबंध अधिक दृढ होतील. रशियासोबतच्या युद्धावर शांततापूर्ण वाटाघाटीतून तोडगा काढण्याच्या दिशेने दोन्ही देश वाटचाल करतील. मोदी यांच्या युक्रेन आणि पोलंड दौऱ्यानंतर अमेरिकेसह पाश्चात्त्य देशांना खात्री पटली आहे की, भारत युक्रेनसोबत एकत्र पुढे जात आहे. म्हणजे भारताचा कल ना रशियाकडे आहे ना पाश्चात्त्य देशांकडे. जागतिक राजकीय पटलावर भारत तोच मार्ग स्वीकारेल, जो भारत आणि जगासाठी चांगला असेल, हे सर्व देशांना कळून चुकले आहे. आज तीन आघाड्यांवर भारताची नजर आहे. पहिली गोष्ट म्हणजे युरोपच्या शांतता उपक्रमात भारताचा समावेश करणे. दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे युक्रेनवरील रशियन आक्रमणामुळे निर्माण झालेल्या जागतिक भू-राजकीय गोंधळात भारताचा सहभाग वाढविणे आणि तिसरा मुद्दा सोव्हिएत काळापासून थंडावलेले युक्रेनसोबतचे भारताचे राजनैतिक संबंध पुनरुज्जीवित करणे.

युक्रेनमधील युद्ध संपविण्याच्या प्रश्नावर पंतप्रधान मोदी यांच्याकडे कोणतीही भव्य योजना नाही, असे पूर्वी दिसत होते. युद्ध आणि शांतता या विषयावर झेलेन्स्की यांच्याशी दीर्घ आणि सखोल चर्चेसाठी मोदी यांचा वॉर्सा ते युक्रेन ते कीव असा लांब रेल्वे प्रवास हा एक महत्त्वाचा टप्पा मानला गेला. कीवला दुसरी शांतता योजना हवी होती. मोदी यांनी युक्रेनच्या चिंता समजून घेतल्या. राष्ट्र म्हणून अस्तित्वाच्या दृष्टीने त्या महत्त्वाच्या होत्या. युक्रेनला या मुद्यावर भारताकडून पाठिंबा मिळत नव्हता. झेलेन्स्की यांना आशा आहे की, युक्रेनचे प्रकरण ऐकण्यासाठी आणि शांतता प्रयत्नांना हातभार लावण्याची मोदी यांची इच्छा त्यांच्याबद्दल सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करेल. कारण युद्धाचे प्रचंड आर्थिक परिणाम असूनही दक्षिणेतील मोठा भाग अलिप्त राहिला आहे. दुसरीकडे युक्रेनमधील युद्धाचे भू-राजकीय परिणाम समोर येत असताना, मोदी यांची कीव भेट हे जगाला नव्याने आकार देणाऱ्या संघर्षात भारत यापुढे मूक प्रेक्षक म्हणून राहणार नाही, याचे द्योतक आहे. मोदी वॉर्सा ते कीव असा प्रवास करत असताना चीनचे पंतप्रधान ली कियांग मॉस्कोला भेट देत होते. युक्रेनमधील युद्धाची रूपरेषा तयार करण्यात चीनच्या वाढत्या भूमिकेची ही झलक आहे. भारत आपल्या हिताला महत्त्व देत आहे. अमेरिकेत युरोपपासून दूर जाण्याच्या रिपब्लिकन कल्पनेला आता डेमोक्रॅट्सकडून आव्हान दिले जात आहे. त्या चर्चेच्या निकालाचा भारताच्या सुरक्षा धोरणावर मोठा परिणाम होईल.

सरत्या आठवड्यात संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या वॉशिंग्टनमधील उपस्थितीने अमेरिकेशी भारताचे वाढणारे धोरणात्मक संबंध अधोरेखित केले, तर राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतिन आणि झेलेन्स्की यांच्याशी मोदी यांच्या जलद भेटींनी त्यांच्या हितसंबंधांवर प्रकाश टाकला. भारत आणि युक्रेनमधील संबंध मजबूत करणे, भारत आणि युक्रेनमधील द्विपक्षीय संबंध पुनर्संचयित करण्याच्या दृष्टीनेही मोदी यांचा युक्रेन दौरा महत्त्वाचा होता. सोव्हिएत काळात, भारताला युक्रेनमध्ये प्रवेशाचा विशेषाधिकार होता; परंतु कीवला स्वातंत्र्यानंतर भारतासोबतच्या संबंधांमध्ये कोणतीही उबदारता लाभली नाही. युक्रेनमध्ये भारताप्रती असलेली विलक्षण सद्भावना मोदी यांच्या कीवमध्ये झालेल्या हार्दिक स्वागतातून दिसून आली. मोदी आणि झेलेन्स्की यांनी आपल्या संबंधांना धोरणात्मक भागीदारीमध्ये रूपांतरित करण्याची, त्यांच्या आर्थिक आणि संरक्षण संबंधांना पुनरुज्जीवित करण्याची आणि सांस्कृतिक संबंधांना पुनरुज्जीवित करण्याची दाखवलेली वचनबद्धता युक्रेन आणि भारत दोघांसाठीही महत्त्वाची आहे. ▮

# परिवर्तनासाठी यावे गणेशा

**खास बात**

आरती अंकलीकर

संगीताप्रमाणेच समाज आणि त्यात साजरे होणारे सणही परिवर्तनशील असतात. याचा अनुभव सगळेच घेत आहोत. गणेशोत्सवही याला अपवाद नाही. हा सण नेहमीच आनंद, सुख-सौख्य घेऊन येतो. या काळात होणारी सामाजिक घुसळण अनेक चांगले मापदंड प्रस्थापित करून जाते. यंदाही त्याचीच पुनरावृत्ती व्हावी आणि नकारात्मकतेची जळमटे झटकून समाज एकसंध करण्याची शक्ती गणेशाने प्रत्येकाला द्यावी.

गणेशाचे आगमन होत आहे. त्याचा आनंद सगळीकडे जाणवतोय्. यात आबालवृद्ध सहभागी होतात आणि पर्वणी साधत अनेकानेक उपक्रम राबवतात. या उत्सवाचे, खऱ्या अर्थाने लोकोत्सवाचे बदलते रंग, बदलते ढंग आपण पाहिले आहेत. पूर्वी गणेशोत्सवाचे स्वरूप, रूप वेगळे होते. आता आणखी वेगळे आहे. पण काळ नेहमी पुढेच जात असतो. संगीतासारखेच जीवन परिवर्तनशील असल्याचे सूत्र आपण सगळेच जाणतो आणि मानतो. वेळ बदलते तसे संगीत बदलत असते आणि त्याचप्रमाणे जीवनही कायम बदलताना दिसते. गणेशोत्सवासारख्या सणांच्या निमित्ताने याची तीव्रतेने जाणीव होते.



गणेशोत्सव म्हटला की डोळ्यासमोर येतो तो सासरी म्हणजेच मुंबईतील आमच्या शास्त्री हॉलमध्ये साजरा होणारा उत्सव. तिथे मंडप घालण्यापासून पुढील प्रत्येक काम सोसायटीतील सदस्यांकडून केले जाते. येथील रहिवासी हा उत्सव अतिशय भक्तिभावाने, पावित्र्य राखत, जुना बाज कायम ठेवून नवतेचे स्वागत करत साजरा करतात. त्यामुळेच हा एक सर्वांगसुंदर सोहळा होऊन जातो. उत्सवासाठी मोठा मांडव घातला जातो. सुंदर स्टेज असते. जाणकार मंडळी दरवर्षी त्याच आनंदाने हे काम करतात. अत्यंत परंपरागत पद्धतीने इथे गणपती बसवला जातो. सजावटही जुना बाज राखणारी आणि वैभव जपणारी असते. एकत्रित प्रयत्नांमध्ये उभ्या राहिलेल्या सुबक आणि सुंदर मंडपात गणरायाची प्रतिष्ठापना झाल्यापासून उत्सवाचा संपूर्ण काळ भारलेला होऊन जातो. पहिल्या दिवशी गणपतीची मंगलमय मूर्ती आणताना ढोलक, लेझीम आणि टाळांचा गजर सुरू असतो. पांढरे शुभ्र वस्त्र परिधान केलेली इथली मुले-मुली पालखीच्या मागे-पुढे वादन करत गणपतीला मिरवून आणतात. गणरायाचा गजर होतो. गणेशाची मूर्ती अगदी छोटी, जवळपास एक फुटाचीच असते. त्याची सुंदरशी मिरवणूक आमच्या वाडीमध्ये येते तेव्हाची वातावरणनिर्मिती शब्दातीत म्हणावी लागेल. मग पुढचे दहा दिवस अनेक उपक्रम राबविले जातात. अभ्यासू लोक आपली मते मांडतात. चांगल्या वक्त्यांच्या भाषणांचा लाभ घेता येतो. कीर्तन-प्रवचनासारखे कार्यक्रमही होतात. रहिवाशांनी बसवलेले करमणुकीचे कार्यक्रम होतात, विनोदी नाटके होतात आणि आधी उल्लेख केल्याप्रमाणे वैचारिक, आध्यात्मिक, प्रबोधनपर कार्यक्रमांची रेलचेलही पाहायला मिळते. थोडक्यात, असा सुरेख संगम असणारा गणेशोत्सव मला मनापासून भावतो.

यंदा तर गणेशाचे आगमन माझ्यासाठी विशेष आनंददायी आहे. गणेश आगमनाच्या अगदी काही दिवस आधी भारतरत्न पं. भीमसेन जोशी जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित होणे, हा मी फार मोठा बहुमान समजते. त्या पुरस्काराने माझ्या जीवनाचा गौरव होत असल्याची भावना आणि महाराष्ट्र शासनाकडून सन्मानित झाल्याची बाब आत्यंतिक सुखावणारी आहे. स्वाभाविकच यंदाचा गणेशोत्सव माझ्यासाठी आगळा आहे, असे म्हणता येईल. सामाजिकदृष्ट्या विचार करायचा तर यंदा पावसानेही सगळीकडे चांगली हजेरी लावली आहे. पाण्याची चिंता दूर झाली आहे. साहजिकच या सुजलाम् सुफलाम् वातावरणाचा सकारात्मक प्रभाव यंदाच्या सणपर्वांवर दिसून येत आहे. अर्थात पुरामुळे जागोजागी झालेले नुकसानही विसरून चालणार नाही. पुराचा फटका बसून अनेकांचे संसार उद्ध्वस्त झालेले आपण पाहिले आहेत. त्यामुळेच पुढल्या वर्षी कोणावरही अशी वेळ येऊ नये, अशी मनोकामना व्यक्त करतच आपण गणेशाचे स्वागत करायला हवे.

अलिकडेच कोलकाता आणि बदलापूरमधील घटनांनी अनेक प्रश्न आणि शंका उपस्थित करून गेल्या. यानिमित्ताने एकत्र आलेला समाज आणि जागृत झालेल्या सामाजिक जाणिवांची अनुभूती आपण घेतली. या घटनांनी प्रत्येक जण हेलावून गेलेला दिसला. या समाजाचा भाग असल्याबद्दल खेद वाटावा, अशीही भावना काहींमध्ये दिसली. साहजिकच यंदाच्या गणेशोत्सवावरही या घटनांचा प्रभाव असणार आहे. विशेषत: या सणाचे औचित्य साधत समाजसुधारणेतील आपली जबाबदारी ओळखण्याची आणि ती पार पाडण्याची वेळ प्रत्येकाने ओळखायला हवी. कारण आज प्रत्येकाला त्यासाठी काही ना काही करायचे आहे. आवाज उठवायचा आहे. अन्यायाला वाचा फोडायची आहे. पण एकट्यादुकट्या माणसाकडे हे धैर्य, एवढा वेळ, एवढी शक्ती असतेच असे नाही. मात्र आता काही काळासाठी का होईना, आपण एकत्र येतोय. चर्चा घडणार आहे. या संधीचा फायदा करून घ्यायला हवा. या कामी गणेशाने आपल्याला सामर्थ्य द्यावे, हे माझे त्याच्याकडे आवाहन असेल.

आता स्त्री सशक्त झाली आहे. पण या सशक्त स्त्रीला कसे स्वीकारावे, तिला कसे सन्मानित करावे, तिचे उंचावलेले स्थान कसे जपावे हे आजही अनेकांना समजलेले दिसत नाही. पुरुषी वर्चस्वाखाली, नको त्या दंभाखाली ते आजही तिचे स्थान नाकारतात. तिला कह्यात ठेवू इच्छितात. त्या दृष्टीने आपल्या मुलांना, नातवंडांना काय शिकवावे, याचाही विचार या उत्सवानिमित्ताने व्हायला हवा. कारण सध्याची स्थिती, घटना प्रत्येकाला अंतर्मुख करणाऱ्या आहेत. सतत दुसऱ्यांकडे बोटे दाखवून आता चालणार नाही. परिस्थिती बदलायची तर तुम्ही-आम्ही, प्रत्येक घराने स्त्री सन्मानाची पताका फडकवत ठेवणे गरजेचे आहे आणि प्रथमपासून प्रबोधनाचे काम करणारा गणेशोत्सव ही संधी प्रत्येकाला नक्कीच देईल. या अर्थानेही मला हा गणेशोत्सव महत्त्वाचा वाटतो. हा संपूर्ण काळ आर्थिक उलाढालीचा असतो. या काळात अनेक व्यावसायिकांना, कारागिरांना, व्यापाऱ्यांना पैसे मिळतात. त्यांच्या व्यवहारांना चालना मिळते. मुख्य म्हणजे या सगळ्यामुळे बाजारात पैसा फिरतो. स्वाभाविकच असा उत्सव अनेकांची पोटे भरण्यास, त्यांच्या हाताला काम देण्यास कारक ठरतो. उत्सवाच्या जमेची ही बाजूही सध्या प्रकर्षाने जाणवत आहे. मात्र एकीकडे असे असले, तरी या सगळ्यात, वाढत्या बाजारुपणाच्या लाटेत आपली संस्कृती जपणेही मला तितकेच महत्त्वाचे वाटते. पैसा मिळवायला, व्यापार फुलवायला कोणी आक्षेप घेण्याचे कारण नाही; मात्र आता प्रत्येक माणसाने थोडे थांबून आज समाजाला कशाची गरज आहे, हे पाहावे असे वाटते. अगदी राजकारण्यांपासून सामान्यांपर्यंत सगळ्यांनीच एक क्षण तरी याचा विचार करावा आणि आपण करतो त्या कामातून समाजाला काय मिळणार आहे, याचे अवलोकन करावे. प्रत्येकाने नियुक्त केलेले काम या जाणिवेनिशी, विचारानिशी पार पाडले आणि पूर्ण क्षमतेने, पारदर्शकतेने, सचोटीने आणि संवेदनशीलतेने पूर्ण केले तरी समाजातील नकारात्मक चित्र बदलण्यास फार वेळ लागणार नाही, असे वाटते. प्रत्येकाने सर्वतोपरी उत्तम देण्याचा विचार केला तर सर्व प्रकारची कीड बघता बघता संपून जाईल. यंदा गणेशाने आपल्याला ही सम्यक दृष्टी द्यावी. कारण समाज खालपासून सुधारण्याची मोठी गरज आता निर्माण झाली आहे.

सध्या मन चाळवणाऱ्या अनेक गोष्टी अस्तित्वात आणि प्रत्येकाच्या आवाक्यात आहेत. त्यावर काहीही निर्बंध नाहीत. त्यासाठी काही पावले उचलण्याची गरज यानिमित्ताने व्यक्त करावीशी लागते. यासाठी सरकारकडूनही पावले उचलली जावीत आणि पालकांनीही योग्य ते संस्कार करत मुलांना यापासून दूर ठेवावे. आपल्या पाल्यालाच नव्हे तर सजग आणि सुजाण माणसाने आपल्या संपर्कात येणाऱ्या असमंजस माणसाला हे धडे देण्याची, संस्कारित करण्याची गरज आता ओळखायला हवी. कारण आज अनेकांची नैतिक मूल्ये हरपली आहेत. आपण काय करतो याचे भान हरपले आहे. त्यामुळेच ते परत एकदा रुजवण्याची गरज आहे. गणेशोत्सव त्या दृष्टीनेही महत्त्वाचा आहे. शेवटी ही बुद्धीची देवता आहे. त्यामुळेच यंदा आपण त्याच्याकडे समाजाला चांगली बुद्धी देण्याचे वरदान मागू शकतो. प्रत्येक मतदार योग्य उमेदवाराला मत देण्याची शक्ती त्याच्याकडे मागू शकतो. केवळ बढाया मारणारे लोक आता समाजाला नको आहेत, हे त्याला विनवू शकतो. मुख्य म्हणजे वाढता बाजारुपणा कमी करण्यासाठी कार्यरत होण्याचा निर्धार आपण सगळेच करू शकतो. आज चालते तीच बातमी दिली जाते, छापली जाते आणि पुन्हा पुन्हा दाखवली जाते. पण या सगळ्यात सच्चेपणा आणि इमानाचा बळीही जाऊ शकतो. म्हणूनच रंजकतेचा अट्टहास, दुराग्रह आता तरी दूर होणे गरजेचे आहे. विकते आहे म्हणून नव्हे तर चांगले आहे म्हणून समाजापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न प्रत्येकाने केला तरच आपल्याला अपेक्षित आदर्श आणि खऱ्या अर्थाने प्रगत समाज निर्माण होईल. त्यामुळे गणरायाने आपल्या या सगळ्या भावनांचा विचार करावा आणि समाजाला हे दान देण्यासाठी शक्ती द्यावी हीच कामना. ▮

*(लेखिका सुप्रसिद्ध गायिका आहेत)*

## रविवारची पत्रे

### काँग्रेसच्या अपयशाचा आढावा

भारतीय जनता पक्ष राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्षाच्या सातत्यपूर्ण अपयशांची यादी मांडते. राहुल गांधी यांच्या निर्णयक्षमतेवर आणि राजकीय नेतृत्वावर अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत.

**राजकीय वाटचाल** : राहुल गांधी यांनी २००४ साली अमेठी मतदारसंघातून पहिल्यांदा लोकसभा निवडणूक लढवली आणि विजयी झाले. मात्र, त्यानंतरच्या काळात त्यांच्या नेतृत्वाने काँग्रेसला कोणताही उल्लेखनीय फायदा झाला नाही. त्यांचे राजकीय निर्णय व रणनीती यांची परिणामकारकता प्रश्नचिन्हांत राहिली.

**भट्टा-परसोल घटना** : २०११ साली उत्तरप्रदेशातील भट्टा-पारसोल गावातील घटनांनंतर राहुल गांधी यांनी शेतकऱ्यांच्या समर्थनार्थ भूमिका घेतली. तथापि, त्यांच्या या दौऱ्याचा शेतकऱ्यांच्या समस्यांवर कुठलाही ठोस परिणाम झाला नाही. त्यांची प्रतिमा एक प्रभावहीन नेता म्हणून उभी राहिली.

**अध्यादेश प्रकरण** : २०१३ मध्ये राहुल गांधी यांनी माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखालील सरकारने तयार केलेल्या अध्यादेशाची प्रत पत्रकार परिषदेत फाडली. त्यांच्या या कृतीमुळे पक्षातील अंतर्गत असंतोष वाढला.

**दारुण पराभव** : २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला केवळ ४४ जागांवर समाधान मानावे लागले. काँग्रेसला विरोधी पक्ष नेतेपदही मिळवता आले नाही; ज्यामुळे त्यांचे नेतृत्व अधिकच विवादास्पद ठरले. त्यांच्या असमर्थ नेतृत्वामुळे काँग्रेस पक्षाला ऐतिहासिक पराभवाला सामोरे जावे लागले.

**काँग्रेस अध्यक्षपदाचा स्वीकार** : २०१७ मध्ये सोनिया गांधी यांनी दीर्घकाळानंतर काँग्रेसच्या अध्यक्षपदाची धुरा राहुल गांधी यांच्याकडे सोपवली. मात्र, त्यांच्या नेतृत्वाखाली पक्षाला काहीच भरीव यश मिळाले नाही. काँग्रेसच्या जनाधारात घट झाली आणि पक्षाची स्थिती कमजोर झाली.

**आघाडीचे अपयश** : २०१७ मध्ये उत्तरप्रदेश विधानसभा निवडणुकीत राहुल गांधी यांनी समाजवादी पक्षाचे नेते अखिलेश यादव यांच्यासोबत आघाडी केली. तथापि, या युतीमुळे काँग्रेसला अपेक्षित यश मिळाले नाही. युतीचा फायदा समाजवादी पक्षालाच झाला.

**चौकीदार चोर है आणि राफेल वाद** : २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर राफेल करारात भ्रष्टाचाराचे आरोप करत 'चौकीदार चोर है' हा नारा दिला. मात्र, काँग्रेसला कोणताही फायदा झाला नाही. उलट, काँग्रेसला फक्त ५२ जागा मिळाल्या; ज्यामुळे पुन्हा एकदा काँग्रेसला विरोधी पक्ष नेतेपद गमवावे लागले. २०१९ च्या लोकसभा अधिवेशनात राहुल गांधी यांचे गैरवर्तन अनेकदा चर्चेत आले.

**लोकसभेची उमेदवारी रद्द होण्याचे कारण** : २०२४ साली राहुल गांधी यांची लोकसभेची उमेदवारी एका मानहानीच्या खटल्यात दोषी ठरल्यामुळे रद्द करण्यात आली. गांधी यांनी काँग्रेसची आर्थिक परिस्थिती अत्यंत दयनीय असल्याचे सांगितले होते. प्रचारासाठी पुरेसा निधी नसल्याचे जाहीर केले होते. तरीही, काँग्रेसला केवळ ९६ जागा मिळाल्या; जे त्यांच्या अपयशी नेतृत्वाचे आणि कमजोर पक्ष संघटनेचे प्रतीक आहे.

**निष्कर्ष** : राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्षाने सातत्याने अपयशाचा सामना केला आहे. त्यांच्या असमर्थ नेतृत्वामुळे काँग्रेस पक्षाच्या जनाधारात घट झाली आणि पक्षाच्या अंतर्गत संघटनेतही गंभीर असंतोष आहे. भाजपा राहुल गांधी यांच्या नेतृत्वावर कठोर टीका करत आहे आणि भारतीय जनतेला काँग्रेसच्या अपयशाची जाणीव करून देत आहे.

**राजेंद्र सायरे**/नागपूर

●● ●●

### बेधुंद कारचालकांना वठणीवर आणा

नागपूरच्या रस्त्यांवर सध्या बेधुंद कारचालकांनी आतंक माजवून ठेवल्याचे दिसत आहे. कारचालकांनी दुचाकी किंवा इतर छोट्या वाहनांना धडक देण्याच्या घटना दररोज घडत आहेत. या अपघातांमध्ये कुणाचा जीव जातो तर कुणी आयुष्यभरासाठी अपंग होऊन बसतो, कोणाची रोजी-रोटी ठप्प होते. कशीही कार चालवणे, कुठेही थांबणे, सतत लेन बदलत राहणे, टपऱ्यांवरून काहीही खाण्यासाठी अगदी रस्त्यावरच कार थांबवून कारमध्ये बसून खाणे, सिग्नलवर झेब्रा क्रॉसिंगच्या पुढे जाऊन थांबणे, वर्दळीच्या रस्त्यावर अर्धाअधिक रस्ता घेरून कार पार्क करणे असा मनमानीपणा हे बेमुर्वत कारचालक करताना दिसून येतात. सिग्नलवर डावीकडे थोडी जागा दुचाकी आणि इतर लहान वाहनांसाठी सोडून कार उभी करायचा नियम आहे, परंतु हे कारचालक एका बाजूला एक अशा एका रांगेत चार-पाच कार उभ्या करतात. त्यामुळे दुचाकी चालकांनी आपले वाहन कुठे उभे करावे हा प्रश्न पडतो. सिग्नल सुरू होताच हे कारचालक आपले वाहन एकदम वेगात दामटतात आणि दुचाकींना कट मारून पुढे जायला पाहतात. दुचाकी आणि इतर लहान वाहनांना अगदी कचराच समजतात. आम्हालाच रस्त्यावरून जायचा हक्क आहे अशी यांची प्रवृत्ती असते. रात्रीच्या वेळेस तर या कारचालकांच्या अंगात कोणते भूत संचारते माहीत नाही. रात्रीला अनेक कॉलेजमध्ये शिकणारी पोरं आपल्या बा



ची कार घेऊन सोबत मित्रमंडळींना घेऊन मौजमजा करायला निघतात आणि बेधुंदपणे कार चालवतात. अशा रईसांच्या कार्ट्यांनी अनेक निरपराधी लोकांचा जीव घेण्याच्या अनेक घटना आतापर्यंत घडल्या आहेत. रात्रीच्या वेळेस अनेक कारचालक दारू ढोसून कार चालवतात. नशेत असल्यामुळे आपण कशी आणि किती वेगात कार चालवत आहोत, याचं त्यांना अजिबात भान राहात नाही. सद्यस्थितीत प्रत्येक घरी कार आहे आणि प्रत्येक घरातून दोन-चार ड्रायव्हर तयार होत आहेत. यांना फक्त कार चालवता येते; रहदारीचे नियम, कायदे याची माहिती नसते. कारचालकांमध्ये ट्राफिक सेन्स दिसून येत नाही. त्यामुळे आता अशा बेधुंद कारचालकांना वठणीवर आणणे गरजेचे असून वाहतूक विभागाने उपाययोजना कराव्यात. शहरात सीसीटीव्ही लागले आहेत; त्या माध्यमातून अशा वाहनचालकांवर लक्ष ठेवून त्यांना दंडित केले पाहिजे. प्रत्येक मुख्य रस्त्यावर स्पीडगनद्वारे गतीवर लक्ष ठेवले पाहिजे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे रात्री ८ ते पहाटे २ वाजेपर्यंत प्रत्येक मुख्य चौकात ड्रंकन ड्राईव्ह मोहीम सुरू ठेवली पाहिजे. याविषयी दोन महिन्यांपूर्वी मी डिसीपी ट्रॅफिक आणि पोलिस आयुक्तांना ई-मेल केले होते, परंतु त्यांनी काहीच पावले उचललेली दिसत नाही. परिवहन मंत्र्यांनी तरी या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहिले पाहिजे.

**संजीव हरिदास हेडाऊ**/९३७०१६९५८२

●● ●●

### नेत्रदान जनजागरण : काही सूचना

दरवर्षी २५ ऑगस्ट ते ८ सप्टेंबरदरम्यान नेत्रदान जनजागरण पंधरवडा साजरा करण्यात येतो. यंदा हे ३९ वे वर्ष आहे. इतक्या वर्षांपासून सुरू असणाऱ्या या मोहिमेची फलश्रुती म्हणावी तेवढी प्रभावी होताना दिसत नाही. दृष्टिबाधितांची संख्या (ज्यांना नेत्रदानामुळे दृष्टी प्राप्त होऊ शकण्याची शक्यता असते) आणि देशात दररोज मृत्युमुखी पडणाऱ्यांची संख्या (ज्यांच्या मरणोत्तर नेत्रदानामुळे अशा दृष्टिबाधितांना दृष्टी मिळू शकते) यांची तफावत वाढतच जात आहे. याचे कारण मुख्यत्वे मरणोत्तर नेत्रदानाबद्दलची उदासीनता. सुज्ञ व्यक्तीला नेत्रदानाचे महत्त्व माहीत नाही असे नाही; परंतु पुढाकार घेऊन हे कार्य यशस्वी करण्याबद्दल त्यांची मानसिकता अजूनही तयार नाही. विविध संघटना, सरकारी, खाजगी, निमसरकारी, एनजीओ इ. जे दृष्टिबाधितांच्या कल्याणासाठी कार्यरत आहे, ते आपापल्या परीने दरवर्षी या पंधरवड्यादरम्यान जनजागरणासाठी विविध उपक्रमांद्वारे, शिबिरांद्वारे मोफत नेत्र तपासणी, नेत्रविकार व नेत्रदानासंबंधी सामान्य जनतेला प्रेरित करतात. परंतु त्याचा फारसा परिणाम होताना दिसत नाही. प्रोत्साहन, अनुदान किंवा प्रलोभन दिल्याशिवाय कोणी पुढे येत नाही. दृष्टिहिनांना दृष्टी मिळण्यास केवळ मरणोत्तर नेत्रदान केलेल्या व्यक्तीच्या मिळालेल्या कॉर्नियाशिवाय दुसरा उपाय नाहीच. त्यामुळे देशात दृष्टिबाधित लोकांची वाढती संख्या बघता सरकारने पुढाकार घेऊन विशेष योजना/उपाय करणे गरजेचे आहे. मरणोत्तर नेत्रदान प्रक्रिया अत्यंत सोपी व नि:शुल्क आहे. मरणोत्तर नेत्रदान केलेल्या व्यक्तीच्या परिवाराला सरकारतर्फे किंवा स्थानीय प्रशासनाद्वारे काही प्रोत्साहन राशी किंवा सवलती दिल्या तर काही प्रमाणात याला गती मिळेल, अशी आशा आहे. नागपुरात काही संस्था जसे 'सक्षम' (समदृष्टी क्षमता विकास एवं अनुसंधान मंडल) तसेच माधव नेत्रालय नेत्रदानासाठी प्रभावीपणे जनजागरण करीत आहेत. परंतु, या जनजागरणाची फलश्रुती प्रत्यक्ष नेत्रदानाची संख्या वाढेपर्यंत होणार नाही. नेत्रदान संकल्प करून स्वस्थ बसणे योग्य नाही. प्रत्येक परिवारांनी मृत व्यक्तीच्या संकल्पाचा आदर करावयास हवा व या पवित्र कार्यास हात भार लावावा. संकल्प केला नसल्यासदेखील मृत व्यक्तीच्या परिवाराच्या संमतीने नेत्रदान करता येते. चला तर या जनजागरण पंधरवड्याच्या निमित्ताने आपण या सर्वश्रेष्ठ दानाला एक चळवळीचे रूप देऊ व आपल्या परिवारात, परिसरात, नातेवाईक, आप्तेष्टांकडे कोणाचा मृत्यू झाल्यास त्या व्यक्तीचे नेत्रदान अवश्य करू, असा संकल्प करू या. बहुदा मृत व्यक्तीच्या नेत्रदानाकरिता कुठे व कसा संपर्क करावा याची माहिती नसणे, हे देखील या उदासीनतेचे कारण असू शकते. म्हणून संपर्क क्रमांक देत आहे. ०७१२-६७८५२०० व मोबाईल ९८२२२०८३८१ येथे संपर्क केल्यास सर्व प्रक्रिया पूर्ण करण्यात येतील; ज्याला काहीही शुल्क लागत नाही. (मृत्यूनंतर सहा तासांच्या आणि डॉक्टरकडून मृत्यू प्रमाणपत्र आवश्यक आहे.) ही जागरूकता निरंतर सुरू ठेवण्याचा संकल्प करूया व आपले सामाजिक दायित्व पार पाडूया!

**राजीव दारव्हेकर**/९०९६३२२२००

●● ●●

### आरक्षण वर्गवारीचा तिढा कायम?

'मोठा मासा लहान माश्यांना खातो' हे आरक्षणाचे मूळ आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या सात सदस्यीय खंडपीठाने बहुमताने सर्व प्रकारच्या आरक्षणाला श्रेणी लावण्याचे सुचविले आहे. यावरून सधन आरक्षणार्थींनी आक्रमक भूमिका घेऊन केंद्र सरकार विरोधात दंड थोपटले. सुप्रीम कोर्टाने हा निर्णय अचानक घेतलेला नाही. यावर बरेच विचारमंथन झाले आहे. मग ओबीसींना असणाऱ्या आरक्षणाला का श्रेणी लावली गेली? कारण ओबीसी कायद्यातच तशी तरतूद केलेली आहे, असे सांगितले जाते आहे. असे असेल तर हा त्यांच्यावर अन्यायच नाही का? कुणी कितीही प्रयत्न केले तरीही भारतीय संविधान धोक्यात कधीच येऊ शकत नाही, हे सर्वजण जाणून आहेत. विरोधकांना केवळ आपली राजकीय पोळी शेकून घ्यायची असते. आरक्षणाची निर्मिती कशी झाली? दोन बैलांच्या झुंजीचे सोदाहरण यासाठी नेहमी पुढे केले जाते. यातील एक बैल हा बलवान असतो तर दुसरा हा कमजोर असतो. कमजोर बैलाचा स्पर्धेत कसा टिकाव लागणार; परंतु स्पर्धा ही नेहमीच दोन तुल्यबळ प्रतिस्पर्धींमध्ये होत असते. एक कमी एक जास्त असे नसते. मग तिथे भेदभाव केल्याचा आरोप करण्यास जागा असते. कुठल्याही स्पर्धेत डावपेचाला, कौशल्याला अधिक महत्त्व प्राप्त असते. हीच खरी वास्तविकता आहे. कमजोर प्रतिस्पर्ध्याला चांगली खुराक देऊन स्पर्धेचे नियम, डावपेच शिकविले गेले तर तो बलवान ठरू शकतो. मात्र, एखाद्याला संधी मिळूनही तो बलवान ठरत नसेल, त्याचा स्पर्धेत टिकाव लागत नसेल तर दोष कुणाचा? तसेच आरक्षणाचे आहे. आरक्षण हे कुणीही बंद करूच शकत नाही. आरक्षणाची विभागणी ही सामान्यत: तीन भागांत केली जाते. सामाजिकदृष्ट्या मागासलेले, शैक्षणिकदृष्ट्या मागासलेले आणि आर्थिकदृष्ट्या मागासलेले. यात आणखी एकाची भर पडलेली आहे. ती म्हणजे वैचारिकदृष्ट्यांची. या गटात आपली सर्वांगीण प्रगती झाल्यानंतरही आपण मानसिकदृष्ट्या यातून बाहेर न पडल्या कारणाने स्वत:ला मागासलेलोच समजतो आहे. यात स्वत:चा व कुटुंबातील लोकांचा स्वार्थ हा दडलेला आहे, याची कबुली आपण देऊ शकत नाही. सोदाहरण द्यायचे झाल्यास एखाद्या कुटुंबातील बहुतांश लोक हे उच्चशिक्षित असून त्यांची वर्णी ही चांगल्या पगार व मानाच्या पदावर लागलेली आहे. मात्र त्यांच्याच कुटुंबातील इतर कुणाचीही परिस्थिती बेताचीच असेल; ते सर्वप्रकारची पात्रता अंगी असताना आरक्षणाचा लाभ उचलू पाहात असतील तर त्यांच्यासाठी कुणीतरी आरक्षणास पात्र असणाऱ्या शिक्षित व्यक्तीने आरक्षणाचा त्याग करणे अपेक्षित आहे. तेव्हाच खऱ्या गरजवंताला न्याय मिळू शकतो, असे सुप्रीम कोर्टाचे मत पडते आहे. याखातर तरी आपण सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाचा मान ठेवून आपल्यापेक्षा कमजोर लोकांना संधी प्राप्त करून देण्याची भूमिका स्वीकारू या. ही आपल्याच समाजातील लोकांच्या हिताची बाब ठरणार आहे. सर्वांनाच समान संधी मिळाली पाहिजे याचा आग्रह धरला आहे. सुप्रीम कोर्ट अधिकार काढून घेऊ इच्छित नाही तर सबलांनी मोठ्या भावाची भूमिका स्वीकारावी, एवढेच मागणे केले आहे. तर मग पहा एकदा मोठ्या मनाने स्वार्थरहित विचार करून! पटते का ते? ▮

**मिलिंद गड्डमवार**/९५११२१५२००

●● ●●

रविवारची पत्रे व वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मताशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# जनतेचे प्रेम हाच राजकीय पुढाऱ्यांचा दागिना असतो- आ.गुट्टे

**गंगाखेड,/प्रतिनिधी:** कोणाला विजयी करायचे आणि कोणाला पराभूत करायचे, हे माय-बाप जनतेच्या हातात असते. त्याामुळे लोकशाहीत जनता सार्वभौम असते. एखाद्या माणसाला उंचीवर नेण्याची किमया जनताच करते आणि जमिनीवर आणण्याचे काम सुध्दा जनताच करते. म्हणून राजकीय क्षेत्रात जनतेचे प्रेम हाच राजकीय पुढाऱ्यांचा दागिना असतो, असे प्रतिपादन गंगाखेडचे रासप आमदार डॉ. रताकर गुट्टे यांनी केले.

आळंदी देवाची येथील रसिकलाल धारीवाल सभागृहात आयोजित कौटुंबिक स्नेह मेळाव्यास संबोधित करताना ते बोलत होते. या मेळाव्यास गंगाखेड विधानसभेतील पुणे व आळंदी येथे वास्तव्यास असलेल्या हजारो लोकांनी उत्स्फूर्तपणे गर्दी केली होती. तसेच महिलांची संख्या लक्षणीय होती. पुढे बोलताना आ.डॉ.गुट्टे म्हणाले की, गेल्या पाच वर्षांत गंगाखेड विधानसभा मतदारसंघाचा कायापालट करण्यासाठी हजारो कोटींचा निधी उपलब्ध करून दिला आहे. तसेच ४० वर्षापासून प्रलंबित असलेल्या अनेक प्रश्न सोडवले आहेत. रस्ते, पाणी आरोग्य, शिक्षण, वीज यासह अनेक पायाभूत सुविधांचे प्रश्न मार्गी लावले आहेत. नागरिकांचे वैयक्तिक अडचणीही दूर केल्या आहेत. तरीही तुमचे काही प्रश्न व समस्या असतील, तर त्यााही मार्गी लावण्याचा प्रमाणिक प्रयत करीन. तीन तालुक्याच्या आपल्या मतदारसंघात जवळपास २८४ गावे आहेत. त्याा प्रत्योक गावात वेगवेगळ्या योजनेतून विकास निधी पोहोचला आहे, याचा आनंद वाटतो. तसेच तब्बल ४७५ किलोमीटर रस्त्याांचे काम पूर्ण होणारा गंगाखेड हा महाराष्ट्रातला एकमेव विधानसभा मतदारसंघ आहे, हे सांगताना मला विशेष अभिमान वाटतो. आपल्या मतदारसंघातील १७५ गावात स्मशानभूमी बांधकाम पूर्ण केले. प्रत्योक तांड्यावर सेवालाल महाराज सभामंडप, मातंग वस्तीत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सभागृह, बौद्ध वस्तीत डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृह आणि धनगर वस्तीत पुण्यश्लोक अहिल्यादेवी सांस्कृतिक सभागृह देवून आपल्या उपकारातून थोडाफार उत्तराई होण्याचा प्रामाणिक प्रयत केला असल्याचेही आ.डॉ.गुट्टे यांनी स्पष्ट केले. दरम्यान, तत्पूर्वी, उपस्थित महिलांच्या वतीने प्रातिनिधिक माता-भगिनींना आ.डॉ. गुट्टे व आ.दिलीप मोहिते यांचे औक्षण करून राखी बांधली. परिणामी, कार्यक्रमाचे औचित्या साधून आ.डॉ.गुट्टे यांच्या शुभहस्ते उपस्थित महिलांना भावाची ओवाळणी म्हणून सुबक व आकर्षक साडी चोळी आणि पाच किलो साखरेचे वाटप करण्यात आले. अतिशय उत्साहात संपन्न झालेल्या या कौटुंबिक सोहळ्यात अनेक पदाधिकारी व कार्यकत्यांनी आपले मनोगत व्यक्त करून मतदारसंघातील विकास कामांचा आढावा उपस्थित जनतेसमोर मांडला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रभारी हनुमंत मुंढे, तर सूत्रसंचालन पदुदेव जोशी यांनी केले. आभार रामप्रसाद सातपुते यांनी मानले. यावेळी खेडचे आमदार दिलीप मोहिते, युवा उद्योजक धनराज गवळी, मंदिर ट्रस्टी अजित वडगावकर, माजी नगराध्यक्ष बबनराव कुऱ्हाडे, माजी नगरसेविका वर्षाताई शिंदे यांच्यासह मित्रमंडळाचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते, मतदारसंघातील सर्व स्थानिक रहिवाशी हजारोंच्या संख्येने उपस्थित होते. तरीही मी समाधानी नाही! गंगाखेड विधानसभा मतदारसंघात कोट्यवधी रुपयांची कामे झाली असली, तरी मी समाधानी नाही. कारण, मला माझे तीन तालुके महाराष्ट्रात नावारूपाला आणायचे आहेत. त्याासाठी मी अहोरात्र परिश्रम घेत




आहे, असेही आ.डॉ.गुट्टे यांनी सांगितले. म्हणून तुम्ही केवळ आमदार नव्हे, तर मंत्री सुध्दा व्हाल! २०१९ सालच्या निवडणुकीत तुमच्यावर आरोपांची सरबत्ती झाली. तरीही तुमचे कार्यकर्ते निधड्या छातीने लढले. गावोगावी पोहोचले आणि केवळ दहा दिवसात तुम्हाला आमदार केले. त्याामुळे असे जीवाभावाचे जिगरबाज कार्यकर्ते लाभायला सुध्दा भाग्य लागते. म्हणून तुम्ही नशीबवान आहात. त्यामुळे येत्याा निवडणुकीत तुमच्या प्रामाणिक व एकनिष्ठ कार्यकर्त्यांच्या बळावर तुम्ही केवळ आमदार नव्हे, तर मंत्री सुध्दा व्हाल, असा विश्वास आमदार दिलीप मोहिते यांनी व्यक्त केला.

## संक्षिप्त वृत्त...

### त्या पथनाटयाव्दारे परभणीकरांचे लक्ष

**परभणी,/प्रतिनिधी:** कलकत्ता येथील वैद्यकीय महाविद्यालयातील महिला डॉक्टरवरील बलात्कारासह क्रुरहत्येचा व बदलापूरातील विद्यार्थीनीवरील अत्याचाराच्या घटनेच्या निषेधार्थ दयावन सरकार संघटनेने गुरुवारी (दि.२२) जिल्हाधिकारी कार्यालयावर मठा मोर्चा काढून निषेध नोंदवला तसेच ठिकठिकाणी पथनाट्यांद्वारे जनजागृतीसुध्दा केली.

संपूर्ण देशात वाढत्याा अत्याचाराच्या घटनांना कुठेतरी आळा बसला पाहिजे, या प्रमुख उद्देशाने खानापूर फाटा, विद्यापीठ प्रवेशद्वारे, श्री शिवाजी महाविद्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसर व जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात या संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसह सदस्यांनी कलकत्ता व बदलापूर येथील घटनांच्या पार्श्वभूमीवर सुंदर असे पथनाट्य सादर केले. त्याद्वारे नागरीकांचे लक्ष वेधून घेतले. यामध्ये सिध्दार्थ खाडे, विकास ससाणे, सुरज शेळके, वैभव झोडपे, बाळू हातागळे, अभिजित भालेराव, विकास राक्षे, राहूल ठोके, गौतम अंबुरे, देविदास टेकूळे, बबलू धबाले, प्रशांत साळवे, बाळासाहेब खंदारे, गोलू नारायणकर भूजंग खंदारे आदी सहभागी झाले होते.

या संघटनेचे मराठवाडा अध्यक्ष संजय गायकवाड, युवा आघाडीचे जिल्हाध्यक्ष अमित भालेराव, रमेश घनघाव, कृष्णा शिंदे, आकाश अहिरे, प्रदीप मुळे, सिध्दार्थ खाडे आदींनी प्रशासनास निवेदन सादर करीत या दोन्ही घटनातील आरोपींना फाशीची शिक्षा व्हावी, अशी मागणी केली.

### लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांच्या आशा पल्लवीत

#### जायकवाडीत ३३ टक्के पाणी : सिंचनाचा प्रश्न मार्गी लागणार

**परभणी,/प्रतिनिधी :** जायकवाडी जलाशयात गुरुवारी सकाळपर्यंत ३३.१० टक्के एवढा पाणीसाठा उपलब्ध झाला असून त्याामुळे जायकवाडीच्या लाभक्षेत्रांतर्गत पिण्याच्या पाण्यासह सिंचनाचा प्रश्न सुटणार आहे.

यावर्षी जायकवाडीच्या पाणलोट क्षेत्रात पुरेसा पाऊस झाला नाही. त्याचा परिणाम जूलै अखेरपर्यंत जायकवाडीत पाण्याची आवक झाली नाही. परंतु, या महिन्यात नाशिक जिल्ह्यात पडलेल्या पावसामुळे व जायकवाडीच्या वरच्या भागातील छोटी मोठी धरणे ओवरफ्लो झाल्याने जायकवाडीत पाण्याची आवक सुरु झाली. गुरुवारी सकाळपर्यंत मागील ४८ तासात या जलाशयात ४२८८ क्युसेक एवढ्या वेगाने पाण्याची आवक सुरु होती. या जलाशयात ३३.१० टक्के एवढा पाणीसाठा उपलब्ध झाला आहे. त्याामुळे लाभक्षेत्रांतर्गत खरीप व रब्बी पिकांकरीता पाणी उपलब्ध होणार हे निश्चित झाले आहे.

जायकवाडीच्या लाभक्षेत्रात जवळपास १ लाख ८३ हजार ३२२ हेक्टर शेतजमीन सिंचनाखाली आहे. विशेषतः २०८ किलो मीटर अंतराच्या डाव्या कालव्यावर १ लाख ४१ हजार ६४० हेक्टर शेत जमीनीचे सिंचन अवलंबून आहे. छत्रपती संभाजी नगर, जालना व परभणी जिल्ह्यातील टेलपर्यंतच्या गावांना जायकवाडीतील पाणी उपलब्ध होत आले आहे. या खरीप व रब्बी हंगामात पाणी पाळी मिळणार आहे.

### बी.आर.कुंडगीर राष्ट्रवादीत दाखल

**परभणी,/प्रतिनिधी :** सेवानिवृत्त शिक्षणाधिकारी व गंगाखेड तालुक्याचे भूमीपुत्र बी.आर. कुंडगीर यांनी बुधवारी (दि.२१) मुंबईत ज्येष्ठ नेते शरदचंद्र पवार व प्रदेशाध्यक्ष आमदार जयंत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला.



यावेळी जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार ॲड. विजय गव्हाणे, प्रदेश उपाध्यक्ष भिमराव हत्तीअंबीरे, रमाकांत कुलकर्णी यांच्यासह अन्य उपस्थित होते. कुंडगीर यांच्या पती सौ. करुणाताई कुंडगीर यांनी गेल्या विधानसभा निवडणूकीत गंगाखेड मतदारसंघातून वंचित बहुजन आघाडीमार्फत निवडणूक लढविली होती. सौ. कुंडगीर या जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या आहेत.

सोलापूर तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/
९४ २३३२४६६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३




# जिंतूर-सेलू मतदार संघातील महिलांचा नाशिक येथे महिला मेळाव्यास प्रतिसाद

**जिंतूर/ प्रतिनिधी-** जिंतूर - सेलु मतदार संघातील महिलांचा नाशिक येथे महिला मेळावा संपन्न झाला होता.

जिंतूर - सेलु मतदार संघातील नाशिक येथे राहणाऱ्या महिलांचा आमदार सौ. मेघना बोर्डीकर- साकोरे यांच्या मार्गदर्शना खाली महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी प्रमुख मार्गदर्शक सौ. दिपालीताई चांडक अध्यक्षा स्वंयशक्ती स्त्री उद्यम फाऊंडेशन नाशिक त्याांनी महिलांना सक्षम बनवण्या साठी महिला बचत गट तसेच छोटे-मोठे व्यवसाय असतील ,पापड उद्योग, पासून ते मोठ- मोठ्या उद्योगापर्यंत कसं आपल्याला काम करता येईल याबाबत त्याांनी मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच ऑनलाईन कॉल वरून जिंतूर सेलू मतदार संघाच्या लोकप्रिय विकासरत आमदार सौ. मेघना बोर्डीकर साकोरे यांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण व इतर योजना बाबत मार्गदर्शन केले तसंच महिला भगिनींशी संवाद साधला. यावेळी उपस्थित मराठवाडा सामाजिक फाउंडेशन चे संस्थापक अध्यक्ष आबासाहेब टरपले, प्रदेशाध्यक्ष डी. एस कातारे पाटील, विभाग प्रमुख पंढरीनाथ कोरडे, महिला अध्यक्षा सौ. शोभा बोबडे तसेच मराठवाडा सामाजिक फाउंडेशनच्या महिला पदाधिकारी व जिंतूर सेलू मतदार संघातील महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्याा.

# भोगाव ग्राम पंचायत सपशेल नापास, दोन पिढयापासून अंत्यविधी उघडयावर

## करोडो रुपयांच्या विकास निधी पासून वंचितच



**जिंतूर,/प्रतिनिधी-** तालुक्यातील सर्व परिचित असणारे भोगाव देवी ग्रामपंचायत कार्यालय विकासाच्या बाबतीत पुढे असल्याचा बोलबाला सर्वत्र केल्या जातो मात्र गावातील बौद्ध समाजाला गेल्या दोन पिढ्यांपासून अंत्याविधी पार पाडण्यासाठी स्मशानभूमी नसल्याने बौद्ध समाजाच्या व्यक्तींचा अंत्याविधी उघड्यावरच करावा लागतो. यामुळे भोगाव येथील करोडो रुपयांची विकासाची गंगा स्वातंत्र्याच्या ७५ वर्षानंतर देखील दलित वस्ती कडे वळाली नसल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. याबाबत आज गावकऱ्यांनी निवेदन देऊन आता प्रशासनाकडे स्मशानभूमी बांधकामाची मागणी केली आहे.

जिंतूर तालुक्यातील भोगाव हे जिल्हा परिषद निवडणुकीतील महत्वाचे सर्कल म्हणून बघितल्या जाते या सर्कलवर अनेकांची नजर आहे गावात १८ पगड जातीची माणसं वास्तव्य करतात सर्व समाजासाठी मूलभूत सुविधा स्थानिक ग्रामपंचायत कार्यालयाने उपलब्ध करून दिले आहेत मात्र स्वातंत्र्याच्या ७५ वर्षानंतर देखील गावातील बौद्ध समाजासाठी पक्के स्मशानभूमी शेड नसल्याने आजवरचे सर्व अंत्याविधी हे उघड्यावरच पार पाडले जात असल्याची तक्रार गावातील बौद्ध समाजातील नागरिकांनी केली आहे.

दलित सिंचन भूमीचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी गावकऱ्यांनी गेल्या अनेक वर्षांपासून स्थानिक ग्राम पंचायतीला वारंवार विनंती केली होती परंतु केवळ आश्वासनाच्या बळवणीवर त्याांचे समाधान केले जात होते गावातील मयत व्यक्तींवर अंत्यासंस्कार करण्यासाठी अनेक अडचणींचा सामना करावा लागतो पावसाळ्यात अंत्याविधी करण्यासाठी स्मशानभूमी शेड नसल्यामुळे भर पावसात अंत्याविधी करणे शक्य नाही त्याामुळे पाऊस थांबेपर्यंत मृतदेह घरातच ठेवावा लागतो. पावसात अंत्याविधी करताना अर्धवट प्रेत जाळले जाते, अंत्याविधीला जाण्यासाठी पक्का रस्ता नाही जाळण्यासाठी स्मशानभूमीचे शेड नाही त्याामुळे मृतदेहाची विटंबना होत आहे. असे सादर निवेदनात म्हटले आहे यावर तालुका प्रशासनाने तात्काळ कार्यवाही करून स्मशानभूमी शेड संरक्षण भिंत सुशोभीकरण आणि स्मशानभूमी रस्ता तात्काळ मंजूर करून हा प्रश्न मार्गी लावावा यासाठी निवेदन सादर केले आहे. भविष्यात हा प्रश्न मार्गी न लागल्यास यापुढील अंत्यासंस्कार हे तहसील कार्यालय परिसरात करण्याचे देखील नागरिकांनी सुचित केले.



गंगाखेड- बदलापूर येथील दोन विद्यार्थीनींवर झालेल्या अत्याचाराच्या निषेधार्थ महाविकास आघाडी व मित्रपक्षांच्या वतीने महाराष्ट्र बंद ची हाक देण्यात आली आहे.

### पेट्रोल पंपावरील हल्लाप्रकरणात आरोपींना अटक करा

**परभणी,/प्रतिनिधी-** गंगाखेड येथील चौधरी पेट्रोलियम या पंपावरील कर्मचाऱ्यांवर केलेल्या हल्लया प्रकरणातील आरोपींविरोधात गंगाखेड पोलिसांनी कठोर कारवाई करावी, अशी मागणी फेडरेशन ऑफ ऑल महाराष्ट्र पेट्रोल डिलर्स असोसिएशनने जिल्हाधिकाऱ्यांना सादर केलेल्या एका निवेदनाद्वारे केली आहे. मिलींद सावंत, आनंद भरोसे, सुनील देशमुख, अमोल भेडसुरकर, उमाकांत कोल्हे, सुनील चौधरी, दशरथ चौधरी, निखिल चौधरी, विशाल मुंडे, प्रभाकर मुरकुटे, आनंद जंगले, चेतन रेवणवार, लखन राठोड, एस.एस. देशमुख, विशाल वल्लमवाड, शेषराव सूर्यवंशी, मयुर देशमुख, दिलीप पौळ, आकाश लहाणे, संतोष चौधरी, गणेश भरोसे, तरबेज दुर्राणी, शिवा लोया, अनुप देशमुख, श्रीकांत गीते, हनुमान शिंदे यांच्यासह अन्य सहकाऱ्यांनी सादर केलेल्या निवेदनातून, आरोपींविरोधात कठोर कारवाई करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली.

# मराठा सेवा संघाने समाजाला विधायक दिशा दिली- बारुळकर

## मराठा सेवा संघाचा २४ वा वर्धापन दिन साजरा

**सेलू,/प्रतिनिधी:** मराठा सेवा संघाचा ३४ वा वर्धापन दिन सेलूमध्ये उत्साहात संपन्न सेलू : मराठा सेवा संघाने गत ३४ वर्षात विविध जाती,धर्मात जातीय-सामाजिक,धार्मिक सलोखा निर्माण केला. सर्व जाती-धर्माला एकत्रित बांधले. त्यांच्यात बंधुभाव निर्माण केला.सोबतच मराठा सेवा संघाने समाजाला विधायक दिशा दिली असे प्रतिपादन प्रसिद्ध कीर्तनकार तथा वक्ते मधुकर महाराज बारुळकर यांनी केले.

मराठा सेवा संघाच्या ३४ व्या वर्धापनदिनानिमित्त सेलू तालूका शाखेच्या वतीने कृतज्ञता सन्मान सोहळा,शिवकुटुंब मेळावा व समाज प्रबोधनात्मक व्याख्यान कार्यक्रमात शहरातील साई नाट्यगृहात शुक्रवार ( दि. ६ सप्टेंबर) रोजी बोलत होते. कार्यक्रमाची सुरुवात जिजाऊ पूजन व दीपप्रज्वलन करू जिजाऊ वंदनेने झाली. जिजाऊ वंदना डॉ.भास्कर शिंदे व सच्चिदानंद डाखोरे यांच्या संचाने सादर केली.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष शिक्षणाधिकारी विठ्ठल भुसारे हे होते. तर विचारमंचावर विभागीय अध्यक्ष बाळासाहेब यादव,जिल्हा उपाध्यक्ष सुनील जाधव,जिल्हा प्रवक्ता सुभाष ढगे,माजी तालुकाध्यक्ष शिवाजीराव जोगदंड, जनार्दन पाटील,तालुकाध्यक्ष सर्जेराव लहाने यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना मधुकर महाराज बारुळकर म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांचा समतेचा विचार जनमानसात रुजवून माणसाला माणूस जोडण्याचे मानवतावादी कार्य मराठा सेवा संघ करत आहे. काळानुसार व्यवसाय करावा - विठ्ठल भुसारे



शिक्षणाधिकारी विठ्ठल भुसारे म्हणाले की, समाजातील युवकांनी काळाची पावले ओळखून वाटचाल करावी. काळानुसार आपल्या व्यवसायात बदल करुन यशोशिखरे गाठावीत. उच्च शिक्षणातून स्वतः ची आणि समाजाची प्रगती साधावी.सध्याचा काळ हा ज्ञान,तंत्रज्ञान,स्पर्धेचा आहे. या काळात संधीही मोठ्या प्रमाणात उपलब्ध झाल्या आहेत. आपली क्षमता,अंगभूत कौशल्य वाढवून आधुनिक युगातील संधीचे सोने करावे.

मराठा सेवा संघाच्या उभारणीच्या कार्यात योगदान देणाऱ्या ३४ प्रतिष्ठित व्यक्तिमत्त्वांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रामराव गायकवाड यांनी केले. मराठा सेवा संघाचे जिल्हा उपाध्यक्ष रामराव बोबडे यांनी सेलूतील ३४ वर्षांच्या कार्याचा आढावा घेतला. भूमिका तालुकाध्यक्ष मुख्याध्यापक सर्जेराव लहाने यांनी मांडली. सुत्रसंचलन डॉ.राजाराम झोडगे,माधव गव्हाणे यांनी केले.तर आभार प्रदर्शन प्रा.अनंत मोगल यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शरद मगर,बाबासाहेब पावडे, प्रा.डॉ. रंजित गायके, प्रा.विलास खरात,दामोदर काकडे, राजेंद्र होलसुरे,अनिल पवार,नरेंद्र झाल्टे,अमोल मोगल, बाबासाहेब कास्टे, आत्माराम हरकळ, किरण जाधव,रामेश्वर मगर आदींनी पुढाकार घेतला.





प्रोपिकोनॅझॉल ५ मिली + डायकोफॉल २ मिली + १ लिटर पाणी.

५) २० ते २५ डिसेंबर दरम्यान कार्बन्डॅझीम १ ग्रॅम+ स्पिनोसॅड ५ मिली + १० लिटर पाणी

६) फळे साधारणपणे ज्वारीच्या आकाराची झाल्यानंतर जिब्रेलीक ॲसीड १ ग्रॅम अएँसिटोन ६० मिली किवा अल्कोहोल १०० मिली + १ किलो युरिया अचिलेटेड झिंक २५० ग्रॅम+ १ लिटर पाणी.

**करपा :** रोगाचा प्रादुर्भाव जुन्या पानांपेक्षा नवीन पानांवर जास्त होतो. पानांची रोगग्रस्त देठे काळी पडतात, पाने खाली वाकतात, लक्षण दिसून येते. काही वेळा डागांमुळे संपूर्ण फळ पडते. डागांवर खोल चिरा निर्माण होतात. बुरशी फळात खोल शिरते व फळे नासतात.

**नियंत्रण:** या रोगाच्या नियंत्रणासाठी कार्बेन्डेझीमएक ग्रॅम किंवा कॉपर ऑक्सिक्लोराईड २.५ ग्रॅमप्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

**बांडगुळे:** जुन्या झाडांवर बांडगुळे मोठ्या प्रमाणावर वाढतात. फांद्यांना अन्नपुरवठा न झाल्याने फांद्या सुकतात, उपाय म्हणून संबंधित फांद्या छाटून टाकाव्यात.

**भुरी:** आंबा फळपिकावरील फारच नुकसानकारक असा हा रोग आहे. या रोगामुळे मोहरावर व दांड्यावर कवकाची पांढुरकी वाढ होते. रोगाचा प्रसार वा-यामुळे होतो. या बुरशीची बीजे कोवळ्या मोहोरावर किंवा पालवीवर उगवतात.

त्यांची मुळे मोहोराच्या पेशींमध्ये शिरून अन्नरस शोषतात, सुरुवातीला रोगाची लागण मोहोराच्या शेंड्याच्या भागात होऊन नंतर इतरत्र पसरते. या रोगाचा प्रादुर्भाव जास्त प्रमाणत झाल्यास आंब्याच्या मोहोराचे जवळपास ७ ८० टक्के नुकसान होऊ शकते.

**नियंत्रण :** प्रादुर्भावग्रस्त झाडावर हेक्झाकोनॅझोल ५ मिलि प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

# आंबा मोहोराचे संरक्षण

**फुले मोहोर संरक्षण :** आंबा मोहोर संरक्षणासाठी क्रायसोपली कार्निया या परोपजीवी किडीच्या १ ते १५ हजार अळ्या प्रति हेक्टर झाडावर सोडाव्यात अथवा व्हर्टिसिलियमलेकॅनी या बुरशीवर आधारित कीटकनाशक ४ ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणात फवारावे किंवा कार्बारिल (५० टक्के) २० ग्रॅम अधिक पाण्यात मिसळणारे ८० टक्के गंधक हे २० ग्रॅम प्रति दहा लिटर पाण्यात मिसळून फवारावे.

**आंबा मोहोर संरक्षणाचे वेळापत्रक :**

१) ऑक्टोबरचा तिसरा आठवडा क्विनॉलफॉस २५ टक्के २० मिली + सायपरमेश्रीन १० टक्के ५ मिली + डायथेन एम-४५ ३०ग्रॅम+ १० लिटर पाणी.

२) १ ते ५ नोव्हेंबर दरम्यान स्ट्रेप्टोसायक्लीन १ ग्रॅम+ कॉपर ऑक्सीक्लोराईड ३० ग्रॅम+ इमामेक्टीन बेझोएट ५ ग्रॅम+ १ लिटर पाणी.

३) १५ ते २० नोव्हेंबर दरम्यान मिथिल डिमिटॉन २ मिली + ८ टक्के सल्फर २० ग्रॅम+ १ लिटर पाणी.

४) १ ते ५ डिसेंबर दरम्यान डायक्लोरोव्हॉस २० मिली +

# डाळिंब आणि पेरूपासून क्रश

**डाळिंब आणि पेरू या फळांपासून बनविलेले क्रश हे पचनास सोपे तसेच गुणकारी व शरीरासाठी आरोग्यदायी असते. क्रश या पेयामध्ये एफ.पी.ओ.नुसार २५ टक्के फळांचा लगदा, ३.५ टक्क्यांपेक्षा कमी आम्लता आणि ५५ ब्रिक्स इतके साखरेचे प्रमाण असले पाहिजे. या फळांपासून बनवलेले क्रश हे बाजारात असलेल्या विविध कार्बोनेटेड पेथांपेक्षा उत्तममानले जाते. कारण यामध्ये शरीरासाठी लागणारी पोषकतत्त्वे भरपूर प्रमाणात आढळतात.**

**प्रक्रिया उद्योग**



**डाळिंब:-** डाळिंबामध्ये आम्लपदार्थ, साखर, जीवनसत्त्वे, खनिजे ही भरपूर प्रमाणात आढळतात. डाळिंबाचा रस हा आनुवंशिकतेने येणा-या मधुमेह आजाराला बरा करू शकतो.


डाळिंबामध्ये भरपूर प्रमाणात अ‍ॅन्टीऑक्सिडंट आढळतात. डाळिंबाचा रस ह्या रक्तदाब आणि हृदयविकारासारख्या आजाराला दूर ठेवतो. त्वचेवर तेज येण्यासाठी आणि स्मृती वाढविण्यासाठी देखील डाळिंबाचा रस उपयोगी पडतो.

**पेरू:-** पेरू या फळामध्ये 'क' आणि 'अ' या जीवनसत्त्वांचे प्रमाण भरपूर आढळते. तसेच लोह फॉस्फरस आणि कॅल्शिअमसारखी खनिजे आढळून येतात. तसेच, संत्राच्या फळापेक्षा पाच पट जास्त 'क' जीवनसत्त्व आढळून येते. पेरू हे फळ कर्करोग, मधुमेह या आजारांवर नियंत्रण ठेवण्यास मदत करते. पेरु हे फळ वजन कमी करण्यास मदत प्रक्रेयि :

**अ) डाळिंबाचा रस काढण्याची प्रक्रिया:-** परिपक डाळिंब स्वच्छ पाण्याने धुऊन घ्यावे. डाळिंबाची साल बाजूला काढून दाणे वेगळे करावेत. त्या द्रण्यांना दाब देऊन रस वेगळा करावा. ह्य ा रस गाळून घ्यावा.

**ब) पेरूचा लगदा काढण्याची प्रक्रिया:-** परिपक पेरु स्वच्छ पाण्याने धुऊन घ्यावेत. पेरुचे छोटे-छोटे काप करावेत. त्या तुकड्यांचा लगदा करावा. तो लगदा चाळून घ्यावा. लगद्यापासून बिया वेगळ्या कराव्यात.

**क) क्रश बनविण्याची प्रक्रिया:-** डाळिंबाचा रस आणि पेरुचा लगदा एकत्र करावा. साखर, पाणी, सायट्रिक आम्लाचा उपयोग करून पाक तयार करावा. हा पाक डाळिंबाचा रस आणि पेरुचा लगदा यासोबत एकत्र करावा. या मिश्रणाला मंद आचेवर ५५ ब्रिक्स इतका टी.एस.एस. येईपर्यंत ठेवावे. हे पेय गरम असतानाच बाटल्यांमध्ये भरुन ठेवावे. या बाटल्यांमध्ये भरलेल्या पंथाला पाश्चराईज करावे. पाश्चराईज केल्यानंतर त्याला थंड करावे. थंड केलेल्या बाटल्यांना पुढील वापरासाठी साठवून ठेवावे.





**ऑर्किड फ्लॉवर खूप सुंदर आहे. त्याचे स्वरूप, रंग, आकार आश्चर्यकारक आहे आणि दीर्घकाळ ताजे राहते. भारतात ऑर्किडच्या १२०० हून अधिक प्रजाती आढळतात. ऑर्किडच्या फुलांना बाजारात चांगला भाव मिळतो. अशा परिस्थितीत, जर तुम्ही त्याची लागवड केली तर हा तुमच्यासाठी खूप फायदेशीर सौदा ठरू शकतो.**

# ऑर्किड फ्लॉवरची लागवड

बदलत्या रंग आणि आकारामुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतही ही फुले चांगली विकली जातात. चेन्नई, कोची, बंगळुरू, मुंबई आणि पुणे यांसारख्या भारतातील मोठ्या शहरांमध्ये व्यावसायिक ऑर्किड फार्म्सची स्थापना करण्यात आली आहे.

ज्यामुळे भारतात उगवलेल्या या फुलांनी आंतरराष्ट्रीय फुलांच्या बाजारपेठेत स्वतःसाठी एक विशेष स्थान निर्माण केले आहे. काळी चिकणमाती माती ऑर्किड लागवडीसाठी योग्य मानली जाते. हायड्रोपोनिक्स सारख्या शास्त्रोक्त पध्दतीनेही तुम्ही त्याची लागवड करू शकता. चांगले फुलण्यासाठी चांगली ओलसर माती आवश्यक आहे. ऑर्किड रोपासाठी योग्य पोषण आणि पाणी आवश्यक आहे. यासाठी कुजलेल्या झाडाची साल आणि गांडुळ खताचा वापर खत म्हणून करता येतो.

याशिवाय तुम्ही कॅल्शियमनायट्रेट, अमोनियमनायट्रेट आणि लोह पाण्यात विरघळवून वनस्पतींसाठी खत म्हणून वापरू शकता. ऑर्किडच्या फुलांना शिंपडण्याच्या पद्धतीने सिंचन केल्यास जास्त फायदा होतो. या उन्हाळ्यात सकाळी आणि संध्याकाळी पाणी द्यावे लागते. ि

हवाळ्यात तुम्ही एकदा पाणी देऊ शकता. ऑर्किडला कमी पाणी लागते. ऑर्किड फुलांना २५ ते ३० अंश तापमान आवश्यक असते. त्याच्या फुलांच्या विकासासाठी अधिक आर्द्रता आवश्यक आहे. ऑर्किड फुलांची काढणी फक्त संध्याकाळीच करावी कारण यावेळी फुले पूर्ण बहरलेली असतात. सकाळी फुले कोमेजतात. ऑर्किडची फुले फुलल्यानंतर ३ ते ४ दिवसांनी सुकायला लागतात. त्याच्या देखभालीसाठी कोल्ड स्टोरेज आवश्यक आहे.



# गाजर लागवड

**गाजराचा उपयोग आहारात भाजी म्हणून किंवा कच्ची खाण्यासाठी केला जातो. जनावरांचे खाद्य म्हणूनही केला जातो. गाजरामध्ये अ जिवनसत्व भरपूर प्रमाणात असल्यामुळे त्याचा आहारात नियमित उपयोग केल्यास डोळयांचे आरोग्य उत्तम राहून दृष्टीदोष होत नाही. गाजराचा उपयोग सूप, सॅलड, लोणची, हलका, जॅम इत्यादी पदार्थ तयार करण्यासाठी करतात. गाजराच्या चकत्या करुन सुकवून त्या साठविल्या जातात.**



**हवामान आणि जमीन-** गाजर हे थंड हवामानात वाढणारे पिक आहे. गाजराला आकर्षक रंग येण्यासाठी तापमान १५-२० अंश से. असावे लागते. ऑक्टोबर महिन्याच्या शेवटी व नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या आठवडयात गाजराची लागवड केल्यास जास्त उत्पादन मिळून गाजराचा आकार आणि रंग चांगला राहतो. उत्तम वाढीसाठी १८ ते २४ अंश से. तापमान अतिशय पोषक आहे. गाजर हे जमिनीत वाढणारे मूळ आहे. म्हणून गाजराची वाढ व्यवस्थित होण्यासाठी लागवडीसाठी निवडलेली जमिन मऊ भुसभुशीत असावी भारी जमिनीची मशागत व्यवस्थित करुन जमिन भुसभुशीत करावी. गाजराच्या लागवडीसाठी गाळाची आणि पाण्याचा उत्तम निचरा होणारी, सामु ६ ते ७ असणारी जमिन निवडावी.

**सुधारीत जाती-** पुसा केसर, नानटीस, पुसा मेधाली या गाजराच्या सुधारित जाती आहेत.

**हंगाम-** रब्बी हंगामातील गाजरे जास्त गोड आणि उत्तम दर्जाची असतात. रब्बी हंगामातील लागवड ऑगस्ट ते डिसेंबर तर खरीप हंगामातील लागवड जून ते जूलै महिन्यात करतात.

**लागवड पध्दती-** जमिन खोल उभी - आडवी नांगरुन घ्यावी. जमिन सपाट करुन घ्यावी. बी सरीवरंब्यावर पेरावी. दोन वरंब्यातील अंतर ४५ सेमी ठेवावी बियाची टोकून पेरणी करतांना ३० ते ४५ सेमी अंतरावर सरी ओढून दोन्ही बाजूंनी १५ सेमी अंतरावर टोकन पध्दतीने लागवड करावी. पाभरीने बी पेरतांना दोन ओळीत ३० ते ४५ सेमी अंतर ठेवावी आणि नंतर विरळणी करुन दोन रोपातील अंतर ८ सेमी ठेवावे. एक हेक्टर क्षेत्रासाठी गाजराचे सुमारे ४ ते ६ किलो बियाणे लागते. पेरणीपूर्वी बियाणे उगवून येण्यास पेरणीनंतर १२ ते १५ दिवस लागतात. पेरणीपूर्वी बियाणे २४ तास पाण्यात भिजत ठेवल्यास हा काळ कमी करता येतो.

**खते आणि पाणी व्यवस्थापन-** दर हेक्टरी ८० किलो नत्र ६० किलो स्फूरद आणि ६० किलो पालाश द्यावे. नत्राची अर्धी मात्रा आणि स्फूरद व पालाशची संपूर्ण मात्रा पेरणीपूर्वी द्यावी. नत्राची उर्वरित अर्धी मात्रा लोगवडीनंतर २० दिवसांनी द्यावी. बियांची उगवण चांगली होण्यासाठी जमिन तयार झाल्यावर वाफे आधी ओलावून घ्यावेत आणि वाफसा आल्यावर बी पेरावे. पेरणी केल्यानंतर लगेच हलके पाणी द्यावे.

हिवाळयात ७ ते ८ दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे. गाजर काढणीपूर्वी १५ ते २० दिवस पाणी देणे बंद करावे म्हणजे गाजरात गोडी निर्माण होते. पाण्याचे प्रमाण जास्त झाले तर गाजरात तंतुमय मुळांची वाढ जास्त होते.

**कीड रोग आणि त्यांचे नियंत्रण-** गाजराच्या पिकावर साडया भुंगा (कॅरट विव्हिल) सहा ठिपके असलेले तुडतुडे आणि रूटफलाय या किडीचा उपद्रव होतो. सोंडया भुंगा आणि तुडतुडे या किडींच्या नियंत्रणासाठी १० लिटर पाण्यात १० मिली मेलॅथिऑन मिसळून फवारावे. गाजरावर रूटफलाय या किडीची प्रौढ माशी गर्द हिरव्या ते काळसर रंगाची असते. या किडिच्या अळया पिवळसर पांढऱ्या रंगाच्या असून त्या गाजराची मुळे पोखरुन आत शिरतात आणि आतील भाग खात त्यामुळे गाजराची मुळे वेडीवाकडी होतात आणि कुजतात. गाजराची पाने सुकतात. या किडीच्या नियंत्रणासाठी १० लिटर पाण्यात ३ मिली डायमेथॉएट मिसळून फवारावे. गाजराच्या पिकावर करपा, भुरी, मर पानांवरील ठिपके इत्यादी रोंगाची लागण होते.

**काढणी उत्पादन आणि विक्री-** गाजराची काढणी बियाणाच्या पेरणीनंतर ७० ते ९० दिवसात करतात. गाजरे चांगली तयार व्हावीत म्हणून काढणीपूर्वी पिकाला १५ ते २० दिवस पाणी देण्याचे बंद करावे. कुदळीने खोदून हाताने उपटून किंवा नागराच्या ससाहारूयाने गाजराची काढणी करावी. गाजरावरील पाने कापून गाजरे पाण्याने स्वच्छ धुवून घ्यावीत. लहान मोठी गाजरे आकारानुसार वेगळी करावीत. गाजराचे उत्पादन हेक्टरी ८ ते १० टन इतके मिळते.

# शेळ्या-मेंढ्यांना होणाऱ्या फुट रॉट

**फुट रॉट हा शेळ्या मेंढ्यांमध्ये होणारा अत्यंत संसर्गजन्य आजार आहे. जो त्यांच्या खुरांवर परिणाम करतो. फुट रॉट या आजारामध्ये शेळ्या आणि मेंढ्यांचे पाय कुजतात. या आजारामध्ये जनावराचे वजन कमी होवुन उत्पादन कमी होते, आणि योग्य उपचार न मिळाल्यास जनावरांचा अकाली मृत्यू होतो.**



**या आजाराची लक्षणे:-**

पाय कुजलेल्या शेळ्यांमध्ये वेदनेमुळे अस्वस्थता जाणवेल, प्रभावित खुर सुजतात आणि स्पर्शास कोमल लागतात. गंभीर प्रकरणांमध्ये सूज पाय वर वाढू शकते ज्यामुळे जनावरे लंगडत चालु लागतात.

फूट रोटमुळे खुरांमधुन खराब वास येतो, ज्यामुळे प्रभावित खुरातील बॅक्टेरिया वाढीस लागतात. खुरांना तडे गेलेले किंवा खुर खराब झालेले दिसू शकतात आणि त्याचे पृष्ठभाग खडबडीत असू शकते. फूटरोटमुळे प्रभावित खुरातून स्राव होऊ शकतो, जे संसर्गाचे महत्वाचे लक्षण असू शकते. पाय कुजलेल्या शेळ्या उभे राहण्यास किंवा चालण्यास अनिच्छा दाखवत असतील, तर वेदना तीव्र असू शकतात. संसर्ग पसरण्यापासून आणि शेळ्यांमध्ये अधिक गंभीर आरोग्य समस्या निर्माण होण्यापासून रोखण्यासाठी शक्य तितक्या लवकर पाय कुजण्याचे निदान आणि उपचार करणे महत्वाचे आहे.

**या आजारावर नियंत्रण:-**

पशुवैद्यांच्या सल्ला घेवुन वेळोवेळी जनावरांची नखे छाटावीत.

कळपात समाविष्ट करण्यापुर्वी नव्या जनावरांना फूटरॉट आणि इतर जुनाट आजारा नसल्याची खात्री करुन घ्यावी.

जनावरांच्या वाहतुक वाहनांचे निर्जंतुकीकरण करणे महत्त्वाचे आहे.

फूटरॉट संसर्गचा धोका कमी होण्यासाठी दर ५ ते ७ दिवसांनी १० टक्के झिंक सल्फेटच्या पण्यामध्ये मेंढ्यांना १५ मिनिटांपर्यंत उभे राहण्यास भाग पाडावे.

बाधित जनावरे बरी होईपर्यंत कोरड्या जागेत ठेवावीत, कारण ओलाव्यामुळे हा संसर्ग वाढतो. त्याचबरोबर पशुवैद्यांकडुन योग्य तो सल्ला घ्यावा.

# हिंगोलीत प्रभागनिहाय पंचनामे करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश

## गांगलवाडी येथील फुटलेल्या पाईपलाईनची केली पाहणी, शेतकऱ्यांशी साधला संवाद



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ सप्टेंबर**

शहरात १ आणि २ सप्टेंबर रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे शहरातील काही भागात पाणी शिरल्याने घरांचे तसेच जीवनावश्यक वस्तूंसह इतर साहीत्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. या भागांची जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी शनिवार दि ७ सप्टेंबर रोजी पाहणी केली तसेच नुकसानग्रस्त भागांचे प्रभागनिहाय पंचनामे केले. त्यानंतर शहराला पाणीपुरवठा करणारी मुख्य जलवाहीनी गांगलावाडी येथे वाहून गेल्यामुळे त्याठिकाणी प्रत्यक्ष जाऊन पाहणी केली.

शहरात दि १ आणि २ सप्टेंबर रोजी अतिवृष्टीमुळे मोठे नुकसान झाले. बांगर नगर, जीनमाता नगर, आझम कॉलनी, झमझम कॉलनी, मस्तानशहा नगर, बावनखोली, महादेववाडी, रिसाला बाजार भागातील अनेक घरांमध्ये पाणी शिरल्याने नागरिकांचे मोठे नुकसान झाले होते. तसेच शहरातील काही दुकानांमध्ये पाणी शिरल्यामुळेही दुकानातील साहीत्य पुराच्या पाण्यात वाहून गेले तसेच धान्य व इतर मालाचे प्रचंड नुकसान झाले. .

दरम्यान, शनिवारी जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी शहरातील विविध प्रभागांमध्ये प्रत्यक्ष जाऊन पाहणी केली. यावेळी नगर पालिकेचे मुख्याधिकारी अरविंद मुंढे, स्वच्छता निरीक्षक बाळू बांगर, अभियंता आदींची उपस्थिती होती. यावेळी या भागातील नागरिकांशी संवाद साधला. अनेकांनी त्यांच्या झालेल्या नुकसानीची माहीती जिल्हाधिकारी गोयल यांचेसमोर मांडली. त्यानंतर जिल्हाधिकारी गोयल यांनी मुख्याधिकारी मुंढे यांना प्रभागनिहाय नुकसानीचे पंचनामे करण्याच्या सूचना दिल्या. पुढील दोन दिवसात पंचनामे पूर्ण करून नुकसानीचा सविस्तर अहवाल विभागीय आयुक्त व शासनाकडे सादर केला जाणार असल्याचे जिल्हाधिकारी गोयल यांनी सांगितले.

त्यानंतर शहराचा पाणीपूरवठा मागील तीन दिवसांपासून विस्कळीत झाला आहे. अतिवृष्टीमुळे गांगलवाडी येथे नदीच्या पुरामुळे जलवाहीन्या फुटल्या तर काही वाहून गेल्या. या ठिकाणाची प्रत्यक्ष पाहणी करीत नगर पालिकेला आवश्यक सुचना दिल्या. पुढील तीन दिवसांत हिंगोली शहराचा पाणी पूरवठा सुरळीत होईल असे त्यांनी स्पष्ट केले.

# ढोल ताशांच्या गजरात गणरायाचे हिंगोलीत आगमन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ सप्टेंबर**

हिंगोली शहरासह जिल्ह्यात ठिकठिकाणी गणरायाचे ढोल ताशांच्या गजरात मोठ्या उत्साहात आगमन झाले. यावेळी तरूणाई ढोल ताशांच्या गजरात थिरकत होती. लाडक्या गणरायाचे स्वागत घरोघरी मोठ्या आनंदात आणि विधीवत पूजा करून करण्यात आले. शनिवारी सकाळपासूनच गणरायाच्या आगमनासाठी घरोघरी लगबग सुरू झाली. शहरातील गांधी चौकात गणरायाच्या सुंदर आणि आकर्षक मूर्ती खरेदी करण्यासाठी अबालवृध्दांनी गर्दी केली होती. विविध गणेश मंडळातील पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी गणरायाचे ढोल ताशांच्या गजरात वाजत गाजत मिरवणुक काढीत स्थापना केली. शहरातील विविध भागात मंडप डेकोरेशन करण्यात आले असून संध्याकाळी उशिरापर्यंत गणपतीच्या मिरवणुका ढोल ताशांच्या गजरात निघाल्या होत्या. यावेळी तरूणाई ढोल ताशांच्या गजरात गुलालाची उधळण करीत लाडक्या गणरायाच्या स्वागतासाठी सज्ज झाल्याचे पहायला मिळाले. येथील नवसाला पावणारा गणपती श्री विघ्नहर्ता चिंतामणी गणपतीची मिरवणूक मोठ्या थाटात काढण्यात आली. शहरातील प्रमुख मार्गावरून ही पालखी मिरवणुक काढण्यात आली. या मिरवणुकीत मोठ्या संख्येने महिला, तरूणीसह नागरिक सहभागी झाले होते. आ. संतोष बांगर यांनी श्री विघ्नहर्ता चिंतामणी गणपतीच्या पालखीची पूजा केली. यावेळी श्री विघ्नहर्ता चिंतामणी गणपती मंदिर चे सर्व विश्वस्तांनी पालखी खांद्यावर घेऊन श्रीच्या पालखीची सुरुवात करण्यात आली. या वेळी विश्वस्त मंडळाच्या वतीने श्रीचे पूजन करण्यात आले. या वेळी कळमदूरी चे आ. संतोष बांगर, दिलीप बांगर, राम कदम सुरेश आप्पा सराफ, गणेश बांगर, कपिल खंडेलवाल सतिष लोहिया, मनोज दावनगिरे, अनिल बिडकर, सुरेश घन, बद्रिनारायान मुंदडा, प्रेमचंद जैस्वाल, सचिन घन, बालाजी कामटलवर, पवन मुंदडा, महेश सराफ, धनजय मिस्कीन, बाबू देवगिरीकर, विनोद सूर्यवंशी, ओम आहेर, विपुल धनमने, विजय घन आदी उपस्थित होते.

# संशयावरून वसमत पोलिसांनी धान्याचा ट्रक पकडला

**तभा वृत्तसेवा**
**वसमत, ७ सप्टेंबर**



वसमत तालुक्यातील ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील माळवटा शिवारात संशयित रेशन धान्य जिल्हा पोलीस पथक आणि ग्रामीण पोलीस पथकाने ताब्यात घेतला आहे.

मात्र सदर धान्य रेशनचा की शेतकऱ्यांचा याबाबत प्रश्नचिन्ह आहे. दरम्यान अन्नपुरवठा विभाग व तहसीलदार यांचे चौकशी नंतरच सत्य बाहेर येणार आहे.

वसमत शहरातून नागपूर येथे रेशनचा ३१ टन तांदूळ घेऊन जाणारा ट्रक माळवटा शिवारातील एका पेट्रोल पंपावरून गुरुवारच्या पहाटे जिल्हा पोलिस पथक व ग्रामीण पोलिसांनी संयुक्त कारवाई करत ताब्यात घेतला. तांदळासह १० लाख रुपयांच वर पोलिसांनी मुद्देमाल जप्त केला आहे. ट्रकमधील तांदूळ रेशनचे आहेत का? याची तपासणी करण्यासाठी पोलिसांनी पुरवठा विभागास कळविले आहे. वसमत शहरासह तालुक्यात रेशन धान्याचा काळा बाजार सुरूच आहे. वसमत शहरातून नागपूर व हैदराबाद येथील काळ्या बाजारात धान्य जात आहे. माळवटा शिवारात असलेल्या एका पेट्रोलपंपावर संशयित रेशन धान्याचा ट्रक उभा असल्याची गुप्त माहिती पोलिस अधीक्षकांच्या पथकास मिळाली. गुरुवार रोजी पहाटे ग्रामीण पोलिस पथकाने पेट्रोलपंपावर भेट देऊन ३१ टन तांदळाने भरलेल्या ट्रकची चौकशी केली. तसेच चालक संदीप कन्हाळे (रा.गिरगाव) याची चौकशी केली व त्यास ताब्यात घेतले. चालकाने पोलिसांना समाधानकारक उत्तर दिले नसल्याने पोलिसांनी ट्रक चौकशीसाठी (क्र. एमएच २६ सीएच ९३९७) सह ३१ टन तांदूळ असा १० लाख रुपयांवरील सांठा ताब्यात घेतला. यानंतर ग्रामीण पोलिस ठाण्यात पोलिसांनी ट्रक लावला आहे. ट्रकमधील तांदळाची तपासणी करण्यात यावी, यासंदर्भात पोलिसांनी वसमत येथील पुरवठा विभागास पत्र पाठविले आहे.

मागील काही महिन्यात वसमतमध्ये रास्त धान्याचा काळा बाजार करणारी वाहने पकडल्याच्या घटना घडत असल्यामुळे तालुका रास्त भाव धान्याचे काळाबाजार करणारे केंद्र बनले आहे की काय अशी चर्चा होत असून सदर मालाची तपासणी केल्यानंतरच पुढील कार्यवाही होणार आहे.

# भारतीय जनता युवा वर्ग सुपर वॉरियर्सची महत्वपूर्ण बैठक संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ सप्टेंबर**

भारतीय जनता पक्षाच्या सुपर वॉरियर्सची महत्वपूर्ण बैठक आ. तान्हाजीराव मुटकुळे यांच्या निवासस्थानी पार पडली.

यावेळी युवा वर्गाचं प्रभाग निहाय, गावनिहाय संघटन करणे व सर्वसामान्यांच्या समस्या सोडविणे या निमित्ताने बैठकीचे आयोजन युवा नेते शिवाजीराव मुटकुळे यांनी केले होते. युवावर्गास प्राधान्य दिल्यामुळे त्यांच्यात नवचैतन्य निर्माण झाल्यासारखे वाटत होते. या बैठकीमध्ये निवडणुकीची मोर्चा बांधणी व संघटन मजबूत कशा पद्धतीने झाले पाहिजे यावर चर्चा झाली. शिवाय महायुती शासनाच्या विविध योजना सर्वसामान्यापर्यंत गणेश उत्सव व दुर्गा महोत्सव यामध्ये कशा पद्धतीने पोहोचविता येतील यावर चर्चा करण्यात आली. यावेळी आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी मार्गदर्शन केले. तसेच माजी जिल्हाध्यक्ष माजी आमदार रामराव वडकुते, जिल्हाध्यक्ष फुलाजी शिंदे, शहराध्यक्ष कैलास काबरा, युवा नेते शिवाजीराव मुटकुळे, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष पप्पू चव्हाण यांनी मार्गदर्शन केले तर आशीष वाजपेयी, कैलास शहाणे यांनी निवडणूक नियोजनाबद्दल मार्गदर्शन केले यावेळी कार्यकर्ते आशिष शर्मा, शिवानंद आप्पा यांनी मनोगत व्यक्त केले. हमीद प्यारेवाले, नामदेवराव वाणी, श्रीराम राठोड, प्रशांत गोल्डी, आशिष जयस्वाल, कृष्णा ढोके, रजनीश पुरोहित, सचिन शिंदे, सुमंत नायक सवनेकर, प्रेमसेन भगत, राजु पिल्ले, स्वप्निल आप्पा, कृष्णा ढोके, शैलेश लाहोटी, जय घोडे, भैय्या गायकवाड, गुड्डू देवकते, आकाश चितेवर, विजय राटनालू आदींची उपस्थिती होती.

## संक्षिप्त वृत्त

### बागवान चॅरिटेबल ट्रस्टतर्फे कोकाटेंचा सत्कार



हिंगोली- बागवान चॅरिटेबल ट्रस्टच्यावतीने जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांचा सत्कार करण्यात आला. भाजी व फळ विक्रीसाठी ज्या समस्या निर्माण होतात त्या विषयावर सविस्तर चर्चा केली. या सत्कार समारंभ कार्यक्रममध्ये बागवान ट्रस्टचे अध्यक्ष हाजी मो. रफिक अब्दुल कादर बागवान, उपाध्यक्ष अब्दुल मतिन मो. शिकुर बागवान, सचिव मो. फारुख मो. नुर बागवान ,कोषाध्यक्ष मो. ईसा मो. नुर बागवान, सर्व कोअर कमिटी सदस्य अब्दुल समद हाजी मो. ईस्माईल बागवान,शेख नुर शेख बशीर बागवान, मो. माबुद मो. शिकुर बागवान, अब्दुल सत्तार मो. शिकुर बागवान, मो. मुजिब राजा, मो. आसिफ मो. युसूफ बागवान, मो.सादीक अब्दुल हमीद बागवान, मो. जाविद मो. खाजा बागवान, मो. सिद्दीक अब्दुल हमीद बागवान, मो. शफिक हाजी अब्दुल कादर बागवान, मो. नईम अब्दुल रज्जाक बागवान, मो. मुजिब मो. मजिद बागवान आदी सदस्याची उपस्थिती होती.

### मिरवणुकीच्या पार्श्वभूमीवर चोख पोलिस बंदोबस्त



हिंगोली- शहरासह जिल्ह्यात गणरायांच्या मिरवणुकीच्या पार्श्वभूमीवर चोख पोलिस बंदोबस्त लावण्यात आला होता. शहरातील गांधी चौक, महावीर चौक, जवाहर रोड आदी ठिकाणी पोलीसांची गस्त लावण्यात आली होती. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांनी पथसंचलन केले होते. पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील, पोनि विकास पाटील, तीन उपविभागाचे पोलिस उपाधीक्षक, शहरचे पोनि नरेंद्र पाडळकर यांच्यासह दंगल नियंत्रण पथक, राज्य राखीव दलाचे तुकड्या तैनात करण्यात आल्या होत्या. जिल्ह्यात संवेदनशील भागातही पोलिस प्रशासनाच्यावतीने चोख बंदोबस्त लावण्यात आला आहे.

# अखेर जिल्ह्यातील ९७ शिक्षकांना दर्जोन्नती, शिक्षक संघटनेकडून शिक्षणाधिकारी संदीप सोनटक्केंचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ सप्टेंबर**



जिल्ह्यातील ९७ प्राथमिक शिक्षकांना विषय शिक्षक म्हणून दर्जोन्नती मिळाली असून या शिक्षकांना शुक्रवारी दिनांक ७ सप्टेंबर रोजी सायंकाळी उशीरा पर्यंत समुपदेशनाने पदस्थापना दिल्या आहेत. सर्व शिक्षकांना मागितलेल्या ठिकाणी पदस्थापना मिळाल्याने शिक्षकांतून समुपदेशनाची प्रक्रिया सुरु करण्यात आली होती. यावेळी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक नामदेव केंद्रे, शिक्षणाधिकारी संदीप सोनटक्के, माध्यमिक शिक्षणाधिकारी प्रशांत डिग्रसकर, गटशिक्षणाधिकारी औंढा नागनाथ तानाजी भोसले, गटशिक्षणाधिकारी हिंगोली नितीन नेटके, गटशिक्षणाधिकारी दत्तात्रय नांदे कळमनुरी यांच्या उपस्थितीत समुपदेशन घेण्यात आले. दिनांक ६ रोजी सायंकाळी उशीरापर्यंत चाललेल्या या प्रक्रियेत शिक्षकांना त्यांनी मागितलेल्या जागेवरच पदस्थापना दिली आहे. विशेष म्हणजे यावेळी पारदर्शकतेसाठी छायाचित्रीकरण देखील करण्यात आले.

दरम्यान, समुपदेशनानंतर लगेचच शिक्षकांना नियुक्ती आदेश देण्यात आले असून सोमवारी दिनांक ९ ला सर्व ९७ शिक्षक शाळांवर रूजू होणार आहेत. जिल्ह्यातील उच्चमाध्ममिक शाळेला विषय शिक्षक मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यास मदत होणार आहे. जिल्हयातील शिक्षकांना शिक्षण विभागातून शिक्षक दिनाची भेट दिली असल्याचे बोलले जात आहे.

समाधान व्यक्त होत आहे. तर दुसरीकडे उच्च माध्यमिक शाळांना विषय शिक्षक मिळाल्याने विद्यार्थ्यांचेही शैक्षणिक नुकसान टाळण्यास मदत होणार आहे. हिंगोली जिल्हयातील इयत्ता सहावी ते आठवीच्या वर्गासाठी विषय शिक्षक नसल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ लागले होते. या संदर्भात अनेक गावकऱ्यांनी लोकप्रतिनिधी आमदार संतोष बांगर कडे तक्रारीही मांडल्या होत्या. शिक्षक संघटनांनी याबाबतीत वेळोवेळी निवेदने सुद्धा दिली होती त्यावरून आमदार संतोष बांगर यांनी तातडीने जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधून उच्चमाध्यमिक शाळामध्ये विषय शिक्षकांच्या दर्जोन्नतीने नियुक्त्या देण्याच्या सुचना केल्या.

त्यानंतर जिल्हा परिषदेच्या मुख्यकार्यकारी अधिकारी नेहा भोसले, अतिरिक्त मुख्यकार्यकारी अधिकारी अनुप शेंगुलवार यांच्या मार्गदर्शनाखाली पात्र शिक्षकांना विषय शिक्षक म्हणून दर्जोन्नती देण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली होता. त्यानंतर शुक्रवारी दिनांक ६ हिंगोली जिल्हा परिषदेच्या षटकोणी सभागृहात जिल्हयात ९७ प्राथमिक शिक्षकांना विशेष शिक्षक म्हणून दर्जोन्नती मिळाली आहे. यामध्ये मराठी विषयाचे ७५, गणित विषयाचे १० तर ऊर्दु विषयाच्या ९ शिक्षकांचा समावेश आहे. विशेष म्हणजे सदरील दर्जा नदी दर्जा उन्नती अतिशय पारदर्शक इन कॅमेरा पार पडल्यामुळे विविध शिक्षक संघटनांनी शिक्षणाधिकारी संदीप सोनटक्के यांचा हरिभाऊ मुटकुळे,पंडितराव नागरगोजे, किरण राठोड, हिंगोली जिल्हा खाजगी माध्यमिक शिक्षकेतर संघटनेचे गोपालराव सरनायक, चंद्रकांत कावरखे, बबन दांडेकर संदीप इंगोले, विपुल सरनायक, निकम पाटील यांनी यावेळी सत्कार करून आभार व्यक्त केले आहे.

# आ. राजु नवघरेंतर्फे गुरू गौरव पुरस्कार



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली ७ सप्टेंबर**

शिक्षकांना मानसन्मान मिळावा यासाठी वसमत विधानसभा मतदारसंघांत आ. राजू नवघरे यांनी गुरु गौरव पुरस्कार सोहळ्याचे आयोजन मयूर मंगल कार्यालय येथे करण्यात आले होते. यावेळी वसमत व औंढा तालुक्यातील १११ शिक्षकांना पुरस्कार प्रदान करण्यात आला.

यावेळी बोलतांना आ. नवघरे म्हणाले की, शिक्षक विद्यार्थी घडविण्याचे काम करतो. समाजाला दिशा देण्याचे काम शिक्षकांवर अवलंबून आहे. त्यांच्या हातात देशाचे भवितव्य म्हणजे भावी पिढी आहे. त्यांच्या कार्याचा गौरव झालाच पाहीजे.यावेळी प्रमुख मार्गदर्शक प्रा.डॉ. जगदिश कदम तर अध्यक्ष यु.टी.पवार शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर व शिक्षक, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी विरोधकांना टोला लगावतांना आ. नवघरे म्हणाले की, सध्या कुठलीही शिक्षण संस्था नाही परंतु एकदा हाती घेतलेली सेवा कधी खंडीत करत नाही त्याच प्रमाणे हा गुरु गौरव पुरस्कार सोहळा दरवर्षी घेतला जाईल.

यावेळी शिक्षक व शिक्षिका यांना पुरस्कार देऊन सन्मान केल्याबद्दल सर्वांनी आमदार नवघरे यांचे आभार मानले. गुरु गौरव पुरस्कार सोहळा संपन्न झाल्यानंतर भोजनाचा आस्वाद सर्वच शिक्षक वर्ग व कार्यकर्त्यांनी घेतला.

# समगा जिल्हा परिषद शाळेत शाळा व्यवस्थापन समितीची स्थापना

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली ७ सप्टेंबर**




तालुक्यातील समगा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये पालक सभेचे आयोजन करण्यात आले होते. पालक सभेमध्ये उपस्थित सर्व पालकांना शाळा व्यवस्थापन समितीचे कार्य, रचना आणि उद्देश याविषयी मुख्याध्यापक गजानन पेदे यांनी मार्गदर्शन केले. शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा सौ सारिका सुधाकर सरकटे यांच्या अध्यक्षतेखाली पालक सभेचे आयोजन करण्यात आले होते. पालक सभेला उपसरपंच बळीराम सरकटे, उपाध्यक्ष भारतजी गडधने, शिवाजीराव सरकटे, सुधाकरराव सरकटे आणि गावातील शिक्षणप्रेमी उपस्थित होते. क्षीरसागर सर आणि जाधव सर यांनी शाळा व्यवस्थापन समिती विषयी महत्वाची माहिती सांगितली. खेळीमेळीच्या वातावरणात लोकशाही पद्धतीने वर्गातून सदस्यांची निवड करण्यात आली. निवडून आलेल्या १३ सदस्यांमधून अध्यक्षा म्हणून सौ. मीना ज्ञानेश्वर सरकटे तर उपाध्यक्ष म्हणून राहुल सुदामराव इंगळे यांची निवड एकमताने करण्यात आली. शिवाजीराव सरकटे, विजय परसराम जाधव, पांडुरंग देवराव सरकटे यांची निवड करण्यात आली. निवड झालेल्या सर्व सदस्यांचे मुख्याध्यापक गजानन पेदे आणि सर्व शिक्षकांतर्फे स्वागत करण्यात आले.

छायाचित्र नरेंद्र गडप्पा



छायाचित्र नरेंद्र गडप्पा



छायाचित्र नरेंद्र गडप्पा



नांदेड - गणपती बाप्पा मोरयाच्या जयघोषात जिल्ह्यासह शहरात श्री गणेशाचे आगमन झाले. मोठ्या उत्साहात घरा-घरात, गणेश मंडळांनी श्री गणेशाची प्रतिष्ठापना करण्यात आली. छाया- नरेंद्र गडप्पा, नांदेड

## संक्षिप्त वृत्त

### सार्वजनिक गणेश मंडळाच्या वतीने श्रीमद भागवत कथा व राम कथेचे आयोजन

**भोकर**-सार्वजनिक गणेश मंडळ भोकर च्या वतीने चालू वर्षाच्या गणेश उत्सवात दि.१०ते १७ सप्टेंबर दरम्यान श्रीमद भागवत कथा व श्री राम कथेचे आयोजन करण्यात आले असून आरोग्य शिबिर,व्याख्यान,राष्ट्रीय





कीर्तन असे विविध कार्यक्रम घेण्यात येणार आहेत. भोकर येथील सार्वजनिक गणेश मंडळाच्या वतीने दरवर्षी धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते चालू वर्षी १० ते १७ सप्टेंबर दरम्यान श्रीमद् भागवत कथा सकाळी११ते २ या वेळामध्ये होईल भागवत कथेचे प्रवक्ते ह.भ. प.गजानन बाबा कळमनुरीकर हे राहणार असून सायंकाळी ७ते १० या वेळामध्ये श्री राम कथा होणार आहे राम कथेचे प्रवक्ते प.पू.बालयोगी आचार्य गजेंद्र जी चैतन्य स्वामी हे राहणार आहेत, दुपारी ३ ते ५ या वेळामध्ये आरोग्य शिबिर होणार आहे १५ सप्टेंबर रोजी महंत प्रभाकर बाबा कपाटे यांचे व्याख्यान तीन ते पाच या वेळामध्ये होईल १६ सप्टेंबर रोजी दुपारी २ ते ५या वेळामध्ये प्रा.डॉ.प्रशांत ठाकरे यांचे कीर्तन आयोजित करण्यात आलेले आहे, दररोज दुपारी,२ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत महाप्रसाद चालू राहील ,दररोज सकाळी ६ ते ७ या वेळामध्ये आर्ट ऑफ लिविंग शिबिर १२ सप्टेंबर रोजी दुपारी ३ते५वा.रुद्र पूजा, सायंकाळी ६ ते ७सामुदायिक प्रार्थना होईल,दररोज सायंकाळी६.३०वा.प्रजापिता ब्रह्मकुमारी विश्वविद्यालय केंद्र गंदेवार कॉलनी भोकर यांचे अध्यात्मिक प्रवचन होईल या सर्व कार्यक्रमाचा भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन सार्वजनिक गणेश मंडळ भोकर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

### सण,उत्सव शांततेच्या वातावरणामध्ये साजरे करून आदर्श निर्माण करावा :डेनियन बेन

**मुदखेड**-येणारे सण उत्सव साजरे करीत असताना प्रत्येक नागरिकांनी आपापले सण, उत्सव शांततेच्या वातावरणामध्ये साजरे करून एक नवा आदर्श निर्माण करावा असे प्रतिपादन पोलीस उपविभागीय अधिकारी डॅनियल बेन यांनी तहसील कार्यालयाच्या सभागृहात दि.६ सप्टेंबर रोजी श्री गणेशोत्सव ,ईद निमित्त आयोजित शांतता समितीच्या बैठकी प्रसंगी बोलताना केले.तालुक्यातील व शहरातील प्रत्येक गणेश मंडळानी कायदा सुव्यवस्थेचे पालन करावे व गणेश भक्तांनी गुलाला ऐवजी फुलांचा वापर करावा असे पोलीस निरीक्षक वसंत सप्रे यांनी आपल्या प्रास्ताविकेतून सूचना दिल्या. तसेच मुख्याधिकारी शैलेश फडसे यांनीही गणेश मंडळांना सांगितले आहे की कुठलीही समस्या असो ती सोडवण्याचा प्रयत्न करणार. दरवर्षी प्रमाणे याही वर्षी उत्कृष्ट गणेश मंडळास पारितोषिक देण्यात येईल असे काँग्रेस कमिटीचे शहरध्यक्ष कैलास गोडसे यांनी सांगीतले आहे. यावेळी पोलिस उपविभागीय अधिकारी डॅनियल बेन, तहसीलदार आनंद देऊळगांवकर, मुदखेड पोलिस ठाण्याचे पोलिस निरिक्षक वसंत सप्रे, सहायक पोलीस निरीक्षक बी आर कांबळे,न. पा. मुख्याधिकारी शैलेश फडसे, नायब तहसीलदार मारोतराव जगताप, मंडळ अधिकारी हयूम पठाण, महावितरण चे अभियंता लक्ष्मण शिंदे, विशेष शाखेचे किशोर पाटील, काँग्रेस कमिटीचे तालुकाध्यक्ष प्रताप देशमुख, शहराध्यक्ष कैलास गोडसे, माजी सैनिक लक्ष्मणराव देवदे,करीम खा साब, शंकर सेठ राठी, जेष्ठ पत्रकार मनोज कमटे, गैबिपीर बाबा दर्गा कमिटीचे अध्यक्ष शेख नफीस, उपाध्यक्ष अब्दुल अजीज, सचिव शेख पाशा, गिरीश कोत्तावार, मुजीब पठाण, ऋषिकेश पारवेकर , सचिन चंद्रे, पत्रकार परिषद तालुकाध्यक्ष सिद्धार्थ चौदंते, साहेबराव गागलवाड, अतिक अहमद, नामदेव राहेरे, साहेबराव हौसरे,अब्दुल रझाक, अमोल टेकले,यांची उपस्थिती होती. या बैठकीत खासदार कै वसंतराव चव्हाण यांना दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रद्धांजली देण्यात आली. या बैठकीचे सूत्रसंचालन पत्रकार प्रल्हाद मस्के यांनी केले तर आभार सहायक पोलीस निरीक्षक बी. आर. कांबळे यांनी मानले.

### पाराशर स्वामी यांना राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कार

**नांदेड**-पूर्णा येथील विद्या प्रसारिणी सभेचे हायस्कूलचे मराठी विषयाचे सहशिक्षक पाराशर शंकरराव स्वामी यांना अविष्कार फाउंडेशन ऑफ



इंडिया (एनजीओ) कोल्हापूर यांच्यातर्फे यावर्षीचा राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कार जाहीर झाला आहे. स्वामी हे गेल्या १९ वर्षापासून या शाळेत अध्यापनाचे कार्य करतात. एक उपक्रमशील शिक्षक, विद्यार्थी प्रिय शिक्षक, उत्कृष्ट वक्ते सूत्रसंचालक, कथाकार, नाट्य दिग्दर्शक, विद्यालय गीताचे रचनाकार, वक्तृत्व स्पर्धा, कथाकथन स्पर्धा, निबंध स्पर्धा, हस्ताक्षर स्पर्धा अशा अनेक स्पर्धेतून विद्यार्थ्यांना घडवणारे, मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा या स्पर्धेत शाळेला यश मिळवून देण्यात महत्वपूर्ण योगदान देणारे, शैक्षणिक क्षेत्राबरोबर सामाजिक क्षेत्रातही त्यांचे कार्य आहे. रक्तदान शिबिर, वधु-वर परिचय मेळावा, सामूहिक विवाह मेळावा, वृक्षारोपण व पर्यावरण जनजागृती घडवून आणण्यात महत्त्वपूर्ण सहकार्य करणारे, अभ्यासू व्यक्तिमत्त्व म्हणजे स्वामी. त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांना या वर्षीच्या राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कार जाहीर झाला आहे. दि.२९ सप्टेंबर रोजी सोलापूर येथील एका भव्य कार्यक्रमात तो प्रदान करण्यात येणार आहे. त्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. दत्तात्रय वाघमारे, उपाध्यक्ष भिमराव पाटील कदम, श्रीनिवास काबरा, वि .गो. रुद्रवार, कोषाध्यक्ष उत्तमराव कदम, साहेबराव कदम, बाबुराव मोरे, सौ. विद्याताई पवार, ज्ञानदेव रणमाळ, डॉ.सोनी, डॉ. विनय वाघमारे, इंजि. काकडे, डॉ. हरिभाऊ पाटील, सर्व संचालक मंडळ मुख्याध्यापक डी.एल.उमाटे, प्राथमिक मुख्याध्यापक हिंगणे, जवाहरलाल नेहरू इंग्लिश स्कूलच्या मुख्याध्यापिका श्रीमती अनिता बेगम व संस्थेचे सर्व शिक्षक वृंद, कर्मचारी यांनी पुरस्काराबद्दल स्वामी यांचे अभिनंदन केले आहे.

### खडकपुरा भागातील खुन प्रकरण

# मुलगाच निघाला वडीलांचा मारेकरी

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, ०७ सप्टेंबर-**

शहरातील खडकपूरा येथील मदिना हॉटेलचे मालक शेख युनुस यांचा १ सप्टेंबर रोजी खून झाला होता. या प्रकरणातील मुख्य आरोपी त्याचा मुलगाच निघाला असून, घरगुती वादातून त्याने अन्य दोघांना आपल्या वडिलांना मारण्याची सुपारी दिली होती. यातील तीन आरोपींना अटक करण्यात आल्याची माहिती जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.

दि. १ सप्टेंबर रोजी खडकपूरा येथील मदिना हॉटेलचे मालक शेख युनूस यांच्या अलिशान घरात त्यांचे प्रेत रक्ताच्या थारोळ्यात आढळले. त्यानंतर स्वतः शेख युनूस यांचा मुलगा शेख यासेर अरफाद शेख युनूस (२०) याने पोलिसांना या घटनेची खबर देवून आपल्या वडिलाचा खुन करण्यात आल्याची फिर्याद दिली होती. पोलिसांनी याबाबत या घटनेच्या संदर्भात वेगवेगळ्या पध्दतीने चौकशी केली तसेच सायबर सेल, फोन रेकॉर्डींग व घरातील कौटुंबिक माहिती गोळा करण्यास सुरुवात केली. पोलिसांना याबाबत संशय आल्याने पोलिसांनी मयताचा मुलगा शेख यासेर अरफाद याची उलटसुलट प्रश्न विचारुन चौकशी केली. तेंव्हा त्याने आपणच वडिलांच्या खुनाची सुपारी दिली होती. आपले वडील हे आपल्या आईला मानसिक त्रास देत होते व तिला मारहाण करत होते. सतत होणारा हा प्रकार सहन न झाल्याने आपण आपल्या वडिलांना मारहाण करण्याची सुपारी दिली होती. आपण त्यांना फक्त हातपाय तोडण्याच्या संदर्भात सांगितले होते. मात्र संबंधिताने त्यांचा खुन केला. अशी कबुली त्यांनी दिली. तपास चक्र फिरविल्यानंतर आरोपी शेख अमजद शेख इसाक रा.आंबेडकरनगर सध्या रा.मनमाड ता.नांदगाव जि.नाशिक व योगेश शिवाजी निकम रा.आंबेडकर चौक सध्या वास्तव्य मनमाड या दोघांना पोलिसांनी ताब्यात घेतले. त्यांनी शेख यासेर अरफाद व अरफाद यांचा मित्र शेख आमेर यांच्या सांगण्यावरुन हि सुपारी घेवून हत्या केल्याचे कबुल केले. या प्रकरणातील तीन आरोपींना अटक झाल्याचे पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार यांनी सांगितले. अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, सहायक पोलीस अधीक्षक किरीतिका सी.एम., व वजिराबाद पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक परमेश्वर कदम व त्यांच्या सहकाऱ्यांनी हि कामगिरी यशस्वी केल्याचे पोलीस अधीक्षकांनी सांगितले.

# अतीवृष्टी पिक पाहणीनंतर आमदार राजेश पवार यांनी विकास कामाचा घेतला आढावा

**तभा वृत्तसेवा**
**उमरी, ०७ सप्टेंबर-**

नायगाव मतदार संघात पाऊसाच्या अतिवृष्टीमुळे उमरी धर्माबाद नायगाव तसेच नांदेड जिल्हात अति शेतकऱ्याच्या पिकाचे नुकसान झाल्याने नायगाव मतदार संघाचे लोकप्रिय विकास पुरुष आमदार राजेश पवार यांनी उपमुख्यमंत्री , कृषीमंत्री जिल्हाधिकारी यांना भेटून पत्र व्यवहार करून पिक पंचनाने न करता सरसकट शेतकऱ्याना नुकसान भरपाई द्या अशी मागणी केली होती.



सरकारने महाराष्ट्रातील इतर जिल्हाचा आढावा घेवून नांदेड जिल्ह्यातील अतिवृष्टी पाऊसाचा कहर बघून नांदेडचा ही समावेश केला आहे . त्या अनुषंगाने ई पिक पाहणी नको , प्रत्यक्ष पंचमाने नको सरसकट आर्थिक मदत देण्याचे कृषीमंत्री यांनी जाहीर केले आहे. फक्त ज्या शेतकरी यांचे बैल - गाय - म्हैशी , असे इतर जनावरे पाळीव प्राणी जे पुरात नुकसान त्यांचे पंचनाने करण्याचा निर्णय घेतला आहे त्यामुळे आमदार राजेश पवार यांनी नायगाव मतदार संघात थेट शेतकऱ्याच्या बांधावर जावून पहाणी केलीच पण आपण मतदार संघात किती कामाचा निधी दिला ते काम दर्जेदार होत आहे काय ? याची पहाणी केली आणि दौऱ्यातील गावात किती गावात निधीची कमतरता आहे काय ? या समस्या जानुन घेतल्या. भविष्यातील प्लॉन आखला आहे आमदार राजेश पवार यांचे स्वप्न नायगाव मतदार संघ ग्लोबल मतदार संघ झाला पाहिजे म्हणून प्रत्येक मुख्य गावा गावात जावून परिसरातील सरपंच, नागरीकांचे समस्या जानून घेत आहेत फक्त हा दौरा शासनाच्या विकास निधी दुरुपयोग होवू नये , किवां उनिव भासू नये हाच महत्वाचा मुद्दा होता . त्यामुळे आमदार राजेश पवार यांनी उमरी तालुक्यात दि ६ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी - सिधी - कारला - बितनाळ - हुंडा (उ.प ) - निमटेक बोळसा (खु) येथे पहाणी करून शिंगणापूर येथे समारोप केला आहे . कांही लोकांना या विकास पहाणीत गावचे सर्वच प्रश्न सुटावे म्हणून साहेबांचा भेटण्याचा आग्रा होता . मात्र इतर कामासाठी , शासनाच्या योजना लाभार्थी पर्यंत पोहचल्या नाहीत निराधार यांना लाभ भेटत नाही , सध्याच्या सरकारच्या मुख्यमंत्री लाडकी बहीन योजना , मुख्यमंत्री लाडका भाऊ योजना , मुख्यमंत्री वयश्री योजना वयवृद्ध यांना तिर्थक्षेत्र यात्रा योजना या संदर्भात लाभार्थी यांना कुठलीच अडचन भासू देवू नका म्हणून संबंधीत तहसीलदार , तलाठी , ग्रामसेवक यांना सक्तीच्या सुचना दिल्या आहेत जर कोणी कर्मचारी हायगयी केल्यास त्या कर्मचारी - अधिकारी यांच्यावर कार्यवाही करण्याचे संकेत ही आमदार राजेश पवार यांनी दिले आहेत. तसेच शासनाच्या योजनेच्या अनुदानात मध्ये बँक खाते होल्ड केल्यास तक्रार दिल्यास संबंधित बँकेवर कार्यवाही करावी अशी सुचना उमरी तहसीलदार यांना दिल्या आहेत , आमदार राजेश पवार यांच्या विकास पहाणी दौऱ्यात तहसीलदार , सार्वजनिक बांधकाम विभाग अधिकारी

तलाठी , ग्रामसेवक , सरपंच , महायुतीचे भाजप - मुख्यमंत्री शिवसेना शिंदेगट , राष्ट्रवादी अजीतदाद पवार गट यांच्या कार्यकर्त्यांचा मोठा ताफासोबत होता . मात्र आमदार राजेश पवार यांनी कार्यकत्यानां गावस्तर व तालुकास्तरावर तहसील , पंचायत समिती इतर विभागातील कार्य करा जो जनतेचे कामे करीत नाहीत अशा अधिकारी यांची तक्रार करा आपण ते प्रश्न सोडू किवां वरिष्ठांना कर्तव्य कसूर कर्मचारी असल्याने निलंबनाची कार्यवाही करण्यात येईल असा ईशारा दिला आहे.

## सुरक्षा साधनांसाठी महावितरण कर्मचाऱ्यांची द्वारसभा



**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, ०७ सप्टेंबर-**

महावितरण मधील लाईन्स स्टाफ कर्मचाऱ्यांना सुरक्षा साधने देण्यात यावी या मागणीसाठी आज ईएलए संघटनेच्या वतीने महावितरणच्या मुख्य कार्यालयासमोर द्वार सभा घेण्यात आली.

नांदेड महावितरण कार्यालयास लाईनमनच्या सुरक्षेच्या विसर पडत असून ही खेदजनक बाब असल्याची खंत यावेळी कर्मचाऱ्यांनी व्यक्त केली. संघटनेच्या माध्यमातून याविषयी वारंवार पत्रव्यवहार सुरू आहे. परंतु नांदेड कार्यालयाने याकडे दुर्लक्ष केल्याने या निषेधार्थ आज द्वार सभा घेण्यात आली. या द्वार सभेमध्ये संघटनेचे परिमंडळ अध्यक्ष ईश्वरसिंग टेलर, उपाध्यक्ष जाकिर शेख, सचिव मोहनसिंग जांगडे, मंडळ अध्यक्ष कैलास राऊत, दत्ता किशन गुंडेकर, गजानन कुरुडे आदीसह परिमंडळातील कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

## पैनगंगा नदीवरील पडसा पूल बांधकामाची चौकशी करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**माहुर, ०७ सप्टेंबर-**

माहूर तालुक्यातील विदर्भ व मराठवाडा या भागास जोडणारा महत्वपूर्ण पूल असलेल्या पैनगंगा नदीवरील पडसा पुलाचे बांधकाम अवघ्या दीड ते दोन वर्षात ढासळल्याने सदर पुलाच्या बांधकामाची चौकशी करून कंत्राटदार व अभियंता यांचे विरुद्ध कारवाई करा! अशा आशयाचे निवेदन भाजप युवा मोर्चा माहूर तालुकाध्यक्ष विनायक मुसळे यांनी उप अभियंता सा.बां. उपविभाग माहूर यांच्याकडे सादर केले आहे.

अंदाजे एक ते दीड वर्षापूर्वी निर्मिती करण्यात आलेल्या पैनगंगा नदीवरील तालुक्यातील मौजे पडसा येथील पुलाचे बांधकाम अत्यंत निकृष्ट दर्जाचे करण्यात आले. सदर कामाच्या दर्जाचे पितळ दि. ०१ सप्टेंबर २०२४ च्या अतिवृष्टीत पुलाचे बांधकाम ढासळल्याने बोगस कामाचे पितळ उघडे पडले असून, केलेले काम हे अत्यंत निकृष्ट दर्जाचे असल्याचे निदर्शनास आले आहे.सुदैवाने या ठिकाणी कोणतीही जीवितहानी झाली नाही. परंतु सदर रस्ता व पूल हा विदर्भ मराठवाडा संपर्कासाठी अत्यंत महत्वपूर्ण असून, पुलाचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाल्याने अवघ्या एक दिवसाच्या मुसळधार पावसात पूल ढासळल्याने सदर रस्त्यावरील वाहतूक बंद झाली आहे. मराठवाडा व विदर्भातील नागरिकांना रस्त्याची अडचण निर्माण झाली आहे. करीता दि. ०१ सप्टेंबर २०२४ च्या अतिवृष्टीने खचलेल्या पैनगंगा नदीवरील पडसा येथील पुलाचे बांधकामाची चौकशी करून संबधित अभियंता व कंत्राटदार यांचे विरुद्ध दंडात्मक कारवाई करण्यात यावी व पुलाचे काम व्यवस्थित करून पूल वाहतुकीस उपलब्ध करून द्यावा अशी मागणी मुसळे यांनी निवेदनातून केली आहे.

## माहूर - किनवट तालुक्यात क्यू आर कोडची प्रभावी अंमलबजावणी करा : प्रदीप राठोड

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, ०७ सप्टेंबर-**

जिल्ह्यातील आदिवासी बहुल तालुके असलेले किनवट माहूर या भागातील विविध विभागाचे कर्मचाऱ्यांरी मुख्यालयीन राहत नसल्याने नागरिकांना शासकीय योजनांपासून वंचित रहावे लागत आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेने कर्मचाऱ्यांना क्यूआर कोडवर हजेरी बंधनकारक केली आहे. त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करावी अशी मागणी समनक जनता पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष ॲड. प्रदीप राठोड यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांच्याकडे केली आहे.



नांदेड जिल्ह्यातील माहूर - किनवट तालुका आदिवासी बहुल असल्याने येथे नागरिकांसाठी शासन विविध प्रकारच्या योजना राबविते. या भागामध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना पेसा कायदा अंतर्गत मोठे आर्थिक लाभ देखील मिळतात. परंतु येथे कार्यरत जिल्हा परिषदच्या विविध विभागातील कर्मचारी मुख्यतः आरोग्य विभागातील डॉक्टर व कर्मचारी मुख्यालयी न राहता पुसद -यवतमाळ - आदीलाबाद वा नांदेड येथून ये -जा करीत मनमानीपणे कारभार करत आहेत. यामागे काही राजकीय वशिलेबाजी लावून कर्मचारी मुद्दामहून माहूर - किनवट येथे रुजू होऊन एकस्तर वेतनश्रेणीचा लाभ घेत आहेत पण कर्तव्यावर न जाता मुख्यालयी काम करीत आहेत. राज्य शासनाने सर्व कर्मचाऱ्यांना क्युआर कोडवर हजेरी बंधनकारक केली आहे परंतु किनवट माहूर तालुक्यातील कर्मचारी हे अधिनस्त कर्मचाऱ्यांना वेठीस धरून त्यांच्या मार्फत सेल्फीच्या माध्यमातून क्यूआर कोड हजेरी लावत गैरहजर राहून शासनाची दिशाभूल करीत असल्याचा आरोप ॲड. प्रदीप राठोड यांनी दिलेल्या निवेदनात केला आहे. माहूर येथील तालुका आरोग्य अधिकारी यांनी तर कहरच केला असून ते तालुक्याला केवळ एक किंवा दोन दिवस येऊन उपकेंद्रावरील सीएचओ मार्फत कारभार करीत आहेत. त्यामुळे तालुक्यातील आदिवासी महिलांचे आरोग्य धोक्यात येत आहे. त्यामुळे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे लक्ष देऊन क्यू आर कोडची प्रभावी अंमलबजावणी करावी अशी मागणी ॲड. प्रदीप राठोड यांनी केली आहे अन्यथा जिल्हा परिषद प्रशासकीय इमारती समोर १२ सप्टेंबर पासून आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे.

# शहरस्तरीय तांत्रिक तज्ञ कर्मचारी संघटनेचा बेमुदत संप

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव, ०७ सप्टेंबर-**

शहरस्तरीय तांत्रिक तज्ञ कर्मचारी संघटनेच्या मुलभूत प्रश्न व मागण्यांवर दुर्लक्ष होत असून राज्यातील महानगरपालिका , नगरपरिषद , नगरपंचायत अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) या योजनेची अंमलबजावणी शहरस्तरीय तांत्रिक कक्षामार्फत मागील ५ ते ७ वर्षापासून करण्यात येत आहे. सदर कर्मचारी यांचेमार्फत विविध मागण्या शासनापुढे मांडण्यात आल्या होत्या. त्यामधे शहरस्तरीय तांत्रिक कक्षातील कर्मचारी (उडढउ) यांना मागील ५ वर्षांपासून वेतनवाढ दिलेली नाही.सदर कर्मचारी हे ५ ते ७ वर्ष योजने मध्ये काम करून देखील कोणत्याही प्रकारचे मनुष्यबळ धोरण लागू करण्यात आलेले नाही. यासाठी शासनाकडे वारंवार पाठपुरावा करून देखील धोरणाची अंमलबजावणी करण्यात आलेली नाही. शहरस्तरीय तांत्रिक कक्षातील कर्मचारी यांना शासन सेवेमध्ये सामावून घ्यावे.केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार डिसेबर २०२४ अखेरीस योजना संपुष्टात आल्यानंतर व प्रधानमंत्री आवास योजना भाग-२ ची अंमलबजावणी सुरु होणार असून ज्या नगरपालिकेचे नवीन प्रकल्प नसतील अथवा जुने प्रस्ताव पूर्ण झाले असतील तेथील कर्मचार्यांना कार्य मुक्त न करता त्या केंद्र राज्य शासनाचा इतर योजनामध्ये सामावून घेऊन वयाच्या ५८ वर्षापर्यंत काम करण्याची संधी मिळावी या बाबत हमी देण्यात यावी. उडढउ कक्षातील सर्व महिला कर्मचारी यांना प्रसूती रजा लागू करावी. सदरील कर्मचारी यांना अंशकालीन कर्मचारी म्हणून ग्राह्य धरून शासकीय भरती मध्ये राखीव आरक्षण ठेवण्यात यावे. आदी मागण्यासाइी संप करण्यात येत आहे. बेमुदत संपात सहभागी झाले आहेत.

# सामाजिक बांधिलकी जोपासूनच गणेशोत्सव साजरा करावा : संकेत गोसावी

**तभा वृत्तसेवा**
**नायगाव, ०७ सप्टेंबर-**

गणेश मंडळांनी विविध उपक्रम राबवितांना सामाजिक बांधीलकी जोपासूनच गणेशोत्सव साजरा करावा असे आवाहन देगलूर विभागाचे पोलीस उपअधीक्षक संकेत गोसावी यांनी केले.

आगामी उत्सव व सणांच्या अनुषंगाने शुक्रवारी नायगांव व रामतीर्थ पोलीस ठाण्याच्या वतीने अनुक्रमे नरसी व नायगांव येथे शांतता समितीची बैठक घेण्यात आली.यावेळी पोलीस उपाधीक्षक संकेत गोसावी यांनी प्रभावी मार्गदर्शन केले.

गणेशोत्सव काळात विविध देखावे साकारताना सामाजिक उपक्रमाना प्राधान्य दिले पाहिजे. डीजे च्या भानगडीत न पडता जमा वर्गणीतून एखाद्या गरजूना मदत करावी असा उपयुक्त सल्ला देखील पोलीस उपाधीक्षक गोसावी यांनी दिला.

उत्सव काळात शांततेला गालबोट लागणार नाही याची दक्षता घेत गणेश मंडळानी कायद्याचे पालन करावे असेही ते म्हणाले.नायगांव येथील बैठकी अगोदर दिवंगत खा.वसंतराव चव्हाण यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. तर नरसीत पोलीस पाटील कै. धनसिंग देवराव चव्हाण यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. पोलिसांच्या वतीने उपस्थित मान्यवराचे स्वागत करण्यात आले.यावेळी पोलीस निरीक्षक अजित कुंभार, सपोनि श्रीधर जगताप, पोलीस उपनिरीक्षक शिवराज नरवाडे, बाबुराव लंगडापुरे, सा.बां.विभागाचे अधिकारी राठोड, महावितरणचे अधिकारी शिंदे, आरोग्य विभागाचे अधिकारी दापके नगरपंचायतचे कदम उपस्थित होते.

नरसी येथे नायब तहसीलदार विजय येरावाड,



राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हा कार्याध्यक्ष भास्कर पाटील भिलवंडे, पोलीस पाटील इब्राहीम बेग पटेल, तलाठी मुंडे, गंगाधर वडगावे, माधव कोरे, नागनाथ अमोघे केरुरकर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सुरेख सुत्रसंचालन पोलीस उपनिरीक्षक शिवराज नरवाडे व माने यांनी केले तर आभार पत्रकार गंगाधर गंगासागरे यांनी मानले.या बैठकीला नायगाव व रामतीर्थ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पोलिस पाटील, तंटामुकत समितीचे अध्यक्ष, सरपंच, विविध पक्षाचे पदाधिकारी, पत्रकार, सामाजीक कार्यकर्ते, गणेश मंडळाचे पदाधिकारी मोठया प्रमाणात उपस्थित होते.